

# माणूस

१८ फेब्रुवारी '७८ / सव्वा रुपया

दिल्लीला पुन्हा जाग आणण्यासाठी

## महाराष्ट्रात भक्कम 'जनता' शासन हवे...







निवडणूक विशेषांक



# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक अडतीस

१८ फेब्रुवारी १९७८

मूल्य सव्वा रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


# कार्यकर्ता : आमचे बलस्थान

## मुलाखत : श्री. वसंतराव भागवत

'जाहीरनाम्यात आपण राज्यांना अधिक आर्थिक स्वायत्तता हवी, असे म्हटले आहे. दलितांच्या सवलतीच्या प्रश्नांवर वेळप्रसंगी सत्याग्रह करावा लागला तरी तो करण्याची आपली तयारी आहे. यावरून एकूणच महाराष्ट्रातील जनता पक्ष केंद्रसत्तेचे केवळ बाहुले न बनवता वेळप्रसंगी केंद्रालाही नवे वळण देण्याची आकांक्षा बाळगून आहे असे दिसते. तुमचे याबाबत काय विचार आहेत ?' बराच वेळ इतर विषयांवर बोलणे झाल्यावर भागवतांना मी हा प्रश्न विचारला.

वसंतराव भागवत हे महाराष्ट्र जनता पक्षाचे एक सरचिटणीस. वास्तविक मागील अंकातच जनता पक्षाचे दुसरे सरचिटणीस पन्नालाल सुराणा यांच्या मुलाखतीबरोबर भागवतांचीही मुलाखत योजलेली होती; पण वेळ जमली नव्हती. तिकिटवाटपाच्या गोंधळात भागवत इतके गुंतले–गुरफटले होते की, तासभर काही त्यांना या कामासाठी वेगळा काढता आला नव्हता.

ही गडबड आता संपली होती. वातावरण निवळले होते. बहुतेक ठिकाणच्या बंडखोऱ्या मागे घेण्यात आलेल्या होत्या. भागवत–पन्नालाल, एस्. एम्. जोशी, उत्तमराव पाटील वगैरे नेत्यांची संघटनेवरील पकड सुरवातीला वाटली होती तितकी काही सैल नाही, हे स्पष्ट झाले होते.

भागवत हे समाजवादी वगैरे संघर्षप्रिय पक्षातून जनता पक्षात आलेले कार्यकर्ते नाहीत. त्यामुळे केंद्र-राज्य संघर्ष ही कल्पना त्यांना तत्त्वत ही मान्य होणार नाही. म्हणून मी हा प्रश्न त्यांना मुद्दाम विचारला होता.

'दलितांच्या सवलती, आर्थिक स्वायत्तता या दोन प्रश्नांवरच काय, जाहीरनाम्यात नसलेला आणखी एक मुद्दा मी तुम्हाला सांगतो. जनता पक्ष शेती आणि शेतकरी या क्षेत्राच्या उत्थानासाठी वचनबद्ध आहे. हे उत्थान घडवून आणायचे तर शेतमालाला किफायतशीर भाव मिळणे, ही अगदी प्राथमिक गरज आहे; पण केंद्राचे याबाबतीतील धोरण अगदी चुकीचे व अशास्त्रीय आहे. APC (ॲग्रिकल्चरल प्रायसेस कमिशन) हे भाव ठरवते; पण ही भाव ठरवण्याची पद्धत arbitrary आहे. पाणी, खते, बीज, शेतमजुरांचे वेतन वगैरे घटकांवर होणारा खर्च हिशेबात धरूनच शेतमालाचा भाव ठरवला गेला पाहिजे. शेतमालाला भाव मिळाला नाही तर शेतकरी, विशेषत: लहान व मध्यम शेतकरी, किमान वेतन तरी कसे देऊ शकणार ? तेव्हा याबाबत काही निश्चित शास्त्रीय पद्धत स्वीकारली जायला हवी; पण ती स्वीकारली जात नाही याचे कारण हितसंबंधितांचा दिल्लीवाल्यांवर असलेला दबाव हे आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर कापसाचे देता येईल. कापसाला योग्य भाव आजपर्यंत कधीही देण्यात आलेला नाही. उलट हे भाव पडते कसे राहतील हे पाहिले गेले. हे पाहणारी 'लॉबी' दिल्लीत मजबूत आहे. आता कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यायचा तर अशा 'लॉबीज्'ना व पर्यायाने केंद्रालाही न दुखवून कसे चालणार ? अर्थात पक्षशिस्त आम्ही मानतो. या चौकटीत राहूनच वेळप्रसंगी संघर्ष करणे भाग पडले तर आम्ही मागे राहणार नाही.'

'अशी चढावाची भूमिका घ्यायची तर महाराष्ट्रातील जनता पक्ष अंतर्गतदृष्ट्या एकजीव हवा. तरूण कार्यकर्त्यांचा त्यावर प्रभाव हवा. तिकिटवाटपाबाबत जो गोंधळ झाला, नको ती माणसे निवडणुकीतील यशावर डोळा ठेवून पक्षात घेतली गेली, त्यावरून असा गतिमान सुसंघटितपणा जनता पक्षाजवळ नाही, असे मत बनते. गेल्या वर्षातील पक्षबांधणीवरून याबाबतीत तुमचा काय अनुभव आहे ?'

'वर्षभर म्हणजे काही फार मोठा काळ


मुखपृष्ठावरील छायाचित्रे
श्री. वसंतराव भागवत, श्री. बापूसाहेब काळदाते

छायाचित्रे गौतम पाटोळे, मुंबई

मुखपृष्ठ बाबू उडपी

नाही. तरीपण या अल्पकाळातील अनुभवावरून मी निश्चितपणे म्हणू शकतो, की, पूर्वाश्रमीच्या जनसंघ, समाजवादी व इतर पक्षातूनही आलेल्या ध्येयवादी कार्यकर्त्यांचा एक किमान संच जनता पक्षात तयार झालेला आहे. नवीन भरती होते आहे; ती सगळीच काही स्वार्थी आणि सत्तालोभी, जनतेने नाकारलेल्या लोकाची नाही ठिकठिकाणी झालेल्या शिबिराचा अनुभव फार चांगला आहे. तरुण व धडाडीचे कार्यकर्ते पुढे येत आहेत व समाजवादी तळमळीने कार्य करावे या प्रेरणेने ही मंडळी पक्षाकडे, राजकारणाकडे आकृष्ट झालेली आहेत. यातून प्रशिक्षित कार्यकर्त्यांचे एक केडर आम्ही उभे करू शकू व केडरच्या बळावर संघर्षाचे म्हणा, नवनिर्माणाचे म्हणा आश्वासित असे कार्यक्रम पूर्ण करणे आम्हाला जमू शकेल.'

'ठीक आहे ही उद्याची गोष्ट झाली. पण केडर तरी परस्परांशी नीट जोडले गेलेले आहे का? केवळ स्वार्थ याआड येतो असे नाही. भिन्न भिन्न संस्कारांतून हे केडर तयार झालेले आहे. तुम्ही रा स्व. संघातून आलात, समाजवादी मंडळीवर राष्ट्र सेवा दल किंवा लोहिया यांच्या संस्कारांचा, विचारांचा प्रभाव. या दोन्ही पठड्याची विचार व कार्य करण्याची पद्धतीच मुळापासून वेगळी वाटते. संघाची कार्यपद्धती लोकसंग्रहात्मक. 'बहुत लोक मेळवावे। एक विचारे भरावे॥ ही संघपद्धती. यात विग्रहभावाला, संघर्षाला वाव नाही सामंजस्यावर भर. उलट लोहियावादी–समाजवादी केडर संघर्षासाठी, विग्रहासाठी नेहमीच तत्पर आणि बऱ्याच वेळा उत्सुकच असल्यासारखे. या दोन टोकांचा मेळ जमायचा कसा?'

एकत्र काम करीत राहिल्यावर खूप गोष्टी समान आहेत, असे हळूहळू ध्यानात येते. उभयपक्षी काही आग्रह, दुराग्रह असतात ते अनाठायी वाटू लागतात. जनसंघाच्या सर्वधर्मसमभावाच्या भूमिकेची समाजवाद्यांना नव्यानेच ओळख होते तर समाजवाद्यांचा Downtrodden बद्दलचा आग्रह पूर्वाश्रमीच्या जनसंघीयालाही योग्य वाटतो. मला स्वतःला तर जनसंघात काम करीत असताना जेवढे घरच्यासारखे वाटत होते तेवढेच आताही वाटते आहे. वर्तुळ खूप विस्तारले आहे एवढेच. प्रवाह जरी वेगवेगळे आहेत तरी गांधीजी हे या सर्व उलटसुलट विचारप्रवाहांना एकत्र आणणारे व जोडणारे केंद्र ठरत आहे. विशेषतः त्यांचा अंत्योदय विचार. अन्त्योदय आणि लोकशाही ही मला तरी जनता पक्षाचे भावनिक व वैचारिक ऐक्य टिकवून धरू शकणारी दोन श्रद्धास्थाने वाटतात. या निष्ठावर खबीरपणे उभे राहिलेले निदान शंभर तरी कार्यकर्ते मी महाराष्ट्रातील जनता पक्षात आजसुद्धा तुम्हाला दाखवू शकेन. यात पूर्वाश्रमीचे जनसंघीय आहेत, समाजवादी आहेत, जुन्या काँग्रेसपक्षातून आलेले आहेत, नवीनही आहेत. हेच खरे आमचे बलस्थान आहे. काँग्रेसमध्ये हे बलस्थानच कधी जोपासले गेले नाही, म्हणून सगळीकडे आज सत्तावाद माजला आहे. निष्ठावंत व ध्येयवादी कार्यकर्त्यांचे केडर काँग्रेसने कधी बांधले नाही. काँग्रेस संघटना सरकारजमा झाली. काँग्रेस कार्यकर्ता दुय्यम ठरला. सत्तेत गेलेले प्रभावी ठरले. आम्ही असे होऊ देणार नाही पक्षसंघटना केडरच्या बळावर वेळप्रसंगी शासनालाही चुकीच्या मार्गावरून वळणावर आणण्याइतकी प्रभावी करण्याचा आमचा प्रयत्न आहे. उद्या अगदी अटलबिहारी वाजपेयी चुकले तरी त्यांना त्याची चूक सांगण्याचे धैर्य आणि ताकद सामान्य पक्षकार्यकर्त्याजवळ हवी.'

'म्हणजे मधू लिमये यांचा ध्रुवीकरणाचा विचार तुम्हाला मान्य नाही असे दिसते!'

'ते कोणत्या संदर्भात बोलले हे पाहिले पाहिजे. मला वाटतं काँग्रेस फाटाफुटीसबंधात ते बोलले होते. रेड्डी–चव्हाण काँग्रेसचे अस्तित्व संपेल, इंदिरा काँग्रेसकडे किंवा 'जनता'कडे लोक येतील, असे त्यांना म्हणायचे असावे. शिवाय पक्षात मतभिन्नता मुळीच नाही, असे मी सांगितले तरी विश्वास कुणी ठेवणार नाही. मतभेद कमी होताहेत हे मी नक्की सांगू शकेन. चंद्रशेखर तर पक्षबांधणीसाठी आपली सर्व शक्ती जणू पणाला लावूनच काम करीत आहेत!'

'एकूण पक्षबांधणी, केडर हे तुम्ही महत्त्वाचे मुद्दे मानता. याकडे पूर्ण लक्ष पुरवता यावे यासाठीच तुम्ही निवडणुकीपासून दूर राहायचे ठरविले का?'

'होय. माझ्यापुरता हा निर्णय मी घेऊन टाकलेला आहे. मला संघटनात्मक कामात अधिक गोडी आहे; शिवाय सगळ्यांनीच सत्तकडे धाव घेतली तर काँग्रेसचे जे झाले तेच आमचेही व्हायला वेळ लागणार नाही. हजार रुपये पगार, फुकटचा फर्स्ट क्लासचा प्रवास, इतर सोयी–सवलती यांचा मोह नाही म्हटले तरी पडतोच. तरी पण या मोहाच्या क्षेत्रात, सत्तेच्या राजकारणातही चांगल्या लोकांनी गेले पाहिजे. प्रश्न शक्ती प्रमाणाचा आहे. सत्ताकारण आणि संघटनेचे काम या दोन्हीत एक विशिष्ट ताळमेळ हवा. माझ्यासारखे आणखीही काही केवळ संघटनकार्यात राहणारे लोक आहेतच!'

'तुमच्यावरचा हा संघसंस्कार का?'

'असेलही. मी स्वतःला संघाचा मानत आलेलो आहे. निःस्वार्थबुद्धीने समाजसेवा करणारा कार्यक्षम तरुण ही संघाची सर्वात मोठी contribution मी मानतो!'

'जनता म्हणजे जनसंघ. जनसंघ म्हणजे संघ ... असे आपले यशवंतराव चव्हाण म्हणतात. संघाचा जनता पक्षावर दबाव आहे, असे अनेकांचे मत आहे तुमचा काय अनुभव?'

खरे म्हणजे भागवत या प्रश्नावर प्रथमच मला चिडल्यासारखे दिसले. प्रयत्नपूर्वक त्यांनी आपला चेहरा स्वाभाविक ठेवला आणि राग दाबून धरलेल्या स्वरात ते म्हणाले, 'मी तीस वर्षं जनसंघाचे पूर्ण वेळ काम केले. जनसंघातही आम्हाला पूर्ण स्वातंत्र्य होते संघाने स्वातंत्र्य 'दिले' हा शब्दप्रयोगही चुकीचा आहे. स्वातंत्र्य 'होतेच!' संघाची कार्यपद्धती माहीत नसणाऱ्यांकडून प्रामाणिक गैरसमजापोटी किंवा हेतुपुरस्सर बुद्धिभेद करण्यासाठी हा आक्षेप घेतला जात आहे. जनसंघही पूर्ण स्वतंत्रपणे काम करीत होता आणि जनता पक्षाबद्दल तर प्रश्नच नाही. संघाचे कार्य मौलिक स्वरूपाचे आहे आणि इतर कुणी काहीही म्हणत असले तरी या कामाची समाजाला नितांत आवश्यकता आहेच. राष्ट्र सेवा दल, गांधीवादी विधायक संस्था यांचेही कार्य स्वतंत्रपणे चालू राहयला हवे!'

'एकूण केडरबांधणी, कार्यकर्त्यांचा संच निर्माण करण्यावर तुमचा मुख्य भर दिसतो. या दृष्टीने तुम्ही काही निश्चित आश्वासन देऊ शकता का?'

'कामाच्या दृष्टीने आम्ही जनसंघटनेचे पाच विभाग सध्या निश्चित केलेले आहेत. शेतमजूर, दलित, छोटा आणि मध्यम शेतकरी, आदिवासी आणि झोपडपट्टीतील रहिवासी. महाराष्ट्रातले सव्वीस जिल्हे, आणि मुंबई शहर यात येत्या दोन वर्षांत आम्ही या पाच विभागात काम करणारे निदान दोनशे पूर्ण वेळ कार्यकर्ते तरी उभे करून दाखवू. अर्थात पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणजे संघप्रचारकासारखा नाही. संघाचे ते अलौकिक वैभव आहे, हे मान्य करूनसुद्धा राजकीय पक्षाला हा आदर्श झेपण्यासारखा नाही. तो

व्यवहार्यही नाही. पूर्ण वेळ कार्यकर्ता असला तरी ता घरवाल्यासारखा व्यवस्थित राहू-जगू शकला पाहिजे, अशी त्याची पक्षाने आर्थिक व्यवस्था लावली पाहिजे; पण हे सर्व आम्ही जमवू. कारण त्याशिवाय मला तरी पर्यायच दिसत नाही. अटलबिहारींनी म्हटले तसे. मागचे दोर कापले गेलेले आहेत. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या या जनसंघटनाद्वारा आम्ही महाराष्ट्राचेच काय. देशाचे चित्रही बदलून दाखवण्याची हिंमत बाळगून आहोत !'

□

'साधना' साप्ताहिकात आलेल्या एस्. एम्. जोशी यांच्या मुलाखतीची मला आठवण होत होती. २-४ वर्षे चळवळी केल्या न केल्या तोच तिकिटासाठी भाऊगर्दी करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांची प्रचंड संख्या पाहून एस्. एम्. यांनी त्याना वाटलेली खंत या मुलाखतीत व्यक्त केली होती. उलट वीस वीस वर्षे पक्षाचे पूर्ण वेळ कार्य करूनही व्यापक पक्षहित व देशहित यासाठी सत्तास्थानापासून हेतुपुरस्सर दूर राहणारी भागवतांसारखी माणसेही एस्. एम्. च्या अवतीभवती आहेत ही काही कमी दिलासा देणारी गोष्ट नाही. भागवतही, अशी माणसे अनेक आहेत, हे मला पुन्हा पुन्हा सांगत होते. किंबहुना तिकिटे ज्याना दिली गेली आहेत त्याच्यापैकी बहुसंख्य माणसेही सत्तेकडे एक सेवेचे साधन म्हणून पाहणारी आहेत, असाही भागवतांचा व इतर प्रमुख जनता-नेत्यांचा दावा आहे. अपवाद केले गेले नाहीत, तडजोडी झाल्या नाहीत असे कुणीच म्हणत नाही. 'पण त्याचे प्रमाण फार कमी आहे. आश्वासने पूर्ण करायची आहेत, त्या दृष्टीने कार्यक्षम व लोककल्याणाची तळमळ असणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्तेत व सत्तेबाहेर एक सच उभा करण्याची ईर्षा या सर्व तिकिटवाटप प्रकारामागे होती.' असा निर्वाळा आदल्या दिवशी पन्नालाल सुराणा यानी माझ्याशी बोलताना दिला होता व आज वेगळ्या शब्दात भागवतही तेच सांगत होते. कामाचे वाटप म्हणून व आवड म्हणूनही सुराणा विधानसभेत आता चालले आहेत. भागवत पक्षसंघटना मजबूत करण्याकडे अधिक लक्ष पुरवू इच्छितात.

चरणसिंग त्या दिवशी मुंबईत येणार असल्याने भागवतांची चुळबूळ सुरू झाली होती. चरणसिंगासाठी एअर फोर्सचे हेलिकॉप्टर ठरवले होते. पण पेट्रोलसाठी पसे अगोदर भरायचे होते, त्याची सोय झालेली नव्हती. म्हणून अधिक वेळ बसायच्या तयारीने आलेले भागवत तास-दीड तास झाल्यावर घड्याळाकडे पाहू लागले. मी तर प्रश्नांचे २-३ कागद तयार करून ठेवलेले होते. अगदी भागवत राहतात कसे-कुठे इथपासून जाहीर सभेत ते भाषणे फारशी का देत नाहीत इथपर्यंत. पुणे-मुंबईत तिकिट वाटप ठरवताना निष्ठावंत कार्यकर्त्यांवर झालेला अन्याय बोचत होताच. थोड्याच वेळापूर्वी विजय तेंडुलकर यांची गाठ पडलेली होती व नारायण तावडे यांच्याबद्दल त्यानी खूप सांगितलेले होते. दुर्गाबाई भागवत स्वत: तावडे यांच्यासाठी प्रचार करीत आहेत व तेंडुलकरही प्रचारकार्यात भाग घेणार असे म्हणाले. पुण्यात तर पूर्वाश्रमीच्या जनसंघ कार्यकर्त्यांवर सरळ सरळ अन्याय झालेला होता. तरी ही मंडळी पक्षशिस्त म्हणून गप्प राहिली हे विशेष.

वामनराव परब, विश्वास गांगुर्डे यांना तिकिटे नाहीत म्हणजे काय? भागवतांशी या सर्व गोष्टी बोलायच्या होत्या; पण त्यांनीच एक प्रश्न मला विचारला आणि उरलेल्या वेळात संभाषणाची गाडी वेगळ्याच वळणावर गेली. 'तुमची मंडळी काय म्हणताहेत?' भागवतांनी सहज चौकशी करावी तसा प्रश्न टाकला. 'आमची म्हणजे वृत्तपत्रातली, लेखन-वाचन क्षेत्रातली, असंच ना?' 'हो', भागवत म्हणाले. 'ती अजून तरी स्वस्थ आहेत. गेल्या मार्चच्या निवडणुकीसारखी ती काही बाहेर पडतील असे दिसत नाही. मला जे भेटले ते तर जनता पक्षावर, एकूण जे चालले आहे त्यावर नाराजच असलेले दिसले.'

'का?'

'गेल्या वर्षभरातली दिल्लीच्या जनता सरकारची वाटचाल लोकांना फार काही आशादायक वाटत नाही. दिशाहीनतेचा आरोप अनेकांना पटू लागलेला आहे.' मी

'असं कसं म्हणता? निदान ४-५ मंत्र्यांचा प्रभाव तरी अगदी सर्वमान्य आहे.' भागवत.

'उदाहरणार्थ-' मी

'अटलबिहारी वाजपेयी, मधू दंडवते, जॉर्ज फर्नांडिस, अडवानी ..' भागवत.

'सकाळीच तेंडूलकर म्हणत होते की, 'उध्वस्त धर्मशाळा'चा हिंदी प्रयोग सादर करायला मुंबई टी व्ही चे अधिकारी घाबरताहेत. नोकऱ्या फटाफट जातील ही भीती 'उध्वस्त धर्मशाळा' हे नाटक तुम्ही पाहिले असेल तर तुमच्या हे सहज लक्षात येईल की, त्यात घाबरण्यासारखे, नोकऱ्या जाण्यासारखे काही नाही. मग हे भीतीचे वातावरण अजून का? अटलबिहारींचा प्रभाव मात्र जाणवतो. शेजारील देशांशी मैत्री संपादन करण्याचे त्यांचे धोरण उठून दिसते, जुन्या नेहरूयुगापेक्षा वेगळे वाटते. जॉर्ज फर्नांडिस यांची अद्याप अशी पकड बसलेली जाणवत तरी नाही. चरणसिंग...'इंदिरा हटाव' मधून बाहेर पडतील तर बरे. आणि मोरारजी देसाई! हे 'रामराज्य' वगैरे काय सांगताहेत? या सगळ्यांचा परिणाम असा होतो आहे की, मंडळी चांगली असली तरी यांच्याजवळ देशाला नवे वळण लावण्याची धमक नाही, दृष्टी नाही! 'रामराज्य' ही कल्पना कितीही श्रेष्ठ व उच्च असली तरी आजच्या तरुण मनाची पकड ती घेऊ शकत नाही आणि मोरारजी तर गांधीजींच्या या कल्पनेचा पुन्हा पुन्हा उच्चार करून राहिले आहेत. त्यांना सांगा, त्यापेक्षा 'कामराज्य' आणू असे म्हणा. 'मागेल त्याला काम' ही घोषणा अमलात येण्याची गरज अधिक आहे खरोखर खेड्यापाड्यात तयार होणारी सुशिक्षित बेकारांची फौज पाहिली तर कुणाचीही छाती दडपून जावी. या सगळ्यांना काम पुरवलेत, एवढा रोजगार निर्माण करू शकलात आणि अधिक काहीही केले नाहीत, करू शकला नाहीत तरी खूप केलेत, असे म्हणणारे माझ्यासारखे अनेक निघतील. हे काम प्रचंड आहे; पण केले तर तुमच्यासारखी त्यागी आणि निष्ठावंत मंडळीच हे करू शकतील. मला तरी दुसरा काही आशेचा किरण दिसत नाही. दिल्लीतील बड्या आघाडीपेक्षा मला तुम्हा कार्यकर्त्यांची छोटी आघाडीच अधिक महत्त्वाची, मोलाची वाटते. ही जर तुम्हा म्हणता अशी वर्षा दोनवर्षांत तळापासून मजबूतपणे उभी राहिली तर दिल्लीला आज नसलेली दिशा सापडू शकेल. थोडी फार जाग येईल. परिवर्तन वरून खाली आणायचे नाही, तसे ते येतही नसते तुम्हा खालून ही लाट वरपर्यंत नेला पाहिजे !' अशा अर्थाचे मी काही तरी भागवतांना सांगितले. भागवतांनी निदान ऐकून तरी घेतले आहे.

□

पुन्हा भेटले की विचारणार आहे, 'तुम्ही राहता कुठे? घरी कोण कोण आहेत?'

दोन तास आम्ही बसलो-बोललो; पण वैयक्तिक असा एकही उल्लेख त्यांच्या बोलण्यात आला नाही. सगळेच पूर्ण वेळ कार्यकर्ते असेच असतात का?

काल पन्नालाल सुराणांशी बोलतानाही ..

—श्री ग. मा

यापुढील 'माणूस' निवडणूक अंकी

## ठिकठिकाणच्या निवडक 'जनता' उमेदवारांचे चित्रपरिचय...



विजय मोरे
'तुमच्या प्रेमातून माझी निवड होऊ दे...'

लोक विजयरावांचे स्वागत करतात.
सत्तर, ऐंशी, नव्वद टक्के मते देऊ म्हणतात.
मोडक्या तोडक्या भाषेत प्रेम व्यक्त करतात.
काँग्रेस प्रचारकांना गाव बंद करू म्हणतात.
युवक काँग्रेस, रिपब्लिकनांचा वाढता पाठिंबा मिळतोय....
बारामतीत जनता लाट पुन्हा उसळणार का?

# बारामती महाराष्ट्राची अमेथी होणार का ?

**शिरीष सहस्रबुद्धे**

बारामतीला जायला म्हणून एस्. टी. मध्ये बसलो, तिथपासूनच निवडणुकीचं वातावरण तापायला लागल्याची जाणीव झाली. बसमधली बहुतेक सगळी शिळोप्याची चर्चा निवडणुकीबद्दलचीच होती आणि काँग्रेस आणि जनता पक्ष कसे सारखेच 'चोर' आहेत, एसेम्नी शेकापला ऐंशी जागा कबूल करून कसा घोळ केला वगैरे वादविवाद जोरात होते. बारामतीत रात्री उतरलो, तेव्हाच वातावरणाचा नूर वेगळा आहे, असं जाणवलं. एक तर दृश्य स्वरूपातला प्रचार दोन्ही पक्षांकडून जोरात चाललेला. दुसरं, रात्रीची उशिराची वेळ असूनही माणसं झुंडीनं एकाच दिशेनं चाललेली, तेव्हा कुतूहलानं चौकशी केली तर गावात एसेम् जोशींची सभा असल्याचं कळलं. थेट तिकडेच गेलो, तेव्हा सभा सुरू झालेली होती. गर्दी भरपूर. म्हणजे आठ ते दहा हजार. खासदार संभाजीराव काकडे बोलत होते. इतर मुद्दे नेहमीचेच; पण भाषणाच्या शेवटी खासदारांनी महत्त्वाचा मुद्दा मांडला. त्यांच्यावर सध्या आलेले भ्रष्टाचाराचे आरोप आणि त्यांच्या तथाकथित अटकेची बातमी याबद्दल त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, 'जे काही घडलं आणि घडणार आहे, तो माझा खाजगी मामला समजावा. मला अटक जरी झाली तरी निवडणुकीवर त्याचा परिणाम होऊ देऊ नका.' मग नंदिनी सत्पथींचं उदाहरण वगैरे. 'जनता पक्षाच्या राज्यामध्ये सर्वांनाच न्याय मिळेल. माझ्या हातनं जरा चूक झालेली असली, तर मीही शिक्षा भोगीन; पण हे प्रायश्चित्त अॅड्. मोरे यांना मिळता कामा नये.' अशा आशयाचा शेवट. पब्लिक सिंपथी मिळवायच्या–टिकवायच्या दृष्टीनं हे उत्तमच कारण. नाही म्हटलं तरी संभाजीरावांवरचे आरोप ही जनता पक्षाच्या दृष्टीनं दुखरी, नाजूक ठरू शकेल अशी जागा. काँग्रेसला वार करायला योग्य ठिकाण; पण संभाजीरावांनी हा प्रश्न आणि सभा दोन्ही चांगले हाताळले.

मग एसेम् बोलायला उठतात. त्यांचा एरवीचा बोलायचा ढंग सर्वपरिचित आहेच; पण या वेळी त्यांचा एकूण सूर बऱ्यापैकी चढा लागलेला. त्यात मधेमधे चिठ्ठ्या पाठवून प्रश्न विचारून दोघे–तिघेजण त्यांना डिस्टर्ब करतात. त्यामुळे ते काहीसे त्रासलेले. अत्यंत कडक शब्दांत इंदिराजींच्या आजतागायतच्या कारकीर्दीची हजेरी घेतली जाते. चड्डी काँग्रेस आणि चिंधी काँग्रेस याविषयी चेष्टा. मग ते गंभीरपणे जनता पक्षाकडे वळतात. जनता पक्षाची ध्येय-धोरणं आणि आजपर्यंतचं कार्य स्पष्ट करून आणि 'बारामती काय तुम्हाला आंदण दिल्येय की काय ?' असा प्रश्न शरद पवारांना टाकून एसेम् खाली बसतात. जवळजवळ पाऊणएक तास एसेम् बोललेले असतात. त्यांचं भाषण संपत आलेलं असताना किंचित लांबतं, तेव्हा सभेतनं

पृष्ठ २९ वर

# जिल्हा अहमदनगर

# साखरी साम्राज्याला जबरदस्त धक्का !

**चंद्रकांत दीक्षित**

'विस्ताराने दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा म्हणजे अहमदनगर. अहमदनगर म्हटले की, साखर कारखानदारी पटकन आठवते आणि निवडणूक म्हटली की, पाण्यासारखे पेट्रोल वापरणे, पैशाचा धूर करणे, जी जी साधने हाताला लागतील त्यांचा मुक्तपणे वापर करणे, हे सगळे चित्र डोळ्यापुढे उभे राहाते. सहकारक्षेत्रात अग्रेसर गणल्या गेलेल्या या जिल्ह्याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग पडतात आणि जिल्ह्याचे ठिकाण नगर नेमके मध्यावर येते; पण तेही दक्षिण भाग म्हणूनच ओळखले जाते.

तेरा तालुक्याचा हा जिल्हा विधानसभा-निवडणुकीने अगदी घुसळून निघाला आहे. कॉंग्रेस ( रेड्डी ) व जनता पक्षातून मातब्बर कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध उभे राहिले आहेत, तर खुद्द नगर शहरातून भाई नवनीतदास बार्शीकरासारखा नेता अपक्ष म्हणून उभा आहे. कॉंग्रेस पक्षाने तेरा मतदारसंघांतून स्वत:चे बारा व मित्रपक्ष म्हणजे गवई नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षासाठी एक जागा दिली आहे, तर जनता पक्षाने आपले दहा व मित्रपक्षाला म्हणजे महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेसला तीन जागा दिल्या आहेत. वैशिष्ट्य असे की, म. स कॉं. चे तीनही उमेदवार जनता पक्षाचे चिन्ह घेऊनच निवडणूक लढवीत आहेत. त्यामुळे प्रचाराला फारच सोपे. 'जाऊनी सांगा घरोघरी, नांगरधारी शेतकरी !'

नगरचा दक्षिण भाग म्हणजे खुद्द नगर शहर, नगर तालुका, पारनेर, श्रीगोंदा, जामखेड- कर्जत ( राखीव ) पाथर्डी व शेवगाव-नेवासा हा मतदारसंघ. या मतदारसंघात एक नगराध्यक्ष, एक राज्यमंत्री, एक माजी मंत्री तर चार विद्यमान आमदार निवडणुकीचे आखाड्यात आहेत. खुद्द नगर शहरात जनता पक्षाने बहुचर्चित झालेले तरुण तडफदार नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांना उभे करून एक आगळेच आव्हान दिले आहे. डॉ. सप्तर्षींना प्रतिस्पर्धी आहेत कॉंग्रेसचे डॉ. नाथ पाऊलबुद्धे व विद्यमान आमदार *नगराध्यक्ष भाई नवनीतदास बार्शीकर*. इतर आणखी चार उमेदवार म्हणजे इंदिरा कॉंग्रेसचे प्रा. श्रीकांत बेडेकर, ॲड. राम रानाकर ( कम्यु. उजवे ) आणि दोन अपक्ष.

नगर शहराची लढत गाजण्याचे कारण म्हणजे अगदी दिल्लीतून आ. बार्शीकर जनता पक्षाचे उमेदवार जाहीर झाले तर खुद्द चंद्रशेखर यांनी आयत्या वेळी डॉ. सप्तर्षी यांना उमेदवारी दिली. हा बदल झाल्यावरही बार्शीकर अपक्ष म्हणून उभे राहिले. ( बार्शीकर तब्बल महिनाभर जनता पक्षात राहिले हे काय थोडे झाले ! ) त्यामुळे जनता पक्षीयांकडून बार्शीकर उडाले आणि येथेच निवडणूक रंगली. डॉ. सप्तर्षी वृत्तपत्रातून तसा सगळ्यांना परिचित. विविध आंदोलनातील-विशेषत: विद्यार्थी चळवळीतील-मोठा कार्यकर्ता. गेले वर्ष-दीड वर्ष कर्जत तालुक्यात युक्राद संघटनेद्वारा सामान्य नागरिकांना धीर देण्याचे काम करीत होता, खुद्द राज्यमंत्री ए. बु. निंबाळकराचे नाकावर टिच्चून. तेव्हा विद्यार्थी वर्ग, महिला वर्ग आणि 'जनते'चीही मंडळी त्याला आपला मानतात. म्हणूनच अल्पावधीत नगर शहरात 'येऊन येऊन येणार कोण ? डॉ. कुमारखेरीज आहेच कोण ?' अशा घोषणांचा गल्ली-बोळातून दणका चालला आहे. डॉ. कुमारला खरी फाइट द्यावयाची ती भाई बार्शीकरांशीच. गेले ३८-४० वर्षे अव्याहतपणे नगर शहरातून म्युनिसिपालिटीत असलेले बार्शीकर, दहा-अकरा वेळा व आता पाच वर्षांसाठी नगराध्यक्ष असलेले बार्शीकर म्हणजे मोठे ढंगदार व्यक्तिमत्त्व आहे. चांगले उमदे व्यक्तिमत्व, भाषाशैली चांगली, सर्वसामान्य थरातील त्यांची लोक-

प्रियता आणि निवडणुकीची सारी तंत्रे अवगत असलेला हा नेताच डॉक्टरांना थोडासा जड जाईल, बाकी सारा कचराच. कोण चड्डी! कोण पिंध्री!! आणि कोण लक्तरे!!! (म्हणजे कम्युनिस्ट). फार थोड्या फरकाने ही कुस्ती होणार आहे आणि विजयश्री डॉक्टर कुमार सप्तर्षींसाठी माळ घेऊन उभी आहे असे दिसते.

नगरचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे मतदारांचे गट्ठे. ब्राह्मण, पद्मसाळी, मुस्लीम, मराठा व गुजराथी-मारवाडी सर्वसाधारण बरोबरच आहेत. अगदी १५ ते १८ हजार अशा संख्येत. विशेष म्हणजे ते जातवार मतदान करीत नाहीत केवढे भाग्य!

नगर तालुक्यात जनताचे आहेत श्री. भाऊसाहेब कडिले, कॉंग्रेसने आ कि. बा. म्हस्के यांना तिसऱ्या खेपेस उभे केले आहे. 'तिकीट नाही तर मी कॉंग्रेसचा नाही!' म्हणून जिल्हा चिटणीसपदाचा राजीनामा देऊन अपक्ष उभे राहिलेले दादा पाटील शेळके उभे आहेत. येथे लढत आहे तिघांचीही. नेवासा तालुक्यातील पस्तीस गावे या मतदारसंघास जोडली असल्याने त्या गावचा लीड ज्या उमेदवारास मिळेल तो हमखास विजयी असे समीकरण आहे; परंतु कडिले गेली २०-२२ वर्षे सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते आहेत. सहकार क्षेत्रात त्यानी अनेक पदे भूषविली आहेत. जनसंपर्क दांडगा, तशात 'जनता'चे तिकिट, त्यामुळे दुधात साखर मिसळली गेल्याने नगर तालुकाही 'जनता'चे खिशात राहील.

शेवगाव-नेवासा मतदारसंघात राज्यमंत्री ए. बु. निंबाळकर (कॉं.) सभापति वसंतराव होंडे (जनता) व आ. वकीलराव लघे (कम्यु. उ.) अशी मजेशीर लढत आहे. वकीलराव लघे १९७२ साली याच मतदारसंघात उभे होते. त्यांना होंडे यांचे सहाय्य होते. आता होंडे बाजूला आहेत, तर राज्यमंत्री निंबाळकर यांना त्यांचा मूळचा मतदारसंघ जामखेड-कर्जत राखीव झाल्याने इकडे पळावे लागले आहे. राज्यमंत्री म्हणजे केवळ दम देणारा उमेदवार, अशी त्यांची ख्याती आहे; परंतु आता परंपरावादी मतदार नसल्याने निंबाळकर यांना हा मतदारसंघ सोडता येत नाही. साऱ्या ओळखी नव्याने करून घ्याव्याच्या. कॉंग्रेसमध्ये दररोज फाटाफुटीची लागण झाल्याने खुद्द कॉंग्रेस-नेते हबकले आहेत. राज्यमंत्र्यापेक्षा तालुक्याचे नेते श्री. मारुतराव घुले पाटील उभे केले असते तर परवडले असते, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. नेवाशाचे सभापती वसंतराव होंडे यांचे याउलट आहे. जनता पक्षाने ज्या काही जागा निश्चित केल्या होत्या त्यांपैकी होंडे यांची ही एक जागा होती. तरुण शेतकरी नेता सभापती असल्याने गावोगाव परिचय. याशिवाय पूर्वीचे समाजवादी-जनसंघाचे एकवटलेले बळ श्री. होंडे यांचे मागे आहे. विद्यमान आमदार वकीलराव लंघे यांची मात्र फरफट होत आहे. होंडे यांचा आधार तुटला. कम्युनिस्ट पक्षातील मंडळी मागेच कॉंग्रेसवासी झाली. सिंगल हँडेड म्हणून पक्षाचा आदेश म्हणून निवडणुकीत उतरावे लागल्याने परिस्थिती कठीण झाली. म्हणूनच येथे होंडे विरुद्ध निंबाळकर अशीच अटीतटीची लढत आहे

जनता पक्षाचा डोळे झाकून विजय होणारा प्रांत म्हणजे पाथर्डी-शेवगावकडील मतदारसंघ. अठ्ठावीस गावे या मतदारसंघाला जोडली आहेत. जनताचे वीर आहेत सतत चळवळी करणारे श्री. बबनराव ढाकणे. त्यांचे विरोधात कॉंग्रेसचे डॉ. यादव खेडकर.

हा तालुका वंजारी समाज जास्त असलेला तालुका. तशात उपरोक्त दोघेही त्याच समाजातील. यादव-खेडकर जरी या तालुक्यातील रहिवासी असले तरी गेली १६-१७ वर्षे व्यवसायामुळे औरंगाबादला स्थायिक झाले आहेत. त्यामुळे तालुक्यातीलच काय त्यांच्या खुद्द गावातील तरुणवर्ग त्यांना परिचित नाही! अफाट पैसा हेच त्यांचे भांडवल! चांगला चरकात सापडला घ्या पिळून, अशी कॉंग्रेस कार्यकर्त्यांचीच भावना. त्यामुळे 'आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास' अशी दयनीय अवस्था खेडकराची आहे; तर बबनराव ढाकणे यांची उलट स्थिती. अत्यंत तगडा, आंदोलन करणारा तरुण म्हणून तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात प्रसिद्धी. विधानसभेत पाथर्डी तालुक्याला विकासाचे कामी अन्याय होतो म्हणून पत्रके फेकून शिक्षा भोगणारा पठ्ठा! ज्या वेळी कारावासातून सुटला त्या वेळी आरुणे गाव लोटले होते त्याच्या स्वागताला! सभापती म्हणून केलेले पाझर तलाव, नाला-बंडिंगची कामे, सुशिक्षित बेकारांचे आंदोलन तर अगदी ताजे जवळपास हजार सुशिक्षित बेकारांना सत्याग्रहात खेचून तुरुंगाची दीक्षा दिल्याने आज गावोगावी 'बबनराव-बबनराव' असा घोष चालू आहे. जातीपातीचा प्रश्नच नाही! तरुण-म्हाताऱ्यांचा प्रश्न नाही. गरीब-श्रीमंतीचा प्रश्न नाही. केवळ एकच इच्छा-तालुक्याने ज्या नेत्यांवर विश्वास टाकला ते नेते गद्दारी करून कॉंग्रेसमध्ये गेले आणि कॉंग्रेस विरोधाची प्रतिमा मलीन केली. त्याचा सव्याज वचपा बबनरावांना विजयी करून काढण्याचा सकल्प येथे सुटला आहे.

जामखेड-कर्जत विभागांना राखीव जागा झाल्याने निंबाळकर शेवगावला पळाले म्हणून कॉंग्रेसने उदारपणे (!) मित्रपक्षाला जागा दिली. गवई गटानेही पुण्याहून ॲड. बाजीराव काबळे याचे पार्सल पाठविले, परंतु जनता पक्षाने ही जागा स्वतःच लढविली आणि उभे केले माजी समाजकल्याणमंत्री श्री. बाबूराव भारस्कर यांना. भारस्कर-कांबळे लढत होऊच शकत नाही. याशिवाय कांबळे म्हणजे हमखास पराभव, हे समीकरण येथे तरी का बदलावे? कारण बाजीराव काबळे यांनी लोकसभा, दोनदा विधानसभा, एकदा महापालिका व पुणे विद्यापीठ सिनेटपदाची निवडणूक लढविली. प्रत्येक वेळा अनामत गमावली. टेंभा भारी नवबौद्ध असल्याचा; पण उभे राहावयाचे मात्र राखीव जागेवर. नाही फौजफाटा, नाही परिचय, नाही कॉंग्रेसवाल्यांची साथ, तेव्हा 'हात' चोळीत बसणे एवढेच त्यांना जमेल! भारस्कर १९५२ पासून (५७ चा अपवाद वगळता) आजतागायत आमदार आहेत. जिल्ह्यातील मागासलेल्या समाजातील उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून सगळीकडे नोंद आहे. तेव्हा इतर अपक्ष आणि ॲड. बाजीराव कांबळे (सरचिटणीस-अ. भा. रिपब्लिकन पक्ष, पश्चिम

विजयश्री डॉक्टर कुमार सप्तर्षींसाठी माळ घेऊन उभी आहे असे दिसते.

महाराष्ट्र) यांना लौळवतील, यात संशय नाही.

एखाद्याचे व्यक्तिमत्त्व असे असते की, ते कुठेही असले तरी परके वाटू नये. श्रीगोंदा मतदारसंघात 'जनता'चे मोहनराव गाढे यांचेबाबत तसे झाले आहे. मोहनराव यांनी लोकसभा निवडणूक दक्षिण भागातूनच लढविली होती. त्यामुळे अपरिचितपणा नाही. जनता पक्षाने जिल्हा उपाध्यक्ष म्हणून भारस्करांसह दक्षिण भागात संघटना उभी करण्यात गेले दहा महिने घालविले. त्यामुळे कार्यकर्त्यांचा संच उभा राहिलेला आहे. काँग्रेसने त्यांचे विरोधात पूर्वाश्रमीचे लाल निशाणवाले श्रीगोंदा साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव नागवडे यांना उभे केले आहे. त्यामुळे गाढे विरुद्ध नागवडे हे दोन्ही एकारांती निकराची झुंज घेत आहेत! दोघानाही कार्यकर्त्यांचे पाठबळ, दोघेही परिस्थितीने चागले आहेत. अपक्ष फडणीस वकील फारसे काही करू शकणार नाहीत. तशी ही लढत तुल्यबळ आहे!

दक्षिण भागातला शेवटचा मतदारसंघ पारनेर. महाराष्ट्रातल्या दुष्काळटापूचा केंद्रबिंदू येथेच आहे. जनता पक्षाने मित्रपक्षाला दिलेली ही जागा. येथे मसकाँचे बाळासाहेब भगत तर काँग्रेसचे आ. शंकरराव काळे आहेत. १९७२ साली हीच जोडी एकमेकांविरुद्ध होती. बाळासाहेब भगत फारच थोड्या मतांनी पराभूत झाले होते. आता त्यांना मित्रपक्षाचे बळ आले आहे. जिल्हा सहकारी बँकेचे संचालक असल्याने शेतकरीवर्गात सतत सपर्क राहिला आहे. तशात बाळासाहेबानी सतत चळवळीत स्वत:ला अग्रभागी ठेवले आहे. आ. काळे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. मूळ कोपरगावचे; परंतु पारनेरला दत्तक आलेले उमेदवार! स्वत: एका सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. तालुक्यातला उमेदवार नाही, म्हणून काँग्रेस कार्यकर्ते नाराज आहेत. तथापि पारनेर तालुक्यासाठी काळे यांनी बरीच कामाची उतरड रचून ठेवली आहे, ही त्यांची जमेची बाजू आहे. शिवाय शुगर फॅक्टरीचा पैसाही कार्यकर्त्यांची समजूत घालील. तालुक्याचे ज्येष्ठ नेते माजी कम्युनिस्ट नेते आमदार भास्करराव औटी नुकतेच दिवंगत झाल्याने त्यांचे शिष्य कुणीकडे झुकतात, यावर येथील काळे-भगतांचे अवलबून आहे.

उत्तर भागाचा विचार करताना आपले डोळे फिरावेत, असे दृश्य आहे. अगदी साखरसम्राटाची उघड उघड साठमारी येथे आहे. फक्त अपवाद अकोला तालुक्याचा. हा आदिवासी विभाग. आदिवासी राखीव आहेत येथे श्री. एकनाथ देशमुख (जनता), बी. के. देशमुख (कम्युनिस्ट), आ. यशवंतराव भागरे (काँग्रेस) व सभापती मा. मधुकर पिचड (इंदिरा काँग्रेस) असा सामना आहे. या तालुक्यात समाजवादी-कम्युनिस्टांचे तुल्यबळ काम होते, तर भागरे आमदारकीचे काळात बरेच सुधारले. त्यामुळे मिळेल त्या पद्धतीने निवडणूक जिंकण्याचे मनसुबे ते रचीत आहेत. तथापि त्यांचा पराभव श्री. बी. के. देशमुखानी एकदा व श्री. नारायण नवाळी (समाजवादी) यांनी एकदा केला होता. आज जनता पक्षाजवळ उत्कृष्ट कार्यकर्त्यांचा संच आहे. विडी-कामगार संघटना आहेत. तालुक्यातील अनेक ग्रामपचायती व सहकारी सस्था ताब्यात आहेत व सतत आदोलनामुळे जनता पक्षाचा दबाब मोठा आहे. कम्युनिस्टाचे बळ फारच घटले आहे. श्री. पिचड तर केवळ १५ दिवस जनतात राहिले. तिकिटाअभावी इंदिरा काँग्रेसमध्ये गेले म्हणून श्री. एकनाथ देशमुख यांची खरी लढत आता काँग्रेसशी आहे व त्यात श्री.देशमुख यशस्वी होतील.

बाकी संगमनेरात मा. भाऊसाहेब थोरात (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अध्यक्ष, सगमनेर साखर कारखाना सस्थापक, अध्यक्ष व आ. अण्णासाहेब शिंदे यांचे मेहुणे) काँग्रेसचे तर मसकाँचे बी. जे. खताळ पाटील (माजी मत्री) यांच्यात सामना आहे. खताळ पाटील यांना तिकिट देऊ नये, अशी इच्छा जनता पक्षीयांनी व्यक्त केली होती; परंतु मित्रपक्ष म्हणून ते उमेदवार ठरले व त्यांनी निशाणीही 'जनता'ची घेतली. त्यामुळे विरोध मावळला. श्री. भास्करराव दुर्वे याच्यासारखा ज्येष्ठ नेता व सारी यत्रणा खताळांचे पाठीशी उभी राहिली. मंत्री असताना, नाही म्हटले तरी स्वार्थापोटी का होईना, खताळ पाटलांनी संगमनेर तालुक्यात अनेक योजना राबविल्या, हे लोक विसरू शकत नाहीत. त्याचा फायदा आहेच. शिवाय अनेक कार्यकर्ते मसकांत गेले आहेत. त्यातून थोरात यांची यंत्रणा बरीच ढिली आहे. काँग्रेसमध्ये फाटाफूट आहे. हैदर पाली तर चक्क इंदिरा काँग्रेसतर्फे उभे आहेत. त्यामुळे काँग्रेसचे बळ कमी झाले आहे. म्हणून मसकाँला येथे विजय निश्चित आहे.

महाराष्ट्राचे लक्ष वेधावे अशी लढत श्रीरामपूर येथे चालू आहे महाराष्ट्र काँग्रेसचे सरचिटणीस, अशोक सहकारी साखर कारखान्याचे नेते आ. गोविंदराव आदिक यांच्याविरुद्ध सतत सोळा वर्षे श्रीरामपूर पालिकेचे अध्यक्ष असलेले जनार्धनपंत टेकावडे याना ',जनता 'ने उभे केले आहे दादागिरी विरुद्ध समाजाचा कौल येथे मागितला जात आहे. गोविंदराव आदिक यानी केलेला संजय गांधीचा उदोउदो त्यांना पदोपदो नडतो आहे. एवढेच नव्हे तर खुद्द थोरले बंधु बॅ. रामराव आदिक अॅडव्होकेट जनरलशिप सोडून इंदिरा काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रचारसूत्रधार झाल्याने 'गोविंदराव, अद्याप तुम्ही चड्डीकडे कसे?', अशी पृच्छाही त्यांना होत आहे. गोविंदराव कितीही सफाई करीत असले तरी त्यांचा आता काँग्रेस कार्यकर्त्यांनाही विश्वास वाटत नाही. म्हणजे अपयशाकडे किती वेगाने जायचे तेवढेच ठरायचे आहे. जनताचे श्री. टेकावडे यांची सारी प्रचारयत्रणा गेले तीन महिने तयार होती, एक बडे प्रस्थ श्री. भास्कर पां. गलांडे, टेकावडे याच्या जोडीला आहेत तशात जिल्हा जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. गगाधर ओगले साखर कामगाराचे नेतृत्व करीत आहेत. म्हणजे शेतकरी कामकरी येथे हातात हात घालून टेकावडे यांची यत्रणा राबवीत आहेत खुद्द श्रीरामपूर शहर तर टेकावडे याना खांद्यावरून मिरविते आहेच. याचा फायदा 'जनता'चा विजय असा आहे.

पैशाची धूळधाण बघावयाची तर चला, कोपरगाव गाठा. साखरसम्राट आ. शंकरराव कोल्हे (संजीवनी सह कारखाना, अध्यक्ष) येथे काँग्रेसचे उमेदवार आहेत. (१९७२ ला बडखोर म्हणून अधिकृत काँग्रेस उमेदवारांचा पराभव यांनीच केला.) तर त्याचेच उजवे हात समजले गेलेले श्री. पंडितराव जाधव जनता पक्षातर्फे उभे आहेत एखादी लढाई सुरू असावी त्या वेळी जसे रणगाडे, तोफा, बंदुकी, दारूचे साठे जय्यत दिसतात तशा

पृष्ठ २८ वर

# तीन निवडणूक वार्ता

बंडू ठाणेकर

## सोलापूर

### ' मूड ' काही वेगळाच आहे.

## ठाणे

### आज चित्र गोंधळाचं आहे.

## विदर्भ

### इंदिरा कॉंग्रेस धक्के देणार....पण....

---

१ : सोलापूर

## पन्नालाल बिनधास्त

सिद्धेश्वर एक्स्प्रेसनं मी कुर्डुवाडी स्टेशनवर उतरलो. एस्. टी. न पढरपूरची वाट धरली आणि माझ्या मनातल्या कल्पनांना पहिला धक्का बसला. सोलापूर जिल्हा पहिल्यापासून कॉंग्रेसचा जिल्हा. अगदी पारंपारिक कॉंग्रेसवासी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या धामधुमीत आ णि नंतर जनता-लाट कॉंग्रेसला पार भुईसपाट करीत सुटलेली असताना देखील सोलापूर जिल्ह्यान कॉंग्रेसची संगत सोडली नाही! ७७ च्या लोकसभा निवडणुकीत पैशानही कमी पडू नये म्हणून जनतानं आण्णाप्पा काडादींना खा. दमाणीच्या विरुद्ध उभं केल; पण उपयोग काडीचा झाला नाही. दमाणी बिनधास्त निवडून आले!

एवढं असलं तरी ह्यावेळी सोलापूरच्या प्रकृतीत नक्कीच फरक पडलेला असावा, असं मला वाटत होतं. एक तर केंद्रस्थानी जनता अधिकारावर आहे. शाह आदी आयोगानी कॉंग्रेसी राजवटीची लक्तरं वेशीवर टांगली गेली आहेत. शिवाय कॉंग्रेसमधली फाटाफूट झपाटयानं वाढत आहे. ह्या पार्श्वभूमीवर पढरपुरात शिरताना कॉंग्रेसविरोधी हवा जाणवेल. अस वाटत होत; पण बसमधल्या सहप्रवाशाचा सवाद ऐकला आणि माझ्या कल्पनेला तडा गेला. एकूण निवडणूक हाल-चालीची चर्चा सहप्रवाशात चालू होती आणि पढरपुरात उतरताना त्यांच आपसात एकमत झालेल होतं, '...परिचारक उभे राहू देत नाही तर भाई सगर, जिकणार

औदुंबर पाटीलच !'

मी सहज त्यातल्या एकाला हटकलं—त्याचं उत्तर आलं—' पाव्हणं, शेवटी काँग्रेसच चागली आणि आले दुसरे कुणी निवडून, तरी ते वेगळं असं करणार तरी काय ? मग आहे ती काँग्रेस काय वाईट ?'

ठाण्यात हिंडताना मी खूप उलटसुलट चर्चा ऐकल्या होत्या. तावातावानं गाजलेल्या इंदिराजी, काँग्रेस ह्यांना लाखोली वाहाणाऱ्या, त्यांच्यावर स्तुतिसुमनंच उधळणाऱ्या ! पण इथला खाक्या काहीसा वेगळाच होता. चर्चा संथ होती; थंड होती. निर्णय सरळसोट होता. खळखळ फिळखळही नव्हती. पंढरपुरात पाय ठेवताना ही जाणीव निश्चितच मनात रेंगाळत होती...

एखाद्या गोष्टीला, कामाला सुरुवात करताना देवदर्शन करावं, अस म्हणतात. सोलापूर जिल्ह्याला पंढरपुरपासून सुरुवात करताना ते आपोआपच घडलं; पण गमत ही की, ह्या परिसरातनं हिंडताना, देशातल्या राजकीय उलथापालथीत फारसा रस या भागात नसावा असं वाटलं मात्र जरूर ! प्रत्यक्ष उमेदवारांच्या कळपांमध्ये शिरलो तेव्हा अर्थातच राजकीय चर्चांचे आखाडे रंगले; पण सर्वसामान्य जनता निवडणुकाबाबत फारशी काही उत्सुक वाटली नाही. पुढे जिल्हाभर हिंडताना देखील हे अनेकदा जाणवलं सोलापूर, बार्शी असे एक-दोन अपवाद वगळता सर्वत्र थंडा मामलाच जाणवला. ठाण्याहून सोलापूरकडे वळताना हा विरोधाभास चांगलाच जाणवला !

सोलापूर जिल्ह्यातही एकूण १३ मतदारसंघ आहेत. लोकसभेच्या दोन मतदारसंघांचा हा जिल्हा. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ह्या दोन्ही जागा काँग्रेसनं जिंकलेल्या आणि तशा त्या पूर्वापार काँग्रेसकडेच जात राहिलेल्या. विधानसभा निवडणुकातही आजपर्यंत ह्या जिल्ह्यात विरोधकांना क्वचितच यश मिळालेलं आहे. साहजिकच जनता पक्षालाही, काँग्रेसच्या जिल्ह्यातल्या ह्या ताकदीची पूर्ण जाणीव आहे आणि म्हणूनच कदाचित, जनता पक्ष, अधिकृतरीत्या तेरापैकी फक्त पाचच जागा लढवीत आहे उर्वरित जागा जनता पक्षानं मित्रपक्षांमध्ये वाटून टाकलेल्या आहेत. पंढरपूर, माढा वगैरे काही ठिकाणी जनतानं आता काही पुरस्कृत उमेदवार शेकापच्या उमेदवारांविरुद्ध उभे केले आहेत; पण त्यात फारसं तथ्य नाही, हे ते स्वतही जाणून आहेत.

वृत्तपत्रातल्या बातम्यावरून, इंदिरा काँग्रेसनं पश्चिम महाराष्ट्रात सर्वांत जास्त धमाल उडवून दिली ती सोलापूर जिल्ह्यात, असा एक माझा समज होता. शहाजीराव पाटील, कुचन बंधू, झाडबुके वगैरे मातबर नावांमुळे तसा दबदबाही निर्माण झाला होता; पण ह्या पुढाऱ्यांपाठोपाठ फार मोठा कार्यकर्त्यांचा ताफा इंदिरावादी न झाल्यानं, जाणवण्याजोगा परिणाम इंदिरालाट घडवून आणीलसं वाटत नाही. तथापी, इंदिरा काँग्रेसचे उमेदवार बहुसंख्य जागांवर उभे असून त्यामुळे पारपारिक काँग्रेस मतं विभागली जायची शक्यता नाकारता येणार नाही; पण पंढरपूरचे विद्यमान आमदार औदुंबर पाटील ह्यांनी सांगितल्याप्रमाणे, 'ह्या मतविभागणीमुळे काँग्रेसच्या विजयाचं 'मार्जिन' थोडंफार घटेल एवढंच... आम्ही आतापर्यंत पंधरा वीस हजारांपेक्षा कधीच कमी लीड घेतलेला नाही. इंदिराबाईच्या उपद्व्यापांमुळे हा लीड कदाचित् पंधरा-वीस वरून सात-आठ हजारांवर येईल एवढंच ! ह्यापलीकडे काही फारसं घडणार नाही. आमच्या मतदारसंघापुरतं बोलायचं तर, माझा विजय निश्चित आहे !'

काँग्रेसच्या सोलापूर जिल्ह्यातल्या ह्या जबरदस्त ताकदीला, आत्मविश्वासाला जनता व मित्र पक्ष एकसंध उभे राहिले असते तर कदाचित् शह बसूही शकला असता; परंतु दुर्दैवानं परिस्थिती मात्र अगदी भिन्न आहे. मित्रपक्षाना दिलेल्या जागाबाबत जनताच्या कार्यकर्त्यांमध्ये फार मोठी नाराजी आहे. त्यामुळे पंढरपूर, माढा, उत्तर सोलापूर (शहर) वगैरे अनेक ठिकाणी मित्रपक्षाच्या उमेदवारांना मदत करण्याऐवजी जनता कार्यकर्त्यांनी त्यांच्या विरोधात स्वत चे उमेदवार उभे केलेले आहेत. त्यामुळे आधीच कमजोर असलेल्या जनता पक्षाची परिस्थिती आणखीनच खालावलेली आहे...

जनता पक्षाला आणखीनही एका बाजूनं आशा वाटत होती. मोहिते पाटील (अकलूज) आणि शंकरराव सोनावणे हे सोलापूर जिल्ह्यातले दोन प्रमुख गट, तर खुद्द सोलापूर शहराच्या आर्थिक नाड्या ज्या साळी समाजाकडे आज आहेत त्यातला नामदार बेत ह्यांचा वजनदार असा तिसरा गट. हे तीनही गट बरेचदा एकमेकाविरुद्ध डावपेच लढवीत असतात. ह्याच्यातल्या अतर्गत बेकीचा फायदा जनताला मिळावा अशी जनताची अपेक्षा; पण ह्या गटांनी आज तरी स्वत:ला लगाम घातलेला दिसतो. इंदिराबाईंकडे मोहितेपाटील आणि बेत त्यांच्या अनुयायांसह जातील असं शेवटच्या क्षणापर्यंत वाटत होतं. अनेकांची ती अपेक्षा होती; पण तेही घडून आलं नाही आणि काँग्रेस थोड्याशा पडझडीनतरही आहे तशीच आहे. आणि तिन्ही गटांच्या ह्या तिन्ही प्रमुखानी म्हणूनच अगदी ठामपणे सांगितलं, 'सोलापूर जिल्ह्यातल्या तेरापैकी किमान अकरा आणि बहुधा सर्वच्या सर्व जागा काँग्रेसच जिंकणार!' सुशीलकुमार शिंदेही त्याच थाटात म्हणूनच पुढे विचारतात, 'विरोधी पक्ष इथे आहेच कुठे ? त्यांचं काही काम तरी आहे का ?'

आणि सोलापूर जिल्ह्यातनं हिंडताना विरोधी पक्षाचा अभाव जाणवतही होता, अगदी पदोपदी. पंढरपुरात 'प्रहार'चे जोशी व सोलापुरात इतरानी सागितलेला किस्सा ह्या दृष्टीन अतिशय बोलका आहे. मुंबईला जनता पक्षाकडे तिकिटांसाठी जेव्हा रस्सीखेच चालू होती, तेव्हा धादल उडालेली दिसत होती ती प्राय: पुणे—मुंबई, प. महाराष्ट्रातले इतर जिल्हे वगैरे ठिकाणच्या मंडळीची. सोलापूरकर त्यात अभावानच होते. इतके की, सोलापूर जिल्ह्यासाठी नावं शोधून काढायचीच वेळ यत होती. जी गोष्ट जनताची तीच शेकाप ह्या दुसऱ्या प्रमुख विरोधी पक्षाची. एकूण सोलापूर जिल्हाच तसा विरोधी मंडळीनी उपेक्षिलेला. काही अंशी काँग्रेसला आंदण देऊन टाकलेला !

ह्या सर्वसामान्य पार्श्वभूमीवर हा जिल्हा निवडणुकाना सामोरा जात आहे. बलशाली काँग्रेस, काहीसा दुर्बल विरोधक. अस असल तरी सोलापूर जिल्ह्यात तीन—चार लढती चांगल्या व्हायची शक्यता आहे. पंढरपूर, बार्शी, सांगोला आणि सोलापूर शहर दक्षिण ह्या त्या तीन—चार लढती. ह्या ठिकाणी कदाचित् काँग्रेस विरोधकाना विजय मिळूनही जाईल.

पंढरपुरात काँग्रेसचे औदुंबर पाटील

विरुद्ध परिचारक (जनतापुरस्कृत अपक्ष) किंवा शेकापचे भाई सगर अशी सरळ लढत झाली असती तर काँग्रेसला ही जागा कदाचित् गमवावीदेखील लागली असती; पण औदुंबर पाटलांविरुद्ध हे दोघंही उभे आहेत. शिवाय इंदिरा काँग्रेसतर्फे बजरंग बागल उभे आहेत; पण इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराचा गंभीरपणे विचार करायची आवश्यकता आहे, असं वाटत नाही. इंदिरा काँग्रेसच्याच श्री. जोशीनी मला सांगितलं, 'आजचे हे इंदिराप्रवेश तसे तत्त्वशून्य आहेत. गटबाजीत कुठे काही फिस्कटल की, स्वतंत्रपणे, अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी करून निवडणूक लढवायची हा काँग्रेसच्या राजकारणातला पूर्वापार चालत आलेला नियम. अगदी अहमदनगरच्या भारस्करांनीदेखील अवलबिलेला. आज त्याला इदिरावादाच गोंडस स्वरूप मिळालेलं आहे, एवढच !' सोलापुरात व नंतर बार्शीला तर काहीनी अशीही मल्लीनाथी केली की, 'ह्याखेरीज इंदिराबाईंकडून अशा व्यक्तीना खिरापत मिळते ती वेगळीच ! 'चड्डी' विरोधात उभं ठाकायला जर फुकटात २५००० रु मिळत असले तर कुणाच्या बाचं काय जात ?'

पंढरपुरात, तसं पाहिलं तर जनताचंही काही खास कार्य नाही आणि शेकापचंही नाही पण औदुंबर पाटील ह्या काँग्रेसच्या विद्यमान आमदाराचंही खास असं काहीच काम पंढरपुरात नाही. त्यामुळेच शेकापच्या सगरना किंवा जनताच्या परिचारकांना विरोधकांचा एकमुखी पाठिंबा मिळाला असता, तर काँग्रेसकडे कायम झुकलेलं पंढरपूरचं मत विरोधकाना स्वतःकडे वळवून घेता आलं असतं. परिचारक हे तसे शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही परिसरांत चांगले परिचित आहेत. परिचारक घराण्यालाही पंढरपुरात चांगला मान आहे. वेळी–अवेळी लोकांच्या प्रश्नासाठी धाव घेणारी व्यक्ती म्हणून परिचारकांची बहुजन समाजातही चांगली पत आहे; पण लोक काहीसे वैतागलेले वाटले त्यांच्या धरसोड प्रवृत्तीला. सांगोल्याचे शेकापचे मान्यवर पुढारी देशमुख, पंढरपुरातल्या आपसातल्या दुहीचा दोष परिचारकांना देतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, परिचारकानी शेकापमध्ये यावं, पंढरपूरची समन्वय समितीनं शेकापसाठी सोडलेली जागा लढवावी असे प्रयत्न शेकापनं केले होते; पण परिचारकांनी आपल्याला उभंच राहयच नाही, असं सांगितलं. पुढे तर भाई सगट ह्यांच्या उमेदवारीला पाठिंबाही जाहीर केला... आता मात्र स्वतः उभे !

परिचारकांना निवडणुकीच्या रिंगणात आणलं, खेचलं ते जनतातल्या पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांनी ! पंढरपूरची जागा, समन्वय समितीनं शेकापसाठी सोडावी हे त्यांना मुळीच रुचलं नाही. त्यांच्या मते ह्या जागेवर जनसंघाचा म्हणजे 'जनता'चा अधिकार आहे. कारण, पंढरपुरात त्यांचं वर्चस्व आहे.

शेकापच्या भाई सगर ह्याना हा दावा अमान्य आहे. ह्या मतदारसंघाचा अंदाजे सत्तर टक्के भाग ग्रामीण परिसरातला आहे आणि तिथे 'जनता' पोचलेली नाही हा त्यांचा दावा. त्यांच्या मते एकदा ही जागा नेतृत्वानं शेकापसाठी सोडल्यानंतर पुढे वादावादी व्हायला नको होती...

तर ह्या वादावादीत, ही जागा अगदी निश्चित झोपून, औदुंबर पाटील जिंकणार असं तिथल्या श्री. अडम, अभ्यंकर गुरुजी आदींनी चर्चांमधनं सांगितलं, तर इतर काहींच्या मते परिचारक चागली 'फाइट' देऊ शकतील; पण तिथेही असा इशारा जरूर मिळाला की, परिचारकांनी 'जनता' ची साथ घ्यायच्याऐवजी शेकापची घ्यायला हवी होती. कारण जनता म्हणजे जनसंघ हे समीकरण पंढरपूरकरांनी तर प्रमाण मानल्यासारखं दिसत आणि पंढरपूरचा इतिहास सांगतो की, बडवे, तात्यासाहेब गुर्जर, बाबुराव जोशी वगैरे मंडळी, खूप लोकप्रियता पाठीशी असूनही कधी निवडून येऊ शकली नाही. भाई सगरना स्वत.ला निवडून यायची खात्री वाटते, परिचारकांनाही विश्वास वाटतो ... तरी पंढरपुराहून बार्शीची बस पकडताना मला जाणवत होतं ते एवढंच की, आज तरी आघाडी औदुबर पाटलांची आहे.——

बार्शीची परिस्थिती त्या मानानं भिन्न आहे आणि सोलापूर जिल्ह्यात रेड्डी काँग्रेसला जिथे अजिबात आशा नाही, असा हा एकच मतदारसंघ असावा असं मला वाटतं. जनता पक्षानंही तिथे अत्यंत मातब्बर असा उमेदवार उभा केलेला आहे– पन्नालाल सुराणा ! पन्नालालजीचं नाव महाराष्ट्राला नवीन नाही. खुद्द बार्शीतही त्यांचं काम उत्तम आहे. सुरुवातीला, प्रभावतीबाई झाडबुके इंदिरा काँग्रेसतर्फे बार्शीतून निवडणूक लढवणार असं घोषित झालेलं; पण उमेदवारांची जी अधिकृत यादी प्रसिद्ध झालेली आहे तीत बाईंचं नाव नाही. एका दृष्टीनं सुराणांचा मार्ग त्यामुळं बराचसा सुकर झालेला आहे. बाई असत्या तर, झाडबुके ह्या नावानं महाराष्ट्रभर जे वादळ मध्यतरी उठलं होतं ते विचारात घेऊनही, स्वतःच्या व्यक्तिगत प्रभावामुळं त्या सुराणांशी चांगली टक्कर देऊ शकल्या असत्या; पण त्यांच्या अनुपस्थितीत आणि काँग्रेसबद्दलच्या त्यांच्या आजच्या नाराजीमुळं, काँग्रेसचे घोषित उमेदवार श्री. देशमुख सुराणांच्या मुकाबल्यात कितपत उभे राहू शकतील ह्याची शंका आहे. सोलापूरच्या वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचं आंदोलन, रेल्वेसंपातली व तदनंतर आणीबाणीतली त्यांची कामगिरी आणि त्यांचा तुरुंगवास, त्यांची त्यांच्या कार्यासंबंधीची तळमळ नि निरलसता, प्रामाणिकपणा. सुराणाविषयी सर्वसामान्यपणे त्यांच्या मतदारांमध्ये आदराची भावना आहे. काँग्रेसच्या व त्यातही प्रामुख्याने झाडबुक्यांच्या अलिप्ततेमुळे, सुराणांच्या उमेदवारीमुळं आणि 'जनता'तल्या मतभेदांच लोण फारसं ह्या मतदारसंघात पसरलेल नसल्यामुळं, सुराणा बिनधास्त निवडून येतील असं भाकित करायला हरकत नाही. अगदी शेकापनं आपला उमेदवार उभा केला आहे हें लक्षात घेऊनसुद्धा ! ...

सोलापूर जिल्ह्यातला आणखी एक मतदारसघ विरोधकांना हमखास मिळेल असा विश्वास वाटतो तो सागोल्याचा ! सांगोला हा शेकापचा बालेकिल्ला ! आणि आजही तो अबाधित आहे असं मला वाटतं. इथेही जनतापुरस्कृत उमेदवार आहे; पण त्याचा काँग्रेस–शेकाप लढतीवर फारसा परिणाम होईलसं वाटत नाही. शेकापच्या देशमुखाचं इथे काम आहे, लोक त्यांच्या पाठीशी आहेत. ते विद्यमान आमदार आहेत. इंदिरालाट असतानासुद्धा निवडून आलेले. आज तर इंदिरालाटेचा परिणाम काँग्रेसची मतं फोडून शारदादेवीचे चान्सेस कमी करण्यातच झाला तर होईल.

ह्याखेरीज खुद्द सोलापूर शहर दक्षिणची

लढत रंगण्याची शक्यता आहे. रेड्डी काँग्रेसच्या विद्यमान आमदार निर्मलाताई ठोकळ तिथे इतर नऊ जणांशी लढत घेत आहेत. जनताचे भीम रोणे ह्या परिसरात चांगलेच लोकप्रिय आहेत. धडाडीचे कार्यकर्तेही आहेत आणि त्यांची निर्मलाबाईंबरोबरची लढत रंगावी अशी अपेक्षा आहे. ह्याखेरीज हिंदुसभेचे वि. रा. पाटील, कम्युनिस्टांचे गगाचार्य हे देखील उमेदवार आहेत आणि त्यानी मिळवलेली मते जनता–काँग्रेसच्या लढाईचा निर्णय ठरवू शकतील; पण ह्या मतदार-संघाचं पाढरपेशं स्वरूप पाहता, तिथली कामगार संख्या पाहता, अटीतटीच्या लढतीत, भीम रोणे बाजी मारून नेण्याची शक्यता आहे.

उर्वरित सोलापूर जिल्ह्यात, काँग्रेसच बलशाली ठरावी असा होरा आहे. नामदेवराव जगताप, शंकरराव सोनावणे, यशवंतराव मोहिते पाटील, सुशीलकुमार शिंदे वगैरे मडळी निश्चितपणे विधानसभेत जावीत.

एकंदरीत सोलापूर जिल्हा काँग्रेसी परंपरा मोडायच्या 'मूड'मध्ये नाही असं वाटतं. तेरा जागापैकी आठ–नऊ जागा काँग्रेसकडे, दोन–तीन जनताला, एक शेकापला असं साधारण चित्र राहील असा माझा होरा आहे.

□

---

## २ : ठाणे

# जनता विरुध्द शिवसेना

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी मी ठाण्यातून फेरफटका मारला होता. जनताचे रामभाऊ म्हाळगी विरुद्ध काँग्रेसचे पा. शि. देशमुख अशी जवळजवळ सरळ लढत होती. काही अलबते–गलबते होते, पण त्यांचा कुणीच फारसा विचार करत नव्हतं. शिवसेना हा ठाण्यातला तसा विचारात घेण्याजोगा 'फोर्स.' आपल्या नेहमीच्या निर्लज्ज कोलांट्या उड्या घेत घेत शिव-सेनेनं लोकसभा निवडणुकाच्या वेळी इंदिरा-बाईंच्या बाजूनं शड्डू ठोकला होता एवढं होतं तरी, एकदर 'मूड' बघून म्हाळगी वरचढ ठरतील असा बहुतेकाचा होरा होता. शेवटी झालही तसच आणि ठाणेकरांनी रामभाऊना खासदारकी बहाल केली. काँग्रे-सच्या परपरागत बालेकिल्ल्यात, जनताची विजयपताका फडकावली !

आज महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका तोंडाशी आल्या असताना पुन्हा एकदा फेर-फटका मारायची वेळ आली आणि प्रकर्षानं जाणवलं ते हे की, लोकसभा विजयाची पार्श्वभूमी, खा. म्हाळगीचे नंतरचे मतदार-संघातले दौरे वगैरे सर्व जमेच्या बाजू असू-नही, जनताला या वेळी निवडणुका फार सोप्या जाणार नाहीत. पूर्वी विरोधकात दुफळी असायची. मतविभागणी व्हायची आणि काँग्रेस आपसूक निवडून यायची. नेमकं तसच ह्यावेळी जनता पक्षाबाबत घडायची शक्यता आहे. 'जनता' आणि मित्रपक्ष ह्या आघाडीत लाथाळ्या आहेत, बेबनाव आहेत; पण गंमत ही की त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणात, विरोधी मंडळीत भाडणं आहेत. त्याचा निश्चित फायदा मिळून 'जनता'च पारडं किंचित जड होत आहे. एरवी प्रामाणिक मत द्यायचं तर, चित्र अद्यापही चागलंच गोंधळाच आहे.

ठाणे जिल्ह्यात एकूण तेरा जागा आहेत विधानसभेत. पैकी, डहाणू ( राखीव ), आणि वसई ह्या मतदारसंघातच फक्त तिरंगी लढती आहेत. इतरत्र सर्वत्र चौरंगी, पंचरगी वा अनेकरंगी लढती आहेत. डहाणूची लढत तर जवळजवळ सरळ लढत आहे. मार्क्सवादी कम्युनिस्टाना ही जागा 'जनता'न दिलेली आहे. रेड्डी काँग्रेस उमे-दवाराविरुद्ध मा. कम्यु. कॉ. चव्हाण ही जागा सहजी जिंकतील असं म्हणायला हरकत नाही. जव्हारच्या राखीव मतदार-सघातही अशीच रेड्डी काँग्रेस विरुद्ध मार्क्स-वादी लढत आहे. लोकसभेच्या वेळचा हा भिवंडी राखीव मतदारसंघ. मार्क्सवाद्यांनी हातोहात जिंकलेला. शिवाय गोदाराणीची पुण्याई त्यांच्या पाठीशी उभी आहेच !

शहापूरमधन हिंडताना 'जनता' हवा, जनताच नाव कुठे फारसं ऐकू येत नाही आणि म्हणूनच कदाचित्, भांडण-बखेडा होऊनही ह्या राखीव मतदार सघात, जन-तान 'शेकाप'ला पाठिंबा दिलेला आहे; शेकापचाच इथे दबदबा आहे, तर रेड्डी काँग्रेसचा हा बालेकिल्ला आहे. तिसरा उमेदवार आहे तो शिवसेनेचा. 'जनता शेकाप फाटाफुटीमुळे, जनताचे कार्यकर्ते आम्हालाच मदत करतील,' असं शिवसेना गटानं मला शहापुरात सागितलं, पण तो काहीसा भ्रम असावा. मला दिसलं ते चित्र असं की, जनता कार्यकर्ते शेकापच्या बाजून तरी उभे आहेत किंवा चक्क कल्याण मत-

दार सघात तरी निघून गेलेले आहेत. इथे लढत खऱ्या अर्थानं होणार ती रेड्डी कॉंग्रेस आणि शेकापमध्ये ! आणि शक्यता आहे, शेकापच्या विजयाची ! !

वसईची लढतही चांगली गाजावी. ताराबाई वर्तक इथे रेड्डी कॉंग्रेसच्या वतीने उभ्या आहेत. भाऊसाहेब वर्तकाचा वसईतला दबदबा त्यांच्या पाठीशी आहे; पण त्याचबरोबर ठाणे जिल्हा परिषद, ठाणे जिल्हा कॉंग्रेसमधल्या ताराबाईंच्या 'व्यक्तिगत कर्तृत्वान' त्याची स्वत:चीही प्रतिमा ह्या जिल्ह्यात आहे. खुद्द वसई तर भाऊसाहेबांचीच जणू ! तिथला फार मोठा किरिस्तॉव समाज त्यांनी खिशात घातलेला, तर कॉंग्रेसची पार्श्वभूमी असल्याने, 'बहुजन समाजही आमचाच' हा त्यांचा दावा ! ! उभा जन्म आम्ही इथल्या मातीशी इमान राखून, जनतेची सेवा करण्यात घालवला आहे. जनता लाटेचा निदान वसईकरांवर तरी परिणाम होणार नाही', असा ताराबाईंना विश्वास वाटतो.

परंतु ह्याच वसईनं, लोकसभा निवडणुकीत खा. मृणाल गोरेंना जबरदस्त आघाडी मिळवून दिलेली होती आणि आज तिथन ताराबाईंना विरोध करीत आहेत पूर्वाश्रमीचे समाजवादी, मृणालताईंच्या विश्वासातले पंढरीनाथ चौधरी. ह्या मतदारसघात जनता पक्षात नाराजी नाही, अंतर्विरोध नाहीत आणि गंमत ही की, छोटेमोठे रस्त्यारस्त्यातून स्वयस्फूर्तीनं चौधरीपुढे उभे ठाकलेले दिसतात. कार्यकर्त्यांची फळी उभी राहिलेली दिसते. वसईची ही निवडणूक चागलीच गाजणार आहे. एका बाजूला सत्तास्थानी असलेल्या ताराबाई वर्तक तर दुसरीकडे सामान्य जनतेची सहानुभूती मिळालेले, कार्यकर्त्यांची फळी पाठीशी असलेले पंढरीनाथ चौधरी ! एका कॉंग्रेस कार्यकर्त्यानं ह्या पार्श्वभूमीवर मला सांगितलं, 'वर्तक कुटुबाला, त्यांच्या मिरासदारीला कॉंग्रेसमध्येच खूप विरोध आहे. ते उभे राहणार नाहीत, त्यांना तिकीट मिळणार नाही, हे ऐकून कॉंग्रेसचा सामान्य कार्यकर्ता खूष होता; पण ताराबाईंच्या आडून वर्तकांनी आपला डाव साधला आहे...कॉंग्रेसप्रचाराला इथे धार येत नाही, नवीन दमाचा तरुण कार्यकर्ता उत्साहानं पुढे येत नाही, त्याचं कारणही हेच !'

ह्याच मतदारसघात शिवसेनेनं मयेकर ह्याना उभं केलेलं आहे; पण ते लढतीवर फारसा प्रभाव टाकू शकतील असं वाटत नाही. सध्या तरी तराजूत खऱ्या अर्थानं ताराबाई वर्तक आणि पढरीनाथ चौधरीच आहेत आणि दोन्ही पारडी सारखीच जड आहेत. मृणालताईंच्या एक-दोन वसईभेटींनंतर चौधरीचं पारडं जड व्हायला हरकत नाही...कारण पाणीवाल्या बाईंचा तेवढा प्रभाव ह्या मतदारसंघावर निश्चितच आहे...

उल्हासनगरची लढत तशी अगदीच एकतर्फी आहे. ठाणे जिल्ह्यात, ह्या मतदार संघात सर्वांत जास्त उमेदवार रिंगणात असले तरी, 'जनता'शिवाय कुठलाही मातब्बर पक्ष विरोधात नाही आणि सर्व पक्षानी जणू जनताला ही जागा आंदणच देऊन टाकल्यासारखी आहे.

ठाणे जिल्ह्यात खऱ्या अर्थानं गाजणाऱ्या महाराष्ट्राचं लक्ष वेधून घेणाऱ्या लढती, वसईनंतर ठाणे-कल्याण परिसरात लढल्या जाणार आहेत. त्यातला कल्याण मतदारसघ खऱ्या अर्थानं शेकापच्या धुळपांचा; पण ह्या वेळी मतदारसघातल्या डोंबिवली परिसराच्या वाढत्या प्राबल्याच्या आधारावर कल्याण न. पा. च्या अध्यक्षपदावर जनताचे श्री. जोशी निवडून आल्याच्या आधारावर जनता पक्षानं प्रा. राम कापसे ह्यांनाही ह्याच मतदार संघातनं उभं केलेलं आहे. ह्या दोन मातब्बर उमेदवारांच्या जोडीला कॉंग्रेसनं नामदेव आहेरांना आणि शिवसेनेनं शाहीर साबीर शेखना उभं केलेलं आहे. हे दोन्ही उमेदवार देखील चांगलेच वजनदार आहेत. आकडेवारीच मांडून इथलं हे चौरंगी गणित सोडवायचं असेल, तर प्रा. राम कापसे ह्याची बाजू उजवी दिसते. ह्या दोन मतदारसंघांत प्रामुख्यानं समावेश होतो तो कल्याण आणि डोंबिवली नगरपालिका परिसराचा. ग्रामीण भागही अंदाजे ४०% आहे. ह्या दोन्ही नगरपालिकांत जनताचं वर्चस्व आहे. त्यांचे नगराध्यक्ष आहेत. ग्रामीण परिसरातल्या एक-दोन पंचायत समित्याही जनताकडे आहेत. मुंबईच्या सान्निध्यामुळे ग्रामीण परिसराचा तोंडवळा देखील महाराष्ट्राच्या अन्य ग्रामीण प्रदेशाहून वेगळा आहे. म्हणूनच जनताचं पारडं थे जड वाटत.

पण खा. धुळपांची वैयक्तिक लोकप्रियताही तितकीच जबरदस्त आहे. पक्षाच्या सीमा ह्या लोकप्रियतेनं केव्हाच ओलांडलेल्या आहेत. म्हणूनच, आकड्यांचं गणित 'जनता'च्या बाजूचं असलं तरी आम जनता 'जनता'च्याच मागे जाईल असं ठामपणे तरी सांगता येणार नाही. त्यामुळे ह्या दोघांमधली लढत जबरदस्त होणार यात वाद नाही. कॉंग्रेसचे आहेर आणि शिवसेनेचे शेख कुठल्या बाजूनं किती प्रभाव मतदारांवर पाडतात ह्यावर 'फ्लोटिंग मतं' अवलंबून राहतील व तीच ह्या अटीतटीच्या लढाईत निर्णायक ठरण्याचा संभव आहे.

कल्याणसारखीच जबरदस्त लढत ठाणे शहरात आहे. ठाणे जिल्ह्यातून हिंडताना कुठे जनता, कुठे कॉंग्रेस तर कुठे शेकाप आघाडीवर असल्याचं जाणवत होतं. ठाणे शहरातली परिस्थिती मात्र, तिथल्या रस्त्यांसारखीच वेगळी होती. उखडलेली, खडबडीत, गोंधळाची ! एखाद्या मोटार-स्कूटर चालकानं बिनधास्त भरधाव गाडी ठाण्यातनं हाकून दाखवावी. मी त्याला हमखास बक्षिस देईन ! ठाणे जिल्ह्यातनं हिंडताना जाणवत नाही, इतका जबरदस्त त्रास ठाणे शहरात होतो. जागोजाग रस्ते उखडलेले आणि हे गेल्या दोन-तीन वर्षांपासून चालू आहे. आणि इथले एक जाणकार म्हणाले, त्याप्रमाणे, '... नगराध्यक्षपदावर सतीश प्रधान आहेत तोपर्यंत ठाणे शहरातली रस्तेदुरुस्ती अशीच कायम चालू राहणार असे दिसते. रस्ता उखडायचा, डागडुजी करायची. दुसऱ्या रस्त्याकडे वळायच, तिथलं झालं की, पुन्हा पहिल्या रस्त्यावर काम तयारच ! गेली २-३ वर्षं असं चालू आहे ...'

असं असलं तरी, ठाणे शहरात तरी निदान शिवसेनेचा दबाव मोठा आहे. मागच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत, (नगराध्यक्षाची निवडणूक प्रत्यक्ष मतदारांकडून खुल्या मतदानान झालेली आहे; निवडून आलेल्या सभासदांद्वारा नाही.) त्या वेळच्या जनसंघाचे मारोतराव शिंदे आदि मातब्बर मंडळीविरुद्ध सतीश प्रधान मोठी आघाडी मिळवून निवडून आले होते. त्यानतर त्यांनी झपाट्यात काही चांगली कामंही ठाण्यात केली. ह्यामुळं नाही म्हटलं

पृष्ठ २१ वर

# फ्रान्सच्या आगामी निवडणुका

**चंद्रशेखर पुरन्दरे**

युरोकम्युनिझमची युरोपातील नवीन जोमाने चाललेली प्रगती इटलीमध्ये जशी दृग्गोचर झाली आहे, तशीच ती फ्रान्समध्येही होईल असे वाटले होते. आज मात्र परिस्थिती अंमळ निराळी आहे. फ्रान्समध्ये १२ मार्च व १९ मार्चला सार्वत्रिक निवडणुका होत आहेत आणि या निवडणुकावर फ्रान्सच्या कम्युनिस्ट पक्षाचे भवितव्य अवलंबून आहे.

या निवडणुकांना फार आधीपासून प्रसिद्धी मिळाली आणि त्यांना अनन्यसाधारण महत्त्व आता प्राप्त झाले आहे. निवडणुकीच्या प्रचाराचा गदारोळ इतका उठला आहे की, शत्रू कोण व मित्र कोण हे खरोखरच कळेनासे झाले आहे. फ्रान्समध्ये प्रमुख चार पक्ष आहेत. सध्या सत्तेवर असलेला रिपब्लिकन पक्ष आणि त्याचे छोटे छोटे दोस्त पक्ष. फ्रान्सचा अध्यक्ष व्हॅलरी गिस्कार्ड देस्तिंग हा एक युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटीमधला प्रमुख नेता आहे. फ्रान्सच्या बाहेर त्याची लोकप्रियता प्रत्यक्ष फ्रान्समध्ये आहे, त्याहून जास्त आहे. दुसरा पक्ष सोशॅलिस्ट. याचा नेता मितेराँ. हा सध्या उमटलेल्या प्रचारवादळाचा केन्द्रबिंदू आहे. तिसरा पक्ष द गॉलच्या व त्याच्या धोरणांच्या अनुयायांचा. याच्या मूळ नावात रिपब्लिकन हा शब्द असला तरी, ते प्रामुख्याने गॉलिस्ट म्हणूनच ओळखले जातात. चौथा पक्ष कम्युनिस्ट. याचा नेता मार्क्स.

आतापर्यन्तच्या फ्रान्सच्या राजकारणाचे ध्रुवीकरण रिपब्लिकन आणि गॉलिस्ट एकत्र व सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्ट एकत्र असे होते. यातील रिपब्लिकन आणि गॉलिस्टांची युती उजवी म्हणून ओळखली जाते आणि सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्ट अर्थातच डावे म्हणून ओळखले जातात. जर या आघाड्या अशाच राहिल्या असत्या, तर या निवडणुका आधीपासून इतक्या गाजल्याही नसत्या; पण उजवे आणि डावे या दोन्ही आघाड्यांमध्ये सरळ उभी फूट पडलेली आहे. त्यामुळे निवडणुकांचा निकाल ही अतिशय उत्सुकतेची बाब झालेली आहे.

प्रकरण तापायला सुरुवात झाली ती जून १९७७ मध्ये. फ्रेंच संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्तारूढ रिपब्लिकन पक्षाने देशाबाहेर असणाऱ्या फ्रेंच नागरिकाना आगामी निवडणुकांमध्ये मतदान सुलभतेने करता यावे म्हणून एक बिल सादर केले. आतापर्यंत परदेशी रहाणाऱ्या नागरिकांना मतदान करणे ही बरीच क्लिष्ट बाब होती; पण या नव्या बिलान्वये परदेशी राहणारा फ्रेंच नागरिक कोणताही मतदारसंघ निवडू शकेल आणि त्या देशातील कॉन्सुलेटतर्फे मतदान करावे लागेल. वरवर हा प्रकार बराच सोज्वळ दिसतो; पण यात सत्तारूढ पक्षाने कायद्यात तर सापडणार नाही; पण बरोबर परिणामकारक तर होईल अशी मेख मारली आहे. बाहेरदेशी रहाणाऱ्या फ्रेंच नागरिकांची संख्या सात लाख आहे. यातील बहुतांशी लोक देस्तिंगबद्दल सहानुभूती बाळगून आहेत. याचे कारण असे की देस्तिंगची प्रतिमा बाहेरच्या देशात फारच उजळ आहे. त्यामुळे त्याच्या मताचा मोठा हिस्सा सत्तारूढ पक्षाकडे जाणार हे उघड आहे. ठरलेल्या तीन पक्षाना हे जखमेवर मीठ वाटल्यास नवल नाही. भरीत भर म्हणून देस्तिंगने स्वत: या प्रत्येक नागरिकाला स्वत:च्या सहीचे पत्र पाठवले आहे. त्यात त्याने मतदानाची सगळी कृती स्पष्ट करून मतदान करण्याची विनंती केली आहे. पत्रात प्रत्यक्ष त्याच्या पक्षाची मखलाशी नसली तरी त्याचे पारडे या प्रकाराने जड होणार हे नक्की. विशेषत: ऑस्ट्रिया आणि मोनॅकोमधली मते तर निश्चितच रिपब्लिकनाना मिळतील असे दिसते.

तरीसुद्धा सत्तेच्या सगळयात जास्त जवळ मितेराँचा सोशॅलिस्ट पक्ष आहे. नमुन्यादाखल घेतलेल्या निवडणुकान्वये २८% मते सोशॅलिस्टाना मिळतील असा अंदाज आहे सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्ट युती भग पावल्यानंतर या गोष्टीचा दुष्परिणाम कम्युनिस्टाना भोगायला लागला आहे. ही ६ वर्षे एकाच डाव्या आघाडीच्या कार्यक्रमावर लढणारी युती फुटली तीही कम्युनिस्टांच्याच आडमुठेपणामुळे. याचे कारण तसे गूढच आहे; पण शक्यता अशी आहे की, रशियाने पूर्वी युरपमधल्या कम्युनिस्ट पक्षाना इतर बूर्ज्वापक्षाच्या सहाय्याने सत्तेसाठी धडपड करण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार गेली तीस वर्षे फ्रेंच कम्युनिस्ट पक्षही धडपड करीत होता; पण आता सत्तेवर येण्याचा सर्वात जास्त संभव असताना त्याने ही संधी नाकारली त्याचे कारण सध्या आफ्रिकेत रुतून बसलेल्या रशियाने या पक्षाना जरा सौम्य धोरण स्वीकारायला लावले हे असावे. परिणामत: मार्क्सच्या नेतृत्वाखालचे कम्युनिस्ट बाजूला पडले आहेत. १२ मार्चला मतदानाची पहिली फेरी होईल. जर या फेरीत कम्युनिस्टांना २५% मते मिळाली तरच ते सोशॅलिस्टाशी युती करतील असा रंग आहे. कारण तरच ते सोशॅलिस्टाशी बरोबरीच्या नात्याने सत्ता भोगू शकतील, अन्यथा प्रबळ सोशॅलिस्ट सांगतील त्या, प्रसंगी अपमानास्पदही, अटी-पुढे त्यांना मान तुकवावी लागेल. कम्युनिस्टाच्या दृष्टीने त्रासदायक आणखी एक बाब अशी की, फ्रान्सच्या मतदानाच्या पद्धतीनुसार पहिल्या पसतीचे व दुसऱ्या पसतीचे अशी दोन मते देता येतात. १२ मार्चच्या पहिल्या फेरीत जर कम्युनिस्टांच्या मतदाराच्या लक्षात आले की आपण पहिल्या पसंतीचे मत देऊन सुद्धा कम्युनिस्ट उमेदवार हरले, तर ते १९ मार्चच्या दुसऱ्या व निर्णायक फेरीत मत वाया घालविण्यापेक्षा सोशॅलिस्टांना देतील ही शक्यता आहे. म्हणूनच परिणामत: कम्युनिस्टाना पहिली फेरी जिंकणे फार आवश्यक आहे आणि नेमक्या इथंच कोणत्याच पक्षाची शाश्वती नाही. याचे कारण म्हणजे एकूण सत्तावीस पक्ष

आणि त्याचे शेकडो उमेदवार मैदानात आहेत. अजून अंतिम आकडा जरी निश्चित झालेला नाही तरी आतापर्यंतच्या निवडणुकापेक्षा नक्कीच जास्त उमेदवार आहेत. त्यामुळे भल्याभल्यानाही पहिल्याच फेरीत गचकणार का काय अशी साधार भीती वाटत आहे

ही झाली कम्युनिस्टांची ससेहोलपट सोशॅलिस्टांची परिस्थिती आधीच सांगितल्याप्रमाणें पुष्कळच चांगली आहे. १९७२ साली तीन डाव्या पक्षानी एकत्र येऊन जो कार्यक्रम बनविला तोच आजही त्यांचा कार्यक्रम आहे आठवडयाचे कामाचे तास ४० वरून ३५ वर आणणे, स्वस्त घरे बांधून देणे, ले ऑफला आर्थिक कारणास्तव कायद्याने बंदी घालणे, लघु आणि मध्यम उद्योजकाच्या करात कपात करणे, ग्राहक निर्देशांकावर किंमती गोठविणे, मल्टिनॅशनल्सवर नियंत्रणे आणणे इत्यादीचा हा कार्यक्रम होता. कम्युनिस्टाचे आणि सोशॅलिस्टाचे वाकडे होण्याचे प्रमुख कारण म्हणजे राष्ट्रीयीकरणाविषयी व त्याच्या अमलबजावणीविषयी सोशॅलिस्ट साशक होते व आहेत व्यापारी बँका, नऊ प्रमुख उद्योगपतीचे सर्व उद्योगसमूह याचे राष्ट्रीयीकरण हळूहळू करावे असे सोशॅलिस्टाचे मत. कारण त्याना एकदम टोकाचे निर्णय घेऊन मध्यमपंथीय नागरिकांना दुखवायचे नव्हते; पण यामुळे कम्युनिस्टांना मात्र आपली प्रतिमा डागळून घ्यावी लागली. त्यांच्या ताकदीच्या जोरावर सोशॅलिस्ट पुष्ट झाले असा त्याचा दावा आहे. तरी सुद्धा वॅलरी गिस्कार्ड देस्तिगच्या नंतरचा राष्ट्राध्यक्ष मित्तेराँ होणार असे गृहीत धरायला हरकत नाही

द गॉलिस्ट पक्षाचा नेता शिराक हा नुकताच पॅरिसचा मेयर होता तो आधी वेलेरी गिस्कार्ड देस्तिगच्याच अध्यक्षतेखाली फ्रान्सचा पंतप्रधान होता; पण गॉलच्या धोरणान्वये आर्थिक व सामाजिक बदल होत नाहीत, अशी तक्रार करून त्याने त्याचा नवा पक्ष स्थापन केला. देस्तिगशी त्याचे सबंध एवढे बिघडले की, त्याने देस्तिगचे उजव्या युतीचे सगळे प्रयत्न संपल्यानंतर जिथे जिथे देस्तिगच्या रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार उभे असतील तिथे तिथे आपल्या गॉलिस्ट पक्षाचे उमेदवार उभे करण्याचा निर्धार जाहीर केला. प्रसगी चलनफुगवटा वाढला तरी चालेल; पण बेकारी नष्ट करणारच व देस्तिगने योजले त्याहून अधिक कडक उपाय योजणार असे त्याचे प्रमुख आश्वासन आहे. अर्थात प्रत्येक पक्षच पेन्शनमध्ये वाढ, अधिक नफ्याची शाश्वती, कामाचे तास कमी करणे, लघुउद्योजकांच्या करात कपात अशी आश्वासने मुक्त कंठाने देत असल्याने शिराककडे फारशा गांभीर्याने पहायला नको हे मतदार जाणून आहे.

एकूण दोन कोटी ऐंशी लाख मतदार आहेत. त्यातील पन्नास लाख प्रत्येकी कम्युनिस्ट आणि गॉलिस्टांना मतदान करतील, सत्तर लाख सोशॅलिस्ट आणि लेफ्ट रॅडिकलसना मिळून मते देतील आणि उरलेले सुमारे एक कोटी देस्तिगच्या रिपब्लिकन पक्षासाठी, जाँ लेकानोच्या सेंट्रिस्ट पक्षासाठी, अति उजव्या नॅशनल फ्रंटसाठी, युनियन ऑफ सेन्सिबल फ्रेंचमेनसाठी व उरलेल्या सर्व पक्षात विभागले जातील असा प्राथमिक अंदाज आहे.

करआकारणीची फ्रेंच पद्धत मोठी मिळकत असणाऱ्यांना अनुकूल आहे. सर्वरीत्या मजेत राहणाऱ्या एकदम वरच्या वर्गातल्या लोकांमध्ये व अगदी खालच्या उत्पन्नाच्या लोकांमध्ये असणारी तफावत ही युरोपातल्या इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे किंवा दुसऱ्या शब्दात ही परिस्थिती जर काबूत आणायची असेल, तर डाव्या व उजव्या या शब्दांना फारसा अर्थ न राहता इग्लंडसारखी समिश्र अर्थव्यवस्था अपरिहार्य आहे. यासाठीच देस्तिगच्या रिपब्लिकन पक्षाची व मितेराँच्या सोशॅलिस्ट पक्षाची युती होईल असा अंदाज आहे. सर्व रूढ कल्पनाना धक्का देणारी ही युती ठरेल आणि त्याचा कम्युनिस्टांचे धडगे भक्कम करायला चिरेबंदी उपयोग होईल. दोन्ही युत्यामधले कडवे पक्ष म्हणजे उजव्या युतीतला शिराकचे गॉलिस्ट आणि डाव्या युतीतला कम्युनिस्ट आपोआप वगळले जाणार असा नूर दिसतो.


मार्केसच्या नेतृत्वाखालचा कम्युनिस्ट पक्ष शेवटची लढाई लढत आहे. पश्चिमेच्या बरोबर असणाऱ्या बहुतेक करारांतून फ्रान्सला बाहेर ओढायचे हा त्याचा प्रमुख मनसुबा आहे; आता घोडामैदान जवळच आहे. संपूर्ण युरोपचे लक्ष वेधून घेणाऱ्या या निवडणुकाचा निकाल मात्र संदिग्धच लागेल असे निःसंदिग्धपणे म्हणता येईल ! □

---

## १९७९ या आंतरराष्ट्रीय बालक वर्षासाठी
## बाल आनंद समितीची स्थापना

१९७९ हे आतरराष्ट्रीय बालकवर्ष म्हणून साजरे व्हावे असे यूनोतर्फे घोषित करण्यात आले आहे. आपल्या देशात मुलाच्या विकासासाठी फारच थोडया सुविधा उपलब्ध आहेत. या निमित्ताने मुलासाठी विविध विषयांत काम करणाऱ्या मडळीची एक सभा पुणे येथे रविवार दिनाक ८ जानेवारी रोजी घेण्यात आली. महाराष्ट्रातील सर्व बालप्रेमी सस्थाना आणि व्यक्तीना सहकार्याचे आवाहन करावे असे या सभेमध्ये ठरले. त्यासाठी बाल आनद समितीची स्थापना करण्यात आली. या विषयात काम करणाऱ्या संस्थानी आपली माहिती व सूचना या समितीकडे पाठवाव्यात व स्वयसेवक म्हणून काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी आपली नावे पत्त्यासह कळवावीत. या कामाचे कार्यालय—

पुणे पालक—शिक्षक संघ, १७८६ सदाशिव पेठ, पुणे — ३० येथे राहील.



# महाराष्ट्रातील मतदान

## विभागवार विश्लेषण

वा. दा. रानडे

मतदानाचा हक्क बजावण्याबाबतची जागरूकता महाराष्ट्राच्या कोणत्या विभागात अधिक आढळते, कोणत्या विभागात कमी दिसून येते ? त्यासाठी गेल्या पंचवीस वर्षांतील विधानसभा निवडणुकांतील विभागवार मतदानाचा तुलनात्मक अभ्यास केला पाहिजे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या महाराष्ट्राच्या तीन विभागांत विधानसभा–निवडणुकांत पुढीलप्रमाणे मतदान झाले.

### महाराष्ट्र विधानसभा–निवडणुका
### मतदानाची विभागवार टक्केवारी

| वर्ष | पश्चिम महाराष्ट्र | विदर्भ | मराठवाडा |
|---|---|---|---|
| १९५१–५२ | ४३·६८ | ५५·३३ | ३७·३७ |
| १९५७ | ५६·६३ | ६२·२१ | ३७·६० |
| १९६२ | ५९·२२ | ६८·२३ | ४८·७३ |
| १९६७ | ६४·५३ | ७१·९७ | ४९·९९ |
| १९७२ | ६२·११ | ६५·७० | ५३·४० |

या आकड्यांवरून जाणवणारा पहिला महत्त्वाचा विशेष म्हणजे मतदानाच्या टक्केवारीत विदर्भ नेहमीच आघाडीवर राहिलेला आहे. १९५१–५२ च्या पहिल्या निवडणुकीतसुद्धा तेथे ५५ टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेले नाही. पश्चिम महाराष्ट्रात १९५१–५२ च्या निवडणुकीत ४३·६८ टक्के मतदान झाले होते, तर मराठवाड्यात १९६७ च्या निवडणुकीपर्यंत ते ५० टक्क्यांवर गेले नाही. १९७२ च्या निवडणुकीतच तेथे ५० टक्क्यांची मर्यादा प्रथम ओलांडली गेली. पश्चिम महाराष्ट्रात सर्वांत जास्त म्हणजे ६४·९० टक्के मतदान १९६७ मध्ये झाले, तर विदर्भात १९६२, १९६७ आणि १९७२ या तिन्ही निवडणुकांत ६५ टक्क्यांवर मतदान झालेले आहे. १९६७ मधील ७१·९७ टक्के मतदान हा तेथील मतदानाचा उच्चांक आहे. मराठवाड्यात सर्वांत जास्त म्हणजे ५३·४० टक्के मतदान १९७२ मध्ये झाले; पण हे सर्वांत जास्त मतदान विदर्भातील ५५·३३ टक्के या १९५१–५२ मधील सर्वांत कमी मतदानापेक्षाही कमी आहे. हेच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर विदर्भात मतदानहक्काच्या जागरूकतेची जी पातळी १९५१–५२ च्या निवडणुकीत होती ती मराठवाड्यास १९७२ मध्येही गाठता आलेली नाही. प्रगतीचा वेग कमी असेल; पण तेथील मतदानाचे प्रमाण प्रत्येक निवडणुकीत वाढत गेलेले आहे. उलट पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात १९६७ च्या तुलनेने १९७२ मध्ये मतदानाच्या प्रमाणात घट झाली. विदर्भात ही घट ६·२७ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात २·४२ टक्के होती. मतदान वाढीची पातळी पाहिली तर असे दिसते की, पश्चिम महाराष्ट्रात १९५२ पेक्षा १९५७ मध्ये सर्वांत जास्त म्हणजे जवळजवळ तेरा टक्क्यांनी मतदानात वाढ झाली. विदर्भात याच अवधीतील मतदानवाढ जवळजवळ सात टक्के होती तर मराठवाड्यात मतदान जवळ जवळ १९५१–५२ च्याच पातळीवर स्थिरावले होते. तेथे मतदानाच्या प्रमाणात सर्वांत जास्त अकरा टक्के वाढ १९६२ च्या निवडणुकीत झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ या दोन्ही विभागांत सर्वांत जास्त मतदान १९६७ च्या निवडणुकीत झाले. पश्चिम महाराष्ट्रात १९६२ पेक्षा ५·३१ टक्क्यांनी, तर विदर्भात ३·७४ टक्क्यांनी मतदान वाढले. मराठवाड्यातील मतदानात मात्र अवघी १·२० टक्के वाढ झाली. तेथे सर्वांत जास्त मतदान १९७२ च्या निवडणुकीत झाले.

विदर्भात मतदानाचे प्रमाण जास्त का ? ते वाढावे यासाठी तेथील राजकीय नेत्यांनी जाणीवपूर्वक काही विशेष प्रयत्न केले काय ? याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. निजामी राजवटीत असल्याने मराठवाडा मागासलेला होता; पण महाराष्ट्रात सामील झाल्यानंतरसुद्धा तेथील मतदानाचे प्रमाण अधिक वेगाने का वाढले नाही ? त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नच झाले नाहीत काय, याचाही मागोवा घेतला जाणे आवश्यक आहे.

मतदानहक्काच्या जागरूकतेची चाचणी करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक व कमी मतदान किती मतदारसंघात झाले, प्रत्येक निवडणुकीत त्यात काय फरक पडत गेला याची विभागवार तुलनात्मक पाहणी करणे. सोबतच्या तक्त्यात अशा मतदारसंघांची विभागवार संख्या दिली आहे.

महाराष्ट्राच्या तिन्ही विभागांत विदर्भ आघाडीवर आहे हे या आकड्यांवरूनही दिसून येते. पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेल्या मतदारसंघांची संख्या तेथे सर्वांत कमी असून १९६७ पर्यंत प्रत्येक निवडणुकीत ती कमी कमी होत गेलेली आहे. १९६७ मध्ये तर तेथे एकाही मतदारसंघात पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले नव्हते. अशा मतदारसंघांची सर्वांत कमी संख्या याच वर्षी इतर

विभागातही होती; पण विदर्भाच्या तुलनेने ती जास्त होती. पश्चिम महाराष्ट्रात चार व मराठवाड्यात काही मतदारसंघात पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते. १९७२ च्या निवडणुकीत ही प्रगती कोणत्याच विभागाला राखता आली नाही. विदर्भात एका मतदारसंघात या वर्षी पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतदान झाले. पश्चिम महाराष्ट्रात तेरा ( १९६७ पेक्षा ९ जास्त ) व मराठवाड्यात सोळा ( १९६७ पेक्षा ४ जास्त ) मतदारसंघांत मतदानाचे प्रमाण पन्नास टक्क्यापेक्षा कमी होते. १९७२ च्या निवडणुकीत १९६७ पेक्षा अनेक मतदारसंघात मतदानात घट झाली होती. त्याचाच परिणाम या मतदारसंघावरही घडला. तेथे विशेष घडले ते एवढेच की, मतदानातील घट पन्नास टक्क्याच्याही खाली गेली.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक

| विभाग | वर्ष | ५० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालेले मतदारसंघ | ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेले मतदारसंघ |
|---|---|---|---|
| पश्चिम महाराष्ट्र | ११५२ | ६९ | ४५ |
| | १९५७ | ९१ | ३८ |
| | १९६२ | १२१ | २१ |
| | १९६७ | १५९ | ४ |
| | १९७२ | १४५ | १३ |
| विदर्भ | १९५२ | ३७ | ७ |
| | १९५७ | ४५ | ५ |
| | १९६२ | ५२ | १ |
| | १९६७ | ६३ | – |
| | १९७२ | ६२ | १ |
| मराठवाडा | १९५२ | ४ | ३० |
| | १९५७ | ६ | २९ |
| | १९६२ | १९ | २४ |
| | १९६७ | २८ | १२ |
| | १९७२ | २७ | १६ |

मतदानहक्क जागरूकतेच्या दृष्टीने १९७७ च्या लोकसभा निवडणुकांत महाराष्ट्राच्या या तिन्ही विभागांत काय फरक पडलेला दिसून येतो ? विदर्भाने आपली आघाडी टिकविली आहे. तेथे ६६.२५ टक्के मतदान झाले. १९६२ व १९६७ पेक्षा ते कमी असले तरी १९७२ पेक्षा थोडे जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्रात ६०.२० टक्के मतदान झाले ते १९६७ पेक्षा कमी तर आहेच; पण १९७२ पेक्षाही त्यात दोन टक्के घट झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ याच्या मतदानातील तफावत १९७२ मध्ये सर्वांत कमी म्हणजे तीन टक्के होती. ती १९७७ मध्ये सहा टक्क्यापर्यंत वाढली. मराठवाड्यातील मतदानाची वाढती कमान पण वाढीचा मंद वेग या दोन्ही गोष्टी १९७७ मध्येही कायम राहिल्या. तेथील मतदान १९७२ पेक्षा वाढले; पण ही वाढ फक्त एक टक्का होती. मराठवाड्यातील सहा निवडणुकांतल्या मतदानाचे आकडे पाहिले तर तेथील मतदानवाढीतही एक विशिष्ट क्रम दिसून येतो, तो म्हणजे १९७२ व १९७७, १९६२ व १९६७ आणि १९७२ व १९७७ अशा निवडणुकांच्या तीन जोड्या घेतल्या तर या निवडणुकांत मतदान जवळजवळ स्थिर किंवा वाढ झालीच असेल तर फार थोडी म्हणजे एक टक्क्याच्या आसपास आहे. सर्वांत जास्त अकरा टक्के वाढ १९७७ व १९६२ या दोन निवडणुकांच्या दरम्यान झाली तर त्यापेक्षा कमी म्हणजे ३.४१ टक्के वाढ १९६७ व १९७२ या दोन निवडणुकांच्या दरम्यान झाली. तिन्ही विभागांत मराठवाडा अजूनही मागे असला तरी पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्या मतदानातील तफावत १९७७ मध्ये सहा टक्के म्हणजे सर्वांत कमी झालेली आहे. सर्वांत जास्त १९ टक्के तफावत १९५७ च्या निवडणुकीत होती. ११६२ मध्ये ती ११ टक्क्यांपर्यंत कमी झाली; पण १९६७ मध्ये पुन्हा १५ टक्क्यांपर्यंत वाढली. त्यानंतर १९७२ मध्ये ९ टक्क्यांपर्यंत व १९७७ मध्ये ती ६ टक्क्यापर्यंत कमी झाली तफावत कमी होण्याचे कारण एकीकडे मराठवाड्यातील मतदानाचे प्रमाण वाढत गेले, तर दुसरीकडे पश्चिम महाराष्ट्रातील मतदानाच्या प्रमाणात घट झाली. ही तफावत कमी व्हायला हवी ती दुसरीकडच्या मतदानात घट होऊन नव्हे, तर मराठवाड्यातील मतदान अधिक वेगाने वाढून.

तिन्ही विभागांतील मतदानहक्क जागरूकतेची अधिक स्पष्ट कल्पना जिल्ह्यापातळीवरील किंवा पोटविभागातील मतदानाचे विश्लेषण केल्यावर येईल. पश्चिम महाराष्ट्राचे मुंबई शहर, कोकण आणि देश हे तीन उपविभाग पडतात. मुंबई शहर ही तर राज्याची राजधानी. देशातील व राज्यातील चळवळीचे व लढ्याचे ते केंद्र, मतदान हक्काबद्दलची जागरूकता तेथे सर्वांत जास्त दिसायला हवी. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनानंतरच्या १९५७ च्या निवडणुकीत मुंबईत मतदान सर्वांत जास्त म्हणजे ६७.४३ टक्के झाले. त्या खालोखाल ६४.९० टक्के १९६७ च्या निवडणुकीत झाले. नंतर १९७२ व १९७७ मधील मतदान जवळजवळ याच पातळीवर होते. १९७७ च्या निवडणूकमोहिमेत लोकांचा उत्साह खूप दिसून आला; पण मतदानाचे प्रमाण १९६७ पेक्षा थोडे कमीच होते. १९६२ पासूनच्या सर्व निवडणुकांत विदर्भात मुंबईपेक्षा जास्त मतदान झालेले आहे. मुंबई शहर मतदानाच्या बाबतीत आघाडीवर का असू नये ? तेथील मतदार राजकीयदृष्ट्या कमी जागरूक आहे असे म्हणता येणार नाही; पण सुशिक्षितामध्ये बुद्धीच्या अहंकारामुळे येणारी अश्रद्धा, भ्रमनिरास आणि मूल्यांवरचा ढासळलेला विश्वास यामुळे मतदानाचा हक्क बजावण्याबद्दलचा उत्साह ओसरू लागतो. मुंबईत मतदानाचे प्रमाण आणखी न वाढण्याचे कारण हे असावे. मुंबईच्या मतदानाबाबत लक्षात घ्यावयाची आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मतदानाचे प्रमाण विदर्भापेक्षा कमी असले तरी १९५७ च्या निवडणुकीपासून मुंबईच्या एकाही मतदारसंघात पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतदान झालेले नाही. १९५१–५२ च्या पहिल्या निवडणुकीत मात्र बृहन्मुंबईचे एकूण मतदान ५२.८७ टक्के असले तरी तेवीसपैकी सात मतदारसंघात ते पन्नास टक्क्यापेक्षा कमी होते. सर्वांत जास्त ५७.४७ टक्के मतदान भायखळा मतदारसंघात झाले. १९५७ मध्ये वाळकेश्वर (६६.६०), भायखळा (६८.३५), कुर्ला (६६), विलेपार्ले

(६७·७०) या मतदारसंघात पाचही निवडणुकांतील सर्वांत जास्त मतदान झाले.

त्यानंतर १९६७ मध्ये बोरिवली (६४·२८), कुलाबा (६६·०८) धोबीतलाव (६६·६२), कुंभारवाडा (६६·०४), माझगाव (६६·२७), खेतवाडी (६८·३६), परळ (७३·५६), शिवडी (६९·८३), माहीम (७१·७२), माटुंगा (६५·९८), वांद्रा (६७·५९), चेंबूर (७१·५५) अशा अनेक मतदारसंघात त्या त्या मतदारसंघातील पाच निवडणुकांतल्या मतदानाचा उच्चांक झालेला आढळतो. १९७२ च्या निवडणुकीत १९६७ पेक्षा अधिक मतदान फक्त नागपाडा (६६·०९) लव्हग्रोव्ह (६५·३९) आणि नायगाव (७२·६४) या तीनच मतदारसंघात झालेले आहे. बाकी सर्व मतदारसंघांत ते घटले.

मुंबई, कोकण आणि देश या पश्चिम महाराष्ट्राच्या तीन उपविभागांत मतदान हक्क जागरूकतेच्या बाबतीत कोकण १९५२ ते ७२ या सर्वच विधानसभा–निवडणुकांत मागे होता; पण १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत त्याने देशावरील जिल्ह्यांना मागे टाकले. कोकणमध्ये ५९–५० टक्के मतदान झाले, तर देशावरले ५७·१०. टक्के झालेले आहे. मतदान देशविभागापेक्षा जास्त असले तरी १९६७ आणि १९७२ या दोन्ही निवडणुकांतील मतदानापेक्षा कमी होते; पण १९७२ च्या तुलनेने १९७७ मधील घट एक टक्क्यापेक्षाही कमी होती. उलट देशावर मतदान १९७२ पेक्षा चार टक्क्यांनी घटले, त्यामुळेच कोकणला देशावर आघाडी मिळू शकली. कोकणमध्ये सर्वांत कमी मतदान ४७–२४ टक्के १९५१–५२ च्या पहिल्या निवडणुकीत झाले. त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुकीत ते पन्नास टक्क्यापेक्षा जास्त होते. सर्वांत जास्त मतदान ६३·३१ टक्के १९६७ च्या निवडणुकीत झाले.

कोकणमधील मतदानाचा जिल्हावार अभ्यास केल्यास असे दिसते की, १९७२ पर्यंतच्या सर्वच विधानसभा निवडणुकांत ठाणे व कुलाब्याच्या तुलनेने रत्नागिरी जिल्हा मागे होता. पहिल्या तीन निवडणुकांत तर तेथील मतदान ४६ टक्क्यांच्या खालीच होते. १९६२ मध्ये ते ४२·२० टक्के होते; पण १९६७ च्या निवडणुकीत अठरा टक्क्यांनी वाढ होऊन त्याने ६० टक्क्यांची मजल ओलांडली. ही जागरूकता तात्कालिक नव्हती. पुढच्या तीन निवडणुकांतही मतदान ५९, ६०, ६१ च्या आसपास होते. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ते सर्वांत जास्त म्हणजे ६१·५० टक्के होते आणि या निवडणुकीत प्रथमच रत्नागिरी जिल्ह्यात ठाणे जिल्ह्याला मागे टाकून कोकणाने दुसरा क्रम मिळविला.

पहिल्या क्रमांकासाठी ठाणे व कुलाबा जिल्ह्यात आलटूनपालटून स्पर्धा चाललेली दिसते. या दोन्ही जिल्ह्यात १९५१–५२ च्या पहिल्या निवडणुकीपासून मतदान सतत पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त होते. १९५१–५२ मध्ये कुलाब्याचा क्रम पहिला, तर १९५७ व १९६२ मध्ये ठाण्याचा पहिला होता. १९६७ मध्ये कुलाब्याने पुन्हा आघाडी मिळविली, तर १९७२ मध्ये ठाण्याने ती पुन्हा आपल्याकडे खेचून घेतली. १९६७ मधील ६७·१६ टक्के मतदान हा केवळ कुलाब्याचाच नव्हे तर कोकणमधील सर्व निवडणुकांतील सर्व मतदानाचा उच्चांक आहे; पण १९७२ मध्ये कुलाबा जिल्ह्यातील मतदान दहा टक्क्यांनी घटले व ठाण्यातील तीन टक्क्यांनी वाढल्याने ठाण्याला आघाडी मिळाली १९७७ च्या लोकसभा मतदानात पुन्हा चित्र पालटले. ठाणे जिल्ह्यातील मतदान या वेळी दहा टक्क्यांनी घटले, तर कुलाबा जिल्ह्यातील मतदान सहा टक्क्यांनी वाढून त्याला कोकणात पहिला क्रम मिळाला. या दोन जिल्ह्यात मतदानाच्या बाबतीत असे चढउतार का झाले, उमेदवारांची निवड, स्थानिक प्रश्न ही किंवा अन्य कोणती कारणे त्यामागे आहेत, याचा अधिक सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील मतदारसंघवार मतदानविश्लेषणावरून मतदानातील प्रगतीची किंवा परागतीची अधिक स्पष्ट कल्पना येते. रत्नागिरी जिल्ह्यात १९५१–५२ च्या पहिल्या निवडणुकीत तेरा मतदारसंघांपकी फक्त वेंगुर्ल्याने पन्नास टक्क्यांची पातळी जेमतेम ओलांडली होती. बाकीच्या बारा मतदारसंघांपैकी सात मतदारसंघात मतदान ३२ ते ३६ टक्के आणि पाच मतदारसंघात ४० ते ४५ टक्के होते, पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान असलेल्या मतदारसंघाची संख्या १९५७ मध्ये बारावरून आठवर आणि १९६२ मध्ये पाचवर खाली आली. १९६७ च्या निवडणुकीत एकाही मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी झाले नाही; पण १९७२ च्या निवडणुकीत काही मतदारसंघात प्रगती तर काही मतदारसंघांत थोडी परागती झाली. संगमेश्वर मतदारसंघात १९६७ मध्ये प्रथमच मतदान पन्नास टक्क्यांवर झाले होते; पण १९७२ मध्ये ते पुन्हा पन्नास टक्क्यांच्या थोडे खाली गेले. संगमेश्वर मतदारसंघाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्या तीन निवडणुकांत तेथील मतदानाचे प्रमाण वाढण्याऐवजी ४४·४५ ३६·०२, ३१·१५ याप्रमाणे घटत गेले. नंतरच्या १९६७ च्या निवडणुकांत ते एकदम चोवीस टक्क्यांनी वाढले. मतदारात एवढी जागरूकता याच वेळी कोठून आली याचा अधिक सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. संगमेश्वरप्रमाणे लांजा, राजापूर, देवगड आणि कणकवली या चार मतदारसंघात पहिल्या तीन निवडणुकांत मतदान ५० टक्क्यांपेक्षा कमी होते. चिपळूण, गुहागर आणि मालवणमध्ये पन्नास टक्क्यांची पातळी १९६२ मध्ये गाठली गेली, तर सावंतवाडी, दापोली, खेड आणि रत्नागिरी या मतदारसंघात १९५७ च्याच निवडणुकीत ती गाठली गेली. मालवण आणि वेंगुर्ला या दोन मतदारसंघात पाच विधानसभा निवडणुकांत मतदानाचा क्रम सतत चढता आहे. वेंगुर्ल्यात तर तो पहिल्या निवडणुकीपासूनच ५० टक्क्यांच्यावर आहे. (मालवण : ४२·८३, ४४·५३, ५१·१७, ५८·७४, ६३·३०; वेंगुर्ला ५०·२६, ५१·०७, ५६·६१, ६१·८८, ६३·९७) सावंतवाडीत सर्वांत जास्त मतदान ६८·५६ टक्के १९५७ च्या निवडणुकीत झाले, तर खेड ५८·७५ चिपळूण ६३·५६, संगमेश्वर ५५·१७, रत्नागिरी ६०·२२, लांजा ५९·८५ हे त्या त्या मतदारसंघातील पाच निवडणुकांतले सर्वांत जास्त मतदान १९६७

## ठाणे–कुलाबा या ठिकाणी मतदानात नेहमीच चढउतार का होतात ?

साली झाले. मालवण व वेंगुर्ल्याशिवाय दापोली ७०·२३, देवगड ६३·४२ आणि कणकवली ६१·७७ या मतदारसंघात १९७२ मध्ये सर्वात जास्त मतदान झाले. त्यापैकी दापोलीचे ७०·२३ टक्के मतदान हा रत्नागिरी जिल्ह्यातील सर्वच निवडणुकांतला मतदानाचा उच्चांक आहे.

मतदान-हक्क जागरूकतेच्या दृष्टीने कुलाबा जिल्ह्यात अलिबाग मतदारसंघ सर्वात पुढारलेला आहे. पहिल्या निवडणुकीतले ६३·५५ टक्के हे तेथील सर्वात कमी मतदान याच जिल्ह्यातील खालापूर, माणगाव मतदारसंघात सर्वात जास्त मतदानसुद्धा एवढे नव्हते. अलिबागमध्ये सर्वात जास्त ७३·६६ टक्के मतदान १९६७ मध्ये झाले. याच वर्षात पनवेल ६६·१२, खालापूर ५८·४१, श्रीवर्धन ७०·७६, माणगाव ६३·२८, महाड ६८·९८ हे त्या त्या मतदारसंघातील पाच निवडणुकांतले सर्वात जास्त मतदान होते. पेणने १९७२ मध्ये ७४·५० टक्के मतदान करून अलिबागला मागे टाकले. कुलाबा जिल्ह्यातील सर्व निवडणुकांतील मतदानाचा हा उच्चांक आहे जिल्ह्यात माणगाव हा मतदानात सर्वात मागे असलेला मतदारसंघ पहिल्या तिन्ही निवडणुकात तेथील मतदान पन्नास टक्क्यापेक्षा कमी होते. १९६२ मध्ये ते ४४·२७ टक्के होते; १९६७ मध्ये त्यात एकदम १९ टक्क्यांची वाढ होऊन ते ६३·२८ टक्के झाले या वर्षी एवढी वाढ एकदम कशी झाली, याच्या कारणाचा शोध घेतला जाणे आवश्यक आहे

कुलाबा जिल्ह्यातील अलिबाग मतदारसंघाप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील वसई मतदारसंघ मतदान हक्क बजावण्याच्या बाबतीत सर्वात जास्त जागरूक आहे तेथे पहिल्या निवडणुकीत ६३·२६ टक्के मतदान झाले आणि १९५७ च्या निवडणुकीत पाच निवडणुकांतील सर्वात जास्त ७९·२९ टक्के मतदान झाले. १९६२ व १९६७ च्या निवडणुकांतही एखाद्या टक्क्याच्या फरकाने ते याच पातळीवर टिकून होते. १९७२ मध्ये मात्र त्यात दहा टक्के घट झाली. १९५७ मध्ये वसईच्या खालोखाल सर्वात जास्त ७७·४१ टक्के मतदान पालघर मतदारसंघात झाले. १९५१–५२ च्या निवडणुकीपेक्षा तेथे मतदानात २९ टक्के वाढ झाली. एवढी वाढ कशी व कोणत्या कारणामुळे झाली याचा अधिक सखोल अभ्यास व्हावयास हवा. कासा या आदिवासी मतदारसंघात १९५७ मध्ये ४१·२५ टक्के मतदान होते ते १९६२ मध्ये २७ टक्क्यानी वाढून ६८·०५ टक्के झाले पुढच्या दोन निवडणुकात मतदान पुन: ५५ व ५२ टक्क्यापर्यंत खाली आले. हा चढ-उतार कोणत्या कारणामुळे झाला याचाही शोध घ्यावयास हवा. जव्हार आदिवासी मतदारसंघ मागासलेला. तेथे १९६२ पासूनच्या तिन्ही निवडणुकात ४८·५४, ४४·२३ व ४४·०३ असे मतदान झालेले आहे. निवडणुकांच्या पाव शतकात राजकीय कार्यकर्ते येथील बहुसंख्य मतदारापर्यंत पोचू शकलेले नाहीत, असाच याचा निष्कर्ष निघतो.

देशावरील मतदानाच्या जिल्हा पातळीवरील मतदानात असे दिसते की, पहिल्या निवडणुकीत नगर आणि पुणे या दोन जिल्ह्यात मतदान ५० टक्क्यापेक्षा कमी होते. (नगर ४३·२९, पुणे ४८·७४) यापैकी नगर जिल्ह्यात संयुक्त महाराष्ट्र लाटेच्या काळातील १९५७ च्या निवडणुकातसुद्धा मतदान ४८·८४ टक्के होते. त्यानंतर १९६२ मध्ये ५७·०९ व १९६७ मध्ये ६३·६० टक्के असे ते वाढले. १९७२ मध्ये पुन: तीन टक्क्यांनी घटले व १९७७ च्या लोकसभा निवडणुकांत आणखी पाच टक्क्याची घट होऊन मतदान ५५·५० टक्के झाले. नगर जिल्ह्यात श्रीगोंद्याचा हरिजन मतदारसंघ मतदान-हक्क जागरूकतेच्या बाबतीत सर्वात मागासलेला आहे. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकात तेथे फक्त ३९·९१ टक्के मतदान झाले. त्यानंतर प्रत्येक निवडणुकीत ते थोडे वाढत गेले; पण १९७२ मध्ये ते ४७·२५ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यापेक्षा कमीच होते. एक कोपरगावचा मतदारसंघ सोडला तर पहिल्या निवडणुकीत नगर जिल्ह्यातील बाकीच्या सर्व सात मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यापेक्षा कमी होते. १९५७ च्या निवडणुकीत सहा मतदारसंघाच्या बाबतीत हीच स्थिती होती. १९६२ च्या निवडणुकीत मात्र श्रीगोंदा सोडता बाकी सर्व मतदारसंघानी पन्नास टक्क्याची मजल ओलांडली १९६७ मध्ये ही प्रगती टिकली एवढेच नव्हे, तर प्रत्येक मतदारसंघात मतदानाच्या प्रमाणात वाढ झाली श्रीरामपूर (६८·९९), शिर्डी (७६·१२) आणि पारनेर (६३·३७). या मतदारसंघात १९७२ मध्येही मतदानातील वाढ चालू राहिली. बाकी मतदारसंघात मात्र घट झाली तरी पन्नास टक्क्याच्या खाली हे प्रमाण कोठे गेले नाही. मतदानाचा सतत चढता क्रम ठेवणारा मतदारसंघ म्हणून शिर्डीचा उल्लेख करायला हवा. पहिल्या निवडणुकीत हा मतदारसंघ नव्हता; पण १९५७ पासूनच्या चार निवडणुकात तेथील मतदान ५०·७०, ७१·७१, ७४·२४ आणि ७६·१२ याप्रमाणे वाढत गेले. १९६२ मध्ये मतदानात २१ टक्क्यांची वाढ कशी झाली आणि पुढच्या सर्व निवडणुकातही ती कशी टिकून राहिली याचा अधिक अभ्यास व्हावयास हवा.

पुणे जिल्ह्यात पहिल्या निवडणुकीत पुणे शहरातील दोन मतदारसंघ (पुणे वायव्य ४५·३६, पुणे आग्नेय ४९·३४) इंदापूर ४७·०३, हवेली ४७·६, शिरूर ३७·५६, मावळ ४७·८६, खेड ३८·६०, भोर ३८·१९, पुरंदर ४६·८६, जुन्नर ४७·२० अशा चौदापैकी दहा मतदारसंघात मतदान ५० टक्क्यापेक्षा कमी होते १९५७ मध्ये पुणे शहरातील सर्व मतदारसंघात केवळ पन्नास टक्क्याच्यावर नव्हे तर ६५ टक्क्यापेक्षा जास्त मतदान झाले. शुक्रवारमध्ये ते ७२, कसब्यात ७५ व शिवाजीनगरमध्ये ते ७५ टक्के होते. कसवा मतदारसंघात १९५७ पासूनच्या सर्वच निवडणुकात मतदान नेहमीच ७० टक्क्याच्या वर होते व १९६७ मध्ये १९५७ ची ७५ टक्क्याची पातळी त्याने पुन्हा गाठली. शुक्रवार, शिवाजीनगर आणि कॅन्टोन्मेंट मतदारसंघात मात्र १९५७ ची पातळी पुन्हा गाठली गेली नाही. कसवा आणि शिवाजीनगर या दोन मतदारसंघाच्या बाबतीत लक्षात घ्यावयाचा एक विशेष म्हणजे दोन्ही ठिकाणी १९५७ नंतर मतदानात सतत घट होत गेली आहे. (कसबा ७५, ७२·९६, ७५·०२,

## काही भागात तर राजकीय कार्यकर्ते पोचूही शकले नाहीत.

७०·९४, शिवाजीनगर ७५, ७२·७७, ६५·७७, ६२·६४) शिवाजी-नगरमध्ये कसब्याच्या तुलनेने अधिक घट झाली आहे ही घट मोठ्या प्रमाणात नसली तरी ती का व्हावी याचा शोध घेतला जाणे आवश्यक आहे. १९५७ च्या निवडणुकीत इंदापूरचे मतदान आणखी बारा टक्क्यांनी घटले. खेडमधील घट सहा टक्क्यांनी वाढली. जुन्नरमध्येही १९५१–५२ पेक्षा मतदान थोडे वाढले. शिरूरमध्ये ते आठ टक्क्यांनी, भोरमध्ये पाच टक्क्यांनी व मावळमध्ये थोडे वाढले तरी पन्नास टक्क्याच्या खालीच होते. हवेली व पुरंदरमध्ये मात्र पन्नास टक्क्यांची मजल ओलांडली गेली; पण पहिल्या निवडणुकीत पन्नास टक्क्यापेक्षा जास्त मतदान झालेल्या काही मतदारसंघात १९५७ मध्ये मतदानात घट होऊन ते ५० टक्क्यांच्या खाली गेले. असे मतदारसंघ म्हणजे बारामती ४६·६०, आंबेगाव ३९·९७ एकूण आठ मतदारसंघात मतदान ५० टक्क्यापेक्षा कमी होते. ही संख्या १९५१–५२ पेक्षा दोनने कमी होती

पुणे शहरात १९६२ च्या निवडणुकीत खडकी हा हरिजन मतदारसंघ होता. तेथे मतदान ४९·१७ झाले, पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतदान झालेले आणखी मतदारसंघ म्हणजे दौंड हरिजन ३४·३८, शिरूर ४८·११, खेड ४३·४९. यापैकी खेड, शिरूर हे पहिल्या निवडणुकीपासूनच ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान असलेले मतदारसंघ होते. खेडमध्ये १९५७ पेक्षा ११ टक्क्यांनी व शिरूरमध्ये ३ टक्क्यांनी मतदान वाढले; पण ते ५० टक्क्यांच्या खालीच होते. दौंडमध्ये १९५७ च्या निवडणुकीत ५४·३० टक्के मतदान होऊन १९५७ मध्ये ते अवघे ३४·३८ टक्के झाले म्हणजे वीस टक्क्यांनी घटले. एकदम एवढी घट का व्हावी याचा शोध घ्यावयास हवा. १९६७ व १९७२ या पुढच्या दोन निवडणुकात मात्र प्रगती झाली, १९६७ मध्ये दौंडशिवाय एकाही मतदारसंघात पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले नाही. १९६७ मध्ये तर दौंडने ती मजल ओलांडली; पण १९५७ ची पातळी तो गाठू शकला नाही. इंदापूरमध्ये १९६२ च्या निवडणुकीत मतदान २२ टक्क्यांनी वाढून साठ टक्क्यांची पातळी गाठली गेली व पुढच्या दोन निवडणुकात ते सत्तर टक्क्यांच्या पातळीस गेले. खेड व बारामतीमधील प्रगतीही लक्षात घेण्यासारखी आहे. पहिल्या तीन निवडणुकांत पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान असलेल्या खेडमध्ये १९६७ च्या निवडणुकीत मतदान १९६२ पेक्षा १९ टक्क्यांनी वाढून ६२·९३ टक्के झाले. १९७२ मध्ये ते आणखी तीन टक्क्यांनी वाढले. बारामतीत १९६२ पेक्षा १९६७ मध्ये मतदान ५१·९६ टक्क्यांवरून ७४·१४ टक्क्यापर्यंत गेले. १९७२ मध्ये मात्र त्यात तीन टक्के घट झाली. इंदापूर, खेड, आंबेगाव, भोर, पुरंदर, जुन्नर या मतदारसंघात १९७२ मध्ये सर्वांत जास्त मतदान झाले. बाकी बहुतेक मतदारसंघात मात्र १९६७ मध्ये मतदान पातळी सर्वात जास्त होती.

१९५७ च्या निवडणुकीत पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतदान झालेला नगरशिवाय दुसरा जिल्हा म्हणजे धुळे. तेथे ४५·७४ टक्के मतदान झाले. १९५१–५२ च्या तुलनेने तेथील मतदान सहा टक्क्यांनी घटले. पुढच्या निवडणुकांमध्ये ही घट भरून निघाली. १९६२ मध्ये ८ टक्क्यांनी व १९६७ मध्ये आणखी ५ टक्क्यांनी मतदान वाढले; पण १९७२ मध्ये त्यात पुन्हा ७ टक्के घट होऊन ते पहिल्या निवडणुकीच्या पातळीवर आले. जिल्ह्यातील तळोदा ४६·६१ व शहादा ४६·३७ या मतदारसंघात पहिल्या निवडणुकीत पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतदान होते. त्यापैकी तळोद्यात पहिल्या तिन्ही निवडणुकांत ते पन्नास टक्क्याच्या खालीच होते. १९५७ मध्ये तो सर्वांत कमी म्हणजे २७·५८ टक्के झाले. १९५१–५२ पेक्षा १९ टक्के घट झाली. १९६२ मध्ये ही घट काही प्रमाणात भरून निघून मतदान ४१·९५ टक्क्यांपर्यंत गेले. १९६७ मध्ये ते आणखी १३ टक्क्यांनी वाढून ५४·५५ टक्के झाले. पन्नास टक्क्याची मजल प्रथमच ओलांडली गेली, पण ही प्रगती टिकली नाही. १९७२ मध्ये पंधरा टक्के घट होऊन मतदान ३९·४५ टक्क्यांपर्यंत खाली आले. हा आदिवासी मतदारसंघ आहे. मतदानहक्काबद्दलची जागरूकता वाढत का नाही, निदान टिकून का राहात नाही. या दृष्टीने या मतदारसंघातील मतदानाचा अधिक सखोल अभ्यास व्हावयास हवा. शहादा मतदारसंघात झालेली परागती तर यापेक्षाही चिंतनीय आहे. हाही आदिवासी मतदारसंघ आहे १९६७ च्या निवडणुकीत तेथे ५५·५७ टक्के मतदान झाले होते; पण १९७२ मध्ये ते तेवीस टक्क्यांनी घटून ३२·४५ टक्क्यापर्यंत खाली आले. यापूर्वीच्या कोणत्याही निवडणुकीत या मतदारसंघात एवढे कमी मतदान झाले नव्हते. ही परागती का झाली, याचा शोध घ्यावयास हवा. या जिल्ह्यात १९५७ च्या निवडणुकीत आणखी दोन मतदारसंघात मतदानात घट होऊन ते पन्नास टक्क्यांच्या खाली गेले. (शिंदखेडा ४७, नवापूर ३४·५८). दोन्ही मतदारसंघात पहिल्या निवडणुकीत पन्नास टक्क्यांवर मतदान झाले होते. शिंदखेड्यात ते दहा टक्क्यांनी व नवापूरमध्ये सतरा टक्क्यांनी घटले. शिंदखेड्यामध्ये १९६७ च्या निवडणुकीत ते ५८·७७ टक्क्यांपर्यंत वाढले होते; १९७२ मध्ये पुन्हा ४६·९१ टक्क्यांपर्यंत घटून पाच निवडणुकांत त्याने सर्वांत खालची पातळी गाठली. शिंदखेडा हाही आदिवासी मतदारसंघ आहे. नवापूरमध्ये तर १९५१–५२ ची पहिली निवडणूक वगळता पुढच्या एकाही निवडणुकीत ते पन्नास टक्क्याच्या पातळीस पोचले नाही. १९६२ पासूनच्या तिन्ही निवडणुकांत ते ४५–४६ च्या आसपास होते. तळोदा व शहाद्याप्रमाणेच या दोन मतदारसंघातील मतदानाचाही सखोल अभ्यास व्हावयास हवा. धुळे उत्तर व दक्षिण या दोन मतदारसंघात धुळे दक्षिणमध्ये मतदानहक्काबद्दलची जागरूकता अधिक आढळते. धुळे उत्तरमध्ये मतदान ५२·५३ टक्क्यांच्या पातळीवरच स्थिरावलेले दिसते, तर धुळे दक्षिणमध्ये ते ६० पासून ६५ पर्यंतच्या पातळीत आहे धुळे जिल्ह्याच्या बाबतीत एक समाधानकारक परिस्थिती म्हणजे १९७२ मध्ये मतदान ५१ टक्क्यांपर्यंत घटले असले तरी १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ते ५९·५० टक्क्यांपर्यंत वाढले. तो त्या जिल्ह्याच्या पाच निवडणुकांच्या मतदानातील उच्चांक आहे. ही प्रगती अशीच पुढे चालू राहते की पुन्हा एकदा घट होते हे या निवडणुकीत पाहावयाचे.

धुळ्याच्या मानाने जळगाव जिल्हा मतदानहक्क जागरूकतेच्या बाबतीत अधिक पुढारलेला आहे. पहिल्या चार निवडणुकात तेथील मतदान सतत वाढत गेले (५७·५५, ५८·५०, ६१·७९, ६३·९५) १९७२ च्या निवडणुकीत ते ५५·६५ टक्क्यापर्यंत घटले; पण १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा ६१·५० टक्क्यापर्यंत वाढले. मतदारसंघवार मतदानाचे अवलोकन केल्यास असे दिसते की, पहिल्या निवडणुकीत फक्त भुसावळ–जामनेर मतदारसंघात मतदान ४३·५९ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यापेक्षा कमी होते. पुढच्या तिन्ही

निवडणुकांत एकाही मतदारसंघात ते पन्नास टक्क्यांपेक्षा कमी नव्हते. १९७२ च्या निवडणुकीत मात्र पाटोळा व चाळीसगाव या दोन मतदारसंघांत ते पन्नास टक्क्याच्या खाली गेले. या दोन्ही मतदारसंघात १९६२ मध्ये पाच निवडणुकांतील सर्वांत जास्त मतदान झाले होते आणि त्यानंतरच्या निवडणुकात त्यात घट होत गेली. (पाटोळा ६०·६९, ५४·८८, ४६·२४ चाळीसगाव ६३·१२, ५१·६७, ४३·६३.) ही घट का झाली, मतदार उदासीन का झाला याचा शोध घ्यावयास हवा. यावल व एरंडोल या दोन मतदारसंघांत मतदान पन्नास पन्नास टक्क्यांच्या खाली गेले नसले तरी १९७२ मध्ये तेथील मतदान पाचही निवडणुकांत सर्वांत कमी झाले. दोन्ही ठिकाणी १९६७ मध्ये ते सर्वांत जास्त होते. कळसावर पोचून नंतर एकदम तळ गाठावा तशी ही घट झालेली आहे यावलमध्ये ७१·३८ वरून ५५·७३, तर एरंडोलमध्ये ६५·३६ वरून ५७·४४ अशी ही घट आहे. जळगाव जिल्ह्यातील मतदानाचा आणखी एक विशेष म्हणजे १९६७ च्या तुलनेने सर्वच मतदारसंघांत १९७२ मध्ये मतदानात घट झालेली आहे.

नाशिक जिल्ह्यातील पहिल्या चार निवडणुकांत सतत वाढ होत गेली. (५५·४८, ५९·७७, ६१·१७, ६३·०८) त्यानंतर १९७२ मध्ये ते ५९·४१ टक्क्यांपर्यंत घटले १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ५२·५० टक्क्यांपर्यंत म्हणजे जवळ जवळ १९५१–५२ मधील मतदानाच्या पातळीत आले. या जिल्ह्यात १९५१–५२ च्या पहिल्या निवडणुकीत दोन मतदारसंघांत पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले. (नाशिक ४१·९९, सुरगाणा ३७·११.) १९५७ च्या निवडणुकीतही नाशिक मतदारसंघात मतदान ४९·५५ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांपेक्षा कमीच झाले. पुढच्या तीन निवडणुकात मात्र ते साठ टक्क्याच्या आसपास होते नाशिकशिवाय दिंडोरी (३९·३०) व येवले (४९·९७) या मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते. दिंडोरीच्या बाबत एक लक्षणीय विशेष म्हणजे १९५७ च्या सर्वांत कमी ३९·३० टक्के मतदानावरून १९६२ मध्ये ८१·२८ पर्यंत म्हणजे जवळजवळ ४२ टक्क्यानी मतदान वाढले; पण हे शिखर गाठल्यानंतर पुढच्याच १९६७ च्या निवडणुकीत मतदानात पुन्हा ५१·८२ पर्यंत घट झाली. ही घट एवढयावरच न थांबता १९७२ मध्ये आणखी आठ टक्क्यांनी घटून ४३·०८ टक्के झाली. येवल्यामध्ये १९५७ साली पन्नास टक्क्यास किंचित कमी मतदान झाले तरी पुढच्याच निवडणुकीत ते सोळा टक्क्यानी वाढून ६५·३५ झाले व पुढच्या दोन निवडणुकात जवळ जवळ त्याच पातळीवर स्थिरावले. १९६२ च्या निवडणुकीत कळवण (३९·६८) आणि पेंट (४५·५२) या दोन मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते; पण कळवणला पुढच्याच निवडणुकीत ते ६४·०५ टक्क्यांपर्यंत वाढले. १९७२ मध्ये मात्र चार टक्के घट झाली. पेंट मतदारसंघ फक्त १९६२ च्या निवडणुकीत होता. सुरगाणा आदिवासी मतदारसंघ मतदान-हक्क जागरूकतेच्या दृष्टीने बराच मागे आहे. १९६७ व १९७२ च्या निवडणुकात तेथे अनुक्रमे ४०·८१ व ४३·०८ टक्के मतदान झाले. हा मतदारसंघ वगळता १९६७ मध्ये या जिल्ह्यात एकाही मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी नव्हते; पण ही प्रगती १९७२ च्या निवडणुकीत टिकली नाही. त्या वर्षी इगतपुरी आदिवासी (४४·४९), सुरगाणा (४३·३८), दिंडोरी (४३·०८) याप्रमाणे तीन मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यांच्या पातळीखाली गेले. मतदानाच्या दृष्टीने बराचसा स्थिर मतदारसंघ म्हणजे निफाड. तेथे १९५७ पासूनच्या चार निवडणुकांत मतदान ६५ ते ६९ टक्क्यांच्या दरम्यान होते.

सोलापूर जिल्ह्याचे मतदान पहिल्या निवडणुकीपासूनच पन्नास टक्क्यांच्यावर असून पहिल्या चार निवडणुकांत ते सतत वाढत गेले आहे. (५१·७७, ५२·४६, ५७·५१, ६६·३५) १९७२ मध्ये ते ६६·१९ टक्के म्हणजे १९६७ पेक्षा किंचित कमी झाले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र ते ५७ पर्यंत घटले. जिल्ह्याची १९५१-५२ च्या निवडणुकीतील सरासरी जरी पन्नास टक्क्याच्यावर असली तरी अक्कलकोट (४९·४६), सोलापूर शहर उत्तर (४७·३५), सोलापूर शहर दक्षिण (४१·४९), सोलापूर उत्तर (४९·८८), करमाळा हरिजन (४५·३६), सांगोला (४६·४९) याप्रमाणे दहापैकी सहा मतदारसंघांत मतदान पन्नास टक्क्यापेक्षा कमी होते. यापैकी अक्कलकोट, सोलापूर उत्तर आणि सांगोला मतदारसंघात ते १९५७ मध्येही पन्नास टक्क्यांच्या पातळीखाली होते. या मतदारसंघांच्या जोडीला बार्शी (४९.), माढा हरिजन (३९·६९) या दोन मतदारसंघांतही ते पन्नास टक्क्यांच्याखाली गेले. या दोन्ही मतदारसंघात पहिल्या निवडणुकीत ६२ टक्क्यापेक्षा जास्त मतदान होते. (बार्शी ६३·८९, माढा ६२·२७) म्हणजे बार्शीच्या बाबतीत १४ टक्क्याची व माढयाच्या बाबतीत २३ टक्क्यांची घट झाली. पुढच्याच निवडणुकीत बार्शीतील घट भरून निघाली. एवढेच नव्हे तर मतदानात तेवीस टक्के वाढ झाली. १९६७ मध्ये मतदान त्याच पातळीवर राहिले. १९७२ मध्ये मात्र त्यात तीन टक्के घट झाली. माढयाच्या बाबतीत १९६२ च्या निवडणुकीत मतदान आणखी तीन टक्क्यानी घटून सर्वांत खालच्या पातळीला गेले; पण पुढच्याच निवडणुकीत ते ३३ टक्क्यांनी वाढून ६९·९८ पर्यंत गेले, १९७२ मध्ये मात्र ते पुन्हा दोन टक्क्यानी घटले. बार्शीमध्ये १९६२ साली आणि माढयात १९६७ साली मतदानात एवढी मोठी वाढ एकदम कशी झाली, याच्या कारणाचा शोध घ्यावयास हवा. सांगोला मतदारसंघात पहिल्या दोन निवडणुकाप्रमाणे १९६२ मध्येही मतदान ४९·३८ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते; पण पुढच्याच निवडणुकीत मतदानात १९ टक्क्याची वाढ होऊन ते ६८·०७ पर्यंत गेले. १९७२ मध्ये आणखी पाच टक्क्यांची वाढ झाली. मंगळवेढा हरिजन मतदारसंघात १९६२ मध्ये अवघे ३२·४६ टक्के मतदान झाले; पण पुढच्याच निवडणुकीत ते ३६ टक्क्यांनी वाढून ६८·६० टक्क्यांपर्यंत गेले आणि १९७२ मध्ये त्यात आणखी थोडी वाढ झाली. १९६७ च्या निवडणुकीत एकाही मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्याखाली झाले नाही. १९७२ मध्ये मात्र करमाळा हरिजन मतदारसंघात ते पुन: पन्नास टक्क्याच्या खाली गेले एवढेच नव्हे तर ४३·५० टक्के म्हणजे करमाळयाच्या सर्व निवडणुकांत कमी मतदानाची पातळी त्याने गाठली सोलापूर शहर दक्षिण (६६·८६) सोलापूर उत्तर (६८·१८), सांगोला (७३·१६), मंगळवेढा (६९·१४) आणि मोहोळ (७३·२४) या मतदारसंघात १९७२ मध्ये पाच निवडणुकांतील सर्वांत जास्त मतदान झाले तर अक्कलकोट (६७.५४), सोलापूर शहर उत्तर (७१.३९), माढा (६९.९८) या मतदारसंघातील हे सर्वांत जास्त मतदान १९६७ मध्ये झाले. माळशिरस (७३.६५), बार्शी (७२.५२), पंढरपूर (६४.९६) या मतदारसंघाच्या बाबतीत सर्वांत जास्त मतदान १९६२ मध्येच झाले.

[ अपूर्ण ]

---

**निवडणूक–निकालावर परिणाम करणाऱ्या दक्षिण महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या तीन प्रांतांतील मतदानाची आकडेवारी काय सांगते ?**

पुढील अंकी

## तीन निवडणूक वार्ता : पृष्ठ १२ वरून

तरी त्यांचं वजन मतदारांवर निश्चित आहे.

पण परिस्थितीत आज खूप बदल झालेला आहे हेही निश्चित. एकतर नगरपालिकेची निवडणूक आणि विधानसभेची लढत ह्यात मूलभूत फरक आहेच. प्रश्न वेगवेगळे आहेत. मतदारसंघाच्या रचनेतही फरक आहे. ह्याखेरीज, सुरुवातीची चांगली कामं असली तरी नंतरच्या काळात अशा अनेक गोष्टी घडलेल्या आहेत की, त्यामुळे अनेक मंडळी नाराज आहेत. नगराध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतर झालेला त्यांचा विवाह अनेक कारणांनी, अकलूजच्या मोहिते-पाटलाच्या गावभोजनाप्रमाणे गाजलेला आहे. स्टेडियम, जलतरण-तलाव, रस्तेदुरुस्ती आदि अनेक प्रकरणामध्ये त्यांच्यावर वेळोवेळी प्रच्छन्न टीका स्थानिक वृत्तपत्रांतून सुरू असते. ह्याच्या भरीला भर म्हणून, एकूणच शिवसेनेची प्रतिमा आणीबाणीपासून डागाळलेली आहे. आडव्या-उभ्या कोलांटयांमुळे शिवसेना तशी बदनाम आहे.

विद्यमान कांग्रेस आमदार सौ. विमलाबाई रांगणेकरही रेड्डी कांग्रेसकडून निवडणूक लढवीत आहेत; पण त्यांच्या निवडीमुळे ठाणे कांग्रेसमध्ये खूपच वादावादी निर्माण झालेली आहे ठाणे जिल्ह्यात इंदिरावाद्यांचं जे वर्चस्व काही वेळा दिसतं, त्याचं खरं कारण तसं बघितलं तर विमलाबाई आणि ताराबाईंची उमेदवारी हेच आहे. त्यामुळेच, ह्या मतदारसंघातून इंदिरा कांग्रेसचे अमरसिंग ठाकूर आणि मसकांचे ( महाराष्ट्र समाजवादी कांग्रेस ) जोशीही उभे आहेत. परिणामतः विमलाबाईंची उमेदवारी कुणीही गंभीरपणे घेत नाहीत. त्यांना स्वत ला विजयाची खात्री असली तरी ! इंदिरा कांग्रेस आणि मसकां नावालाच आहेत.

वास्तविक ह्या पार्श्वभूमीवर 'जनता'च्या ग. मो. कोळी ह्याचा विजय एरवी मी गृहीत धरला असता; पण गेल्या काही दिवसांत जनता पक्षात जो गोंधळ माजला आहे, तो पाहता हे चित्र तितकस उत्साहवर्धक राहिलेल नाही 'जनता'वाले आणि कोळी स्वतः, महाराष्ट्रभरच्या जनतांतर्गत उद्रेकाचा, लाथाळीचा फारसा परिणाम ह्या मतदार संघात जाणवणार नाही असं म्हणत असले आणि विजयाची ग्वाही देत असले, तरी निःपक्ष समीक्षकांना 'जनता'चा विजय तितकासा सहजसाध्य वाटत नाही. खरी लढत सतीश प्रधान आणि ग. मो. कोळी ह्यांच्यातच आहे आणि आज तरी दोघांचं पारडं सारखंच जड वाटत आहे. मात्र मतदार सुशिक्षित असल्यानं आणि शिवसेनेचा नेहमीचा खेळ सर्वश्रुत असल्यानं व्यक्तिशः सतीश प्रधानाविषयी आकस नसला तरी, शिवसेनेला मत द्यायला मतदार नाराज असावा असं जरूर जाणवतं. त्याचा आणि कांग्रेसमधल्या फाटाफुटीचा फायदा जनताला मिळण्याची दाट शक्यता जरूर आहे...

बाकीचे मतदारसंघ फारसे गाजतील असं वाटत नाही. बेलापूर पट्टीतल्या कामगार-परिसरात भोईर ह्यांची उमेदवारी वढावकराऐवजी लादली गेल्याने जनता कार्यकर्ते नाराज आहेत आणि ती जागा कांग्रेसच्या खिशात जायला हरकत नाही.

ठाणे जिल्ह्याची फिरस्ती संपवतानाचं जिल्ह्याचं निवडणूकचित्र हे असं होतं. इंदिरा गांधींच्या 'लाटे'चा काही प्रभाव ह्या जिल्ह्यावर होईलसं वाटत नाही. झालाच तर तो कांग्रेसची मतं फोडण्यातच होईल. एकूण १३ जागांपैकी माझ्या अंदाजानुसार, ६ जागा जनताला, २ मार्क्सवाद्यांना, १ शेकापला आणि ४ कांग्रेसला मिळाव्यात. कदाचित एखादी जागा शिवसेनेला मिळूनही जाईल. ◻

---

३ : विदर्भ

# जनतालाट सांगते— विदर्भ बदलाला चटकन तयार होत नाही. या वेळी....

सोलापूर ते नादेड आणि नंतर नांदेड ते अकोला असा संपूर्ण एस्. टी. चा प्रवास हे एक दिव्यच आहे. त्यात पुन्हा वाटेत कुठं एस्. टी. चं टायर पंक्चर व्हावं, 'स्टेफनी' असावी; पण जॅक नसावा...रणरणत्या उन्हात एस्. टी. चं धूड दोन-दोन तास रस्त्यावर पडून राहावं...निर्जन, खरखरीत, खडबडीत रस्त्यावर ! नुसत्या कल्पनेनही अंगावर काटा यावा ! पण मी नादेडहून सुटलेल्या एस्. टी. तनं प्रवास करताना असे चक्क दोन तास काढले. त्यातही एक वेगळा अनुभव येतो. दोन तास-चाळीस-पन्नास प्रवासी एकत्र. चहा-पाण्याची जवळपास कुठं सोय नाही, जवळ कुठ जाऊन यायची बात नाही. अशा वेळी एकत्र उभं राहून, वेगवेगळ्या घोळक्यानी गप्पा मारत राहाणं ह्याशिवाय दुसरा मार्गच नसतो. आम्ही तेच केलं आणि कुणा ट्रकवाल्याच्या मदतीनं दोन तासांनी टायर बदलो होईपर्यंत आमच्या गप्पा रंगल्याही मस्त. एस्. टी. चे चालक-वाहकही ह्यातनं सुटले नाहीत आणि त्यांच्या समक्ष एस्. टी. ला, एस्. टी. ड्रायव्हरला शिव्या द्यायलाही मंडळी कचरली नाहीत...एस्. टी. चा गलथान कारभार, ड्रायव्हर्सची निष्काळजी इथपासून ते शासकीय

कर्मचाऱ्यांचा संप, विद्यार्थ्यांची कुचंबणा, कार्टरची भारत-भेट शाह कमिशन, ७७ चा जनता-विजय इथपर्यंत सगळ्या विषयांना स्पर्श करून आमच्या गप्पा रंगाळल्या त्या येऊ घातलेल्या निवडणुकांवर, इंदिराजींच्या आजच्या आतषबाजीवर… !

आमच्या घोळक्यात मराठवाडा आणि विदर्भ दोघांचे प्रतिनिधी होते आणि ह्या दोन्ही ठिकाणी इंदिराजींना जबरदस्त हादरे दिलेले आहेत. विदर्भ तर पारच ढेपाळून टाकला आहे. ज्या विदर्भाच्या जोरावर आजही महाराष्ट्राची सत्ता हाती राखण्याचा मानस यशवंतराव–वसंतराव–वसंतदादा मनाशी बाळगून होते, त्या विदर्भानंच फार मोठा दणका ह्या त्रयीला दिलेला आहे. मराठवाड्यात १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसचं साफ पानिपत झालं. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असूनही ! त्यांच्यामुळेच महाराष्ट्रात कॉंग्रेसला जबरदस्त हार खावी लागली असं आजही वसंतराव नाईक वगैरे ज्येष्ठ कॉंग्रेस-नेते प्राजळपणे सांगतात. 'ते कॉंग्रेसमधून गेले–बरं झालं. त्यामुळे कॉंग्रेस शुद्ध झाली.' असं सौ. शालिनीताई पाटीलसुद्धा परवा म्हणाल्या आणि खरोखरच शंकरराव चव्हाण आणि मंडळी कॉंग्रेसमधून गेल्यामुळे कॉंग्रेसचा मराठवाड्यातला कोसळता डोलारा सावरता येईल, असं वसंतराव नाईक, नरेंद्र तिडके आदी कॉंग्रेसनेत्यांनाही मनापासून वाटलं; पण दुर्दैवानं विदर्भापाठोपाठ इंदिराजींच्या डावपेचांनी यश मिळवलं आहे ते मराठवाड्यात ! बाबूरावजी काळे आदी मंडळी इंदिरावादी बनली आणि शंकरराव चव्हाणांच्या कॉंग्रेस-त्यागानं जे फायदे कॉंग्रेसला मिळतील अस वाटत होतं, ते गणित नेमकं चुकून गेलं आहे ! नांदेडची एकमात्र जागा महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेसला मिळण्याची शक्यता आहे. इतरत्र कॉंग्रेस अंतर्गत दुहीचा फायदा मिळून जनता, शेकापचे उमेदवार निवडून येतील, असं आमच्या घोळक्यातल्या नांदेडवासियांचं मत पडल…जनता–महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस युतीमुळे लोक जनतावर बऱ्याच ठिकाणी रुसलेले असले तरी त्याचा फार मोठा परिणाम घडेलसं वाटत नाही. कारण 'जनता' पेक्षाही कॉंग्रेस–इंदिरा–महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस आदी कॉंग्रेसी फळ्यांवर लोक जास्त रुसून आहेत, असंही आमच्या ह्या नांदेडकरानं सांगितल. त्यांच्या मते, मराठवाड्यात महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेसला एक–दोन, इंदिराबाईंना दोन–तीन, चड्डीला दहाएक जागा मिळतील तर बाकी सर्व ठिकाणी 'जनता' चे उमेदवार निवडून येतील…

'…आयला, ह्या बसप्रमाणेच सध्या कॉंग्रेसचं टायर जाम पंक्चर झालंय असं वाटून राहयलंय् मला. वऱ्हाडात तर चाक बदलायला पण शिल्लक नाही आहे…' आमच्या वैदर्भीय वाहकाच्या ह्या टिपणीवर सगळा घोळका खदखदून हसला. तेवढ्यात कर्मधर्मसंयोगानं आमचे वाहक, चालक एका ट्रकला थांबवण्यात यशस्वी झाले. जॅक लागला. टायर बदललं गेलं आणि आमची एस्. टी. पुढं धावू लागली; पण दोन तासांच्या अवधीत जे घोळके तयार झाले होते, ते नंतरच्या प्रवासातही तसेच कायम राहिले. गप्पा चालूच राहिल्या…

'…अरे, मला माहीत आहे नं, ती बाई (इंदिराजी !)एकेकाला चाळीस–चाळीस हजार रुपये आणि जीप देऊन राहिलीय नं ! म्हणून हे लोक तिकडं झुकून राहिलेयत्…दुसरं काय…'

'…काही म्हणा राव तुम्ही, पण बाई पक्की 'गट'वाली बघा! एवढं झालं, शहा दणका देऊन राहिलेत; पण बाई ताठ ! ! परवाच्या विदर्भातल्या सभा बघून घ्यायला हव्या होत्या तुम्ही ! काय गर्दी होती. बाई बोलली पण दणक्यात. विश्वासच बसत नाही बघा की, ही बाई आज पंतप्रधान नाही ! कुणी काही म्हणा, बाई खरी पुढारी, तिला तोड नाही. 'जनता'वाले कमी पडतात तिच्या सामने. 'चड्डी'वाले तर एकदमच फिके…लिहून घेता राव, इंदिरा–कॉंग्रेस, विदर्भात ६६ पैकी निदान ३० तरी जागा जिंकणारच ! बाकी थोड्या 'जनता'ला, थोड्या 'चड्डी'ला !' आमचे हे वैदर्भीय सहप्रवासी खामगावचे. इंदिराजींच्या अलीकडच्या नागपूर–दौऱ्यानं प्रभावित झालेले. पुढे विदर्भभर हिंडताना इंदिराजींनी भारावून सोडलेले अनेकजण मला भेटले. वर्षभरापूर्वीची जनतालाट फारशी जुनी झालेली नसताना, केंद्रात जनता सरकार असताना, सर्वसामान्य लोकांकडून अशा प्रतिक्रिया सर्रास ऐकायला मिळतील, असं मला वाटलं नव्हतं; पण त्या तशा ऐकायला मिळाल्या आणि मला आश्चर्य वाटलं आणि म्हणूनच मला असं वाटतं की, इंदिरावाद विदर्भातल्या निवडणुकांवर बराच मोठा प्रभाव पाडणार…!

प्रत्यक्ष विदर्भात पोचण्याआधी मुंबईतल्या वैदर्भियांकडून विदर्भाचा थोडा कानोसा घ्यायचा मी आधीच प्रयत्न केला होता. तिरपुडे, वसतराव साठे आदी इंदिरावादी पुढारी मुंबईतच ठाण मांडून होते. सुरुवातीला तर कॉंग्रेसमधल्या तिकिटवाटपांबाबतचे निर्णय घेण्यासाठी म्हणून वसंतराव नाईक, नरेंद्र तिडके, बॅ. वानखेडे आदी मंडळीही मुंबईतच होती रोजच त्यांच्या काही ना काही पत्रकार परिषदा चाल होत्याच. निवेदनं बाहेर पडत होती. 'कॉंग्रेसचं विभाजन इंदिराजींनी केलं– स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थापायी, सत्तेच्या अभिलाषेपायी केलं, स्वतःला शहा आयोगाशी टक्कर घेण्यासाठी समर्थ बनवण्यासाठी केलं…' कॉंग्रेसजनांचा हा लाडका आरोप होता. स्टेट बॅंक आदी विविध प्रकरणातून, निवडणूकनिधीतून जो प्रचंड पैसा इंदिराजींनी व त्यांच्या पित्त्यांनी गोळा केला तो पैसा आज बोलतो आहे… त्यामुळे त्यांचा आजचा उद्दामपणा आहे…'

इंदिरावाद्यांनी अर्थातच नेमके याच्याविरुद्ध आरोप केले. आपल्याजवळ पैसाच नाही असं सांगून, ही मंडळी पुढे म्हणाली की, 'उलट रेड्डी–चव्हाणच इंदिरा कॉंग्रेसची चारी बाजूंनी नाकेबंदी करायच्या प्रयत्नात आहेत. एकदा इंदिराजींना मार्गातून दूर केलं की, चरणसिंग आदींच्या मदतीनं पुन्हा पूर्वीची कॉंग्रेस बांधायची– इंदिरा गांधी, मोरारजी ह्यांना दूर सारून. अशी कॉंग्रेस बांधली की मार्क्सवादी वगैरे आपोआप बाजूला फेकले जातील आणि यशवंतराव चव्हाणांचा पंतप्रधानकीचा मार्ग मोकळा होईल. त्यासाठी त्यांना जनसंघासारख्या जातीयवाद्यांची मदतही चालेल… अशा हा मोठा

**'इंदिराजी एकेकाला चाळीस-चाळीस हजार रुपये आणि जीप देऊन राहिलीय !'**

राष्ट्रव्यापी कट आहे. त्याच्या मुळाशी रेड्डी—चव्हाण, चरण—वाजपेयी अशी चौकडी आहे. वसंतदादा चौकडीला सामील आहेत. ...पण ह्यांना पुरून उरायला इंदिराजी समर्थ आहेत ! वाईट वाटतं ते फक्त वसंतराव नाईकांचं ! त्यांच्यासारख्या सच्छील माणसानंही ह्या कटवाल्यांच्या उपद्व्यापांना बळी पडावं ह्याचं ! ...

त्याच इंदिरावादी मंडळींनी पुढे जाऊन एक आणखी बेछूट आरोप केला— 'पतियाळा हाउसपाशी बात्राला पिस्तूल घेऊन इंदिराजींवर चाल करून जायला सांगणं हाही ह्याच कटाचा एक भाग आहे. त्यामागेही हीच चौकडी आहे.' प्रकरण न्यायालयात प्रविष्ट असल्यानं ह्याविषयी जास्त काही मला इथे वाक्यं उद्धृत करता येणार नाहीत. तसंच त्या व्यक्तीच्या आग्रहामुळं त्या व्यक्तीचं नावही मला इथं देता येणार नाही. तूर्त तरी हे वाक्य फारसं गंभीर-पणे न घेता, निवडणूकप्रचाराचा एक भाग म्हणूनच त्याकडे मी बघतो. एवढं मात्र खरं की, काँग्रेसच्या गोटातून आणि पुढे जनता गोटातूनही ह्या आरोपाचा निःसंदिग्ध इन्कार केला गेला. नागपुरात जनताच्या एका जबाबदार नेत्यानं तर सांगितलं... 'कोर्टात सत्य-स्थिती बाहेर येईलच; पण मला तरी असं वाटतं की, अमेथीचा संजय गांधींच्या जीपवरचा गोळीबार आणि बात्राकृत इंदिरा गांधींच्या खुनाचा प्रयत्न ह्या दोन्ही कथा एकाच मालिकेतल्या असाव्यात ! ...'

इथे थोडी विषयाला बगल मिळाली असं वाटेल कुणाला; पण विदर्भातनं हिंडताना, ह्या गोष्टीच दोन्ही बाजू भाडवल करत असल्याचं अनेकदा मला जाणवलं आणि म्हणूनच त्या संदर्भात जे ऐकायला मिळालं त्याचा उल्लेख करण्याचा मोह आवरता आला नाही...

विदर्भातले आपापल्या काँग्रेसचे किल्ले लढवण्याची जबाबदारी साहजिकच वसंतराव नाईक आणि नाशिकराव तिरपुडे ह्यांच्यावर येऊन पडलेली आहे. दोघांनाही आपापल्या काँग्रेसच्या यशाची शंभर टक्के खात्री वाटते आहे. दोघांच्याही मते, प्रतिस्पर्धी काँग्रेसशी नव्हे तर जनताशीच त्यांच्या त्यांच्या काँग्रेसला खरी लढत द्यावी लाग-णार आहे ! दोघेही आपल्या विरोधी काँग्रेसला नगण्य समजत आहेत आणि ह्याच आधारावर आपल्याला विदर्भाच्या 'भुस-भुशीत' जमिनीतही घट्ट पाय रोवून उभं राहायला मिळेल अशा सार्थ आशावादामुळे 'जनता'वाले खुशीत आहेत.

वसंतराव नाईकांच्या पाठीशी नरेंद्र तिडके, शेषराव वानखेडे, गोएंका, आगरवाल आदी मंडळी उभी आहेत. जुन्या कार्यकर्त्यांचा संच आहे. सध्या तरी सत्ता पाठीशी आहे. शासकीय आणि पक्षीय यंत्रणाही त्यांच्या बाजूची आहे. संप इतका चिघळू द्यायला नको होता, त्यानं परिस्थिती किंचित बिघडली आहे, असं ते खाजगीत हळूच कबूल करतात; पण त्याचबरोबर त्यामुळे काँग्रेसच्या यशावर त्याचा काहीच परिणाम होणार नाही, असंही आत्मविश्वासानं सांगतात. १९७२ साली विदर्भात काँग्रेसला झंझावाती यश मिळालं होतं. 'त्या वेळेपेक्षा एखादी तरी जास्त जागा ह्या वेळी मी काँग्रेसला विदर्भात मिळवून देईनच !' असा पैजेचा विडाही ते उचलतात; पण अगदी खाजगीत. 'ह्या वेळी जरा अवघड आहे गड्या !' अशी कबुलीही ते देत असल्याचं मला समजलं. नरेंद्र तिडके ह्यांच्यावर प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष ह्या नात्यानं जास्त जबाबदारी आहे. त्यांनाही विजयाची खात्री वाटते; पण वसंतराव जितक्या विश्वासानं बोलतात, तितका आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यात जाणवत नाही. वानखेडे म्हणतात, '...आत्ता काहीच बोलण्यात अर्थ नाही. घोडे-मैदान जवळच आहे...'

विदर्भाच्या भटकंतीची जी पूर्वतयारी मी मुंबईत केली त्या वेळी मिळालेल्या एकूण माहितीची गोळाबेरीज करता, इंदिरा काँग्रेस ही रेड्डी काँग्रेसच्या दृष्टीनं विदर्भात तरी डोकेदुखी ठरेल, हे बहुतेक सर्व उघड वा आडपडद्यानं तरी मान्य करीत होते. इंदिरावाद्यात तर विदर्भाच्या संदर्भात खूपच उत्साह आढळला. विदर्भातली काँग्रेसची फळीच्या फळी इंदिराबाईंकडे वळलेली असल्यानं आणि इंदिराजींचं अभूतपूर्व स्वागत विदर्भभर झालेलं असल्यानं तर हा उत्साह द्विगुणितच झालेला जाणवला. एका इंदिरावाद्यानं तर सांगितलं की, त्यांचा पक्ष विदर्भात सर्वाधिक जागा मिळवील ह्यात कसलाही संशय नाही ...' आणि समजा ते नाहीच झालं, तर निदान चड्डी काँग्रेसला बहुमत मिळू न देण्यात आम्ही निश्चितच यशस्वी होऊ...' दुसऱ्या एका विदर्भवाद्यानं पुष्टी दिली.

आणि नेमक्या ह्याच सूत्रानं, 'जनता' छावणीत उत्साहाचं वातावरण होतं. विदर्भ हा तसा काँग्रेसचा भलाभक्कम प्रांत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या ऐन बहराच्या दिवसात, विदर्भ दमदारपणे काँग्रेसच्या पाठीशी उभा राहिला. नाग-विदर्भ आंदोलन तसं खास वैदर्भियांचं; पण त्याचाही काँग्रेसच्या यशापयशावर फारसा परिणाम दोन-चार पॉकेटस् वगळता कुठे झालेला कधीच जाणवला नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी देशभर आणि महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणावर 'जनता' हवा असूनही, विदर्भावर त्या हवेचा परिणाम जवळ जवळ शून्य होता. ह्यातच जनता पक्षाची तशी भक्कम मांडणी विदर्भात जवळजवळ नाहीच. 'जनता' च्या पूर्वाश्रमीच्या घटक पक्षांपैकी जनसंघ वगळता इतर कुठल्याही पक्षाचं विदर्भात म्हणण्याजोगं काहीही काम नाही. जनसंघाचं होतं ते देखील फार मर्यादित टापूमध्ये. 'जनता' व्यतिरिक्त शेकापचा मर्यादित प्रभाव विदर्भातल्या अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यात आहे. नाग-विदर्भ-वाद्यांचा वर्धा नागपूर प्रदेशात थोडा प्रभाव आहे, तर जुन्या संयुक्त महाराष्ट्रवाद्यांचा काही प्रभाव अमरावती जिल्ह्यात आहे. चंद्रपूरचा आदिवासी भाग, तिथले राजे विश्वेश्वरराव झुकतील तिकडे झुकणारा. विरोधकांची विदर्भातली ही पॉकेटस्,तीही फार छोटी छोटी. काँग्रेसला प्रभावी विरोध होईल असं चित्र त्यामुळं विदर्भात तसं कधीच तयार झालेलं नाही आणि ह्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकी-मध्ये 'जनता' ला मुळात तशी फारशी आशा नव्हती; पण इंदिरा गांधींचं राजकीय मंचावरचं नाट्यपूर्ण, घणाघाती पुनरागमन, नाग-विदर्भवाद्यांचं जांबुवंतराव धोटे आणि राम हेडाऊ ह्या दोन

## '...पण काही म्हणा, बाई खरी पुढारी !'

# ‘ वसंतराव नाइकांचे नाव ’

वसंतराव फुलसिंग नाईक (माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) हा मोठा गमत्या माणूस दिसतो. काही तरी पिल्लू सोडून द्यायचं आणि धमाल उडवून द्यायची ही याची सवय. आता तुम्हीच बघा ना, गेल्या आठवड्यात मुंबईत ‘ चड्डी ’ कॉंग्रेसच्या प्रचाराचा नारळ फोडताना वसंतराव गरजले, ‘याआधीच्या विधानसभा निवडणुकीत विदर्भातून कॉंग्रेसला जितक्या जागा मिळाल्या होत्या त्यापेक्षा किमान एक तरी अधिक जागा या वेळी मी कॉंग्रेसला मिळवून दिली नाही तर मी माझे नाव बदलून घेईन !’ आणि साऱ्या महाराष्ट्रात धमाल उडाली. ठिकठिकाणी वसंतरावांचे दुसरे बारसे कुठे करायचे आणि नवीन नाव काय ठेवायचे यावर चर्चा सुरू झाली.

गेल्या विधानसभा निवडणुकीत विदर्भातील आठ जिल्ह्यात ५५ कॉंग्रेसवाले निवडून आले होते. म्हणजेच जर येत्या निवडणुकीत ‘ चड्डी ’ कॉंग्रेसला ५६ जागा मिळाल्या तरच वसंतराव ‘वसंतराव नाईक’ म्हणून शाबूत राहतील. या विदर्भात दुसरेही एक वसंतराव शड्डू ठोकून निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. ते वसंतराव म्हणजे इंदिराजींचे एक प्रमुख सेनानी ज. वसंत साठे. एखादा पहिलवान किंवा खेळाडूचा संघ आपल्याला मिळालेला किताब, चषक वगैरे टिकविण्यासाठी जेव्हा प्रतिस्पर्ध्यांशी लढत देत असतो तेव्हा त्याला ‘ Defending champion ’ असे म्हणतात. उदा. बॉबी फिशर येत्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत Defending champion आहे. सत्पाल भारत केसरी-पदाचा D. C. आहे इत्यादी इत्यादी; पण येत्या निवडणुकीच्या आखाड्यात आपले ‘ नाव ’ टिकविण्यासाठी लढत देत असलेले वसंतराव नाईक हे या प्रकारचे जगातील पहिलेच ‘ Defending champion ’ असावेत.

आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांना आपल्या स्वतःच्या नावाबद्दल काही choice नसतोच. अगदी जन्मापासून इतर लोकच आपल्याला नावं ठेवीत असतात. आपल्या आई-वडिलांना जे काही नाव भावेल तेच नाव आपल्याला कायमचं चिकटतं; पण मुलाचे पाय पाळण्यात ओळखण्याइतके सगळेच आई-बाप काही हुशार नसतात ! मग

‘लक्ष्मी वेचते गोवरी ।
भीक मांगत धनपाल ।
अमरसिंह तो मर गया । ’

अशी परिस्थिती होते.

पण व. फु. नाईक हे सामान्य जन नव्हेत. ते स्वतःच आपलं नाव बदलायला निघाले आहेत. तमाम भारतीय भाषातील हजारो नावं त्यांच्यापुढं नम्र होऊन उभी आहेत. कौनसा भी उठाव ! त्यांच्या आजवरच्या कर्तृत्वाला, पराक्रमाला साजेशी नावंही आपल्या मायबोलीत आहेत. व. फुं. च्या व्यक्तिमत्त्वाचं चपखल वर्णन करतील अशी देखील नावं आपल्याकडे आहेत. नाईकसाहेबांनी आत्ताच त्याबाबत विचार केलेला बरा. कारण विदर्भात ‘ चड्डी ’ कॉंग्रेसला ५६ जागा मिळणं शक्य नाही, हे एखादा गर्दभही सांगू शकेल !

मग नाईकसाहेबांनी कोणतं नाव निवडावं? बरीच लेखक, कवी वगैरे मंडळी एखादं टोपणनाव घेतात; पण पोरानं नाव बदललं याचं बापाला वाईट वाटू नये म्हणून आपल्या पिताजींचं नाव त्या टोपणनावात घुसडतात. जसे केशवसुत, केशवकुमार...तर मग फुलसिंगसुत कसं काय वाटतं ? छे: ! पण सिंगसुत ही युती बरोबर वाटत नाही. ते नाव नकोच. काही उद्योगी लोक आपल्या नावाची तोडमोड करून एखादं नवीन सुटसुटीत नाव तयार करतात. उदा. हेमंतचं हेमू, अविनाशचं अवि, जयदीपचं दीप, चंद्रशेखरचं शेखर वगैरे. ‘ वसंत ’मधला ‘ व ’ जर उडवला तर नवीन नाव तयार होतं— ‘संत.’ ना. संत नाईक ! या नावाचा एक फायदादेखील आहे. काही दिवसांपूर्वी गृहमंत्री चरणसिंग म्हणाले होते, ‘मी काही संत नाही !’ चड्डी कॉंग्रेसवाले आता नाइकाना पुढे करून म्हणू शकतील, ‘ बघा, आमच्या नेत्यांच्या नावातच संत आहे !’ अरेच्या ! पण एक गफलत झाली. विदर्भात आधीच एका सरकारी ‘ संता ’चा अवतार चालू असताना दोन-दोन सरकारी संत नकोत !

काही व्यक्तींची नावे त्यांच्या कर्तृत्वाला, पराक्रमाला साजेशी असतात. (राणा) प्रताप, जयप्रकाश, जांबुवंतराव ही त्यापैकी काही ठळक उदाहरणं; तर काही नावांमधून त्या माणसाचं व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर साकार होतं. उदा. रामदास, ज्ञानेश्वर, मार्टिन ल्यूथर किंग (मार्टिन ल्यूथर=योद्धा) वसंतराव फुलसिंग नाइकांचं कर्तृत्व व व्यक्तित्व आपल्याला परिचित आहेच. पोकळ बढाया मारण्यात त्यांचा हात कोणी धरू शकणार नाही ! ‘पोकाळराव’, ‘बढायासिंग’ ही नावं त्यांच्या भोंगळ कर्तृत्वाची लोकांना याद देऊ शकतील. मागे नाईकमहाराजांनी एक घोषणा केली—‘दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर मला फाशी द्या !’ नाईक गेले ! (मुख्यमंत्रिपदावरून गेले, फाशी नव्हे !) अनुशासनशंकर चव्हाण गेले, दादा देखील जाण्याच्या मार्गावर आहेत; पण महाराष्ट्र अन्नधान्याच्या क्षेत्रात अजून स्वयंपूर्ण व्हायचाच आहे ! मग नाइकांच्या घोषणेचं काय ? ‘ घोषणाबहादुर ’ हे नाव चपखल ठरायला काहीच हरकत नाही. आपल्या उमेदीच्या काळात नाइकानी मुंबईमध्ये काही कागदी वाघांना आपल्या इच्छेप्रमाणे नाचवलं. ‘कागज शेरसिंग ’ हे नाव त्यांच्या या कर्तृत्वाला नक्कीच न्याय देऊ शकेल. वसंतराव तसा शांत माणूस; समन्वयवादी, आपल्या भेटीला आलेल्या शिष्टमंडळाना, पत्रकारांना ‘ होय नाही ’ या दोन्ही अर्थांनी मान डोलावून बुचकळ्यात पाडणारा. शांतिसागर, शांतिकुमार, स्तंभमुख, होयबा—नायबा ही नावं देखील वसंतरावांना आवडायला हरकत नाही. आडनावाच्या बाबतीत म्हणाल तर फारसा काही choice दिसत नाही; पण नाइकांना पाईक (पाइप नव्हे) हे आडनाव जास्ती शोभून दिसेल. काही दिवसापूर्वीच ते इंदिराजींच्या (स)माजवादाचे पाईक होते आणि आता...

पण एक पक्कड नाव मात्र नाईकसाहेबांना नक्कीच आवडेल ! त्यांचीच काय पण त्यांच्या राजकीय गुरूंचीही लोकाना आठवण होईल असे आहे ते नाव घेतले की ‘ चड्डी ’ कॉंग्रेसमधील दोन महारथी डोळ्यांसमोर उभे रहातील. लोकांचा फारच घोटाळा होऊ लागला तर जास्तीत जास्त गुरूंच्या नावापुढे सीनिअरमधला (सि) आणि शिष्योत्तमांच्या नावापुढे (ज्यु) टाकला की झाले. ते शुभनाम आहे ‘ कुपणराव !’

बघा तर व. फुलसिंग ना. या नावांच्या जंत्रीतून आत्ताच आपल्या नवीन नावाची निवड करा. वेळ फार थोडा आहे ! अरे पण हो ! आपण पण अगदीच मामा आहोत. उद्या जरी विदर्भात ‘ चड्डी ’ कॉंग्रेसची नावनिशाणीही उरली नाही तरी हे फेकूसिंग नाईक आरामात पाइप ओढत म्हणतील,

‘अरे ! नाव कसले बदलताय. शेक्सपियरने म्हटलेच आहे की नावात काय आहे ?’

—किरण गोखले

पार्यामध्ये विभाजन, चंद्रपूरच्या राजे विश्वश्वररावानी 'जनता' च्या बाजूनं टाकलेलं झुकत माप ह्यामुळं, विरोधकांच्या दृष्टीनं त्या निराशामय परिस्थितीत आज खूपच फरक पडलेला आहे. त्यांच्या दृष्टीनं त्यांच्या विजयाच्या आशा ह्या घडामोडीमुळं खूपच उचावल्या आहेत. विदर्भाकडे कूच करताना तरी चित्र हे असं मनापुढे होतं. अकोल्यात बस शिरत असताना, महाराष्ट्रातल्या सत्ताधारी कॉंग्रेसला इंदिरा कॉंग्रेसनं जे जबरदस्त धक्के दिलेले होते त्याचीही जाणीव सामान्य लोकांच्या बोलण्यातनं होत होती. एकूण विदर्भातल्या दौऱ्यात, ठाणे-सोलापूरच्या मानान वेगळं चित्र पाहायला मिळेल अशी आशा अकोल्याच्या बस स्टँडवर उतरताना मनात निर्माण झाली होती.

अकोल्याची लोकसभेची जागा पहिल्यापासून कॉंग्रेसची. श्री. अजगर खान हे तिथनं १९७१ च्या झंझावाती निवडणुकीत निवडून आले. नंतरच्या पोटनिवडणुकीत नागपूरच्या श्री. वसंतराव साठे ह्यांना उभं करण्यात आलं. इंदिरालाटेत ते विजयीही झाले. १९७७ च्या 'जनता' लाटेच्या काळातही पुन्हा तेच निवडून आले 'जनता' च्या मोतीरामजी लहानेंचा पराभव करून. वसंतराव साठे ह्यांच्या ह्या दोन्ही विजयांमध्ये, वसंतराव नाइकांचा वाटा सिंहाचा होता. कॉंग्रेसशिवाय इतर पक्षाचा दबदबाच तिथे नव्हता हे खरं; पण तरीही नागपुरात राहून अकोल्याची जागा लढवणं तितकंसं सोपं नव्हतं. असं असल तरी इंदिराजींची खास मर्जी साठ्यांवर होती. असं म्हणतात की, ७७ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये अकोल्यातून साठे निवडून आलेच पाहिजेत, असे खास आदेश इंदिराजींनी नाईकांना दिलेले होते आणि त्यामुळे स्वतःच्या वाशीम मतदारसंघापेक्षाही जास्त काळ नाईक अकोला मतदारसंघात हिंडले. अर्थात ७० ते ७७ ह्या काळातल्या एकूणच हालचाली बघितल्या तर जाणवतं ते हे की, साठ्यांनी शिडीचा उपयोग संपल्यानंतर शिडी दूर करायचाच सातत्यानं प्रयत्न केला. इंदिरा दरबारात त्यांचं वजन वाढत गेलं; तर वसंतराव नाईक आणि इंदिराजी ह्यांच्यातली दरी रुंदावतच गेली!

इंदिराजींच्या दरबारातल्या त्यांच्या खास स्थानामुळे वसंतराव साठे ह्यांच्याकडे अकोल्यातला बराच मोठा वर्ग झुकला, ह्यात वाद नाही. आज ते इंदिरा कॉंग्रेसच्या बाजूला आहेत. साहजिकच, गेल्या सात-आठ वर्षांत जो घोळका त्यांनी आपल्या बाजूला ओढला तोही त्यांच्याबरोबर इंदिरावादी झाला आहे. अकोल्यावर आर्थिक वर्चस्व गोएंका, गोयेल, आगरवाल वगैरे मारवाडी मंडळींचं. जमनलाल गोएंका आणि त्यांच्याबरोबर इतर काही मंडळी कॉंग्रेसकडे असली तरी ह्या समाजातली बरीच मातबर मंडळी इंदिरागटाकडे आहेत. खुद्द अकोल्यात 'जनता'नं श्रीमती प्रमिला जैन ह्यांना तिकीट दिलेलं आहे व त्यामुळें 'जनता'ची आजची देशावरली पकड लक्षात घेऊन, आर्थिक नाड्यांवर ताबा ठेवणाऱ्या ह्या गटातली काही मंडळी प्रमिलाबाईंच्या मागेही आज आहेत. त्यामुळे, एरवी एकसंघ कॉंग्रेसच्या बाजूनं लढणारा हा समाज आज तीन गटांत विभागलेला आहे.

खुद्द अकोल्यात आणि जिल्ह्यातल्या बाळापूर, मगरूळ पीर आदी भागात मुसलमानांचंही बरंच वर्चस्व आहे आणि एकंदरीनं हा समाज इंदिराबाईंच्या पाठीशी विदर्भात तरी उभा आहे. किंबहुना त्याच कारणानं खुद्द अकोल्यातून इंदिरावाद्यांनी खान महमद अजगर हुसेन ह्यांना उभं केलेलं आहे हुसेनसाहेब, रेड्डी कॉंग्रेसचे जमनालाल गोएंका आणि 'जनता'च्या प्रमिला जैन ह्यांच्यातच त्यामुळे खरी लढत आहे. शहरी भागातून प्रमिलाबाईंना वाढता पाठिंबा दिसतो; तर शहरातल्या मुस्लिम मोहल्ल्यांतून हुसेन ह्यांचा पाठिंबा वादातीत आहे. गर्भश्रीमंत व त्यांच्या तालावर नाचणारा समाज वर म्हटल्याप्रमाणे विभागलेला असला तरी तिथे कदाचित जमनलालजी आघाडी मारून जातील. दलित पँन्थरनही इथे आपला उमेदवार उभा केलेला असल्यानं, कॉंग्रेसच्या मतपेट्या हमखास भरणारा हा समाजही ह्या वेळी कॉंग्रेस विरोधात आहे. तर कामगार वस्तीतली मतं, कम्युनिस्ट उमेदवारामुळे विभागली जायची शक्यता आहे. ह्या सर्व वजाबाक्यांचं गणित माडलं तर ७७ च्या लोकसभा निवडणुकीत मिळवलेली ५०००० ची आघाडी पार रोडावून जाते; तर उलट त्या मानानं 'जनता'त फारशी दुफळी नसल्याने त्यांच्या विजयाची आशा उचावते. लोकसभा निवडणुकीच्या वेळी दोन्ही कॉंग्रेस, कम्युनिस्ट, दलित पँन्थर हे सर्व जनता विरोधात एकत्र होते. आज नेमकं उलटं झालेलं आहे. 'जनता'च स्वरूप होतं तसंच आहे तर प्रतिपक्ष जवळजवळ चौभागला गेला आहे. सपकाळ, सरनाईक वगैरे कॉंग्रेसमधली बडी मंडळी नाराज आहेत. तर पराशरासारखी सतत पंधरा वर्षे नगराध्यक्षपद भूषविणारी व्यक्ती इंदिरावादी आहे आणि स्वतः जमनलाल गोएंका बरेच वजनदार आहेत. त्यामुळे पारंपारिक कॉंग्रेस मतदाराची चांगलीच रस्सीखेच चालू आहे. ह्या साऱ्याचा फायदा पचरंगी लढतीत 'जनता' च्या प्रमिला जैनना मिळाला नाही तरच नवल.

जी परिस्थिती शहरात तीच काहीशी जिल्ह्यात. जिल्ह्यात नऊ जागा आहेत. त्यातल्या किमान पाच जागा 'जनता' आणि त्याच्या मित्रपक्षांना मिळाव्यात अशी परिस्थिती, वरील वजाबाकीच्या गणितामुळे आहे. उरलेल्या चारातली एखादी जागा शेकापच्या वाट्याला तर उरलेल्या कॉंग्रेस/इंदिरा कॉंग्रेसमध्ये विभागून जाव्यात

आणि एकूण विदर्भात हे 'जनता' विरोधी शक्तींमधलं वजाबाकीचं राजकारण निवडणुकीत प्रभावी ठरणार, असं दिसतं आहे. 'जनता' त्या मानानं खूपच एकसंघ आहे. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे, उमेदवारनिवडीबद्दल 'जनता'मध्ये इथं फारशी खळखळ नाही, नाराजी नाही. शेकापबरोबरची युति इथेही संपुष्टात आलेली आहे; पण शेकापची शक्तीच विदर्भात इतकी तोकडी आहे की, त्याचा इथल्या राजकारणावर कसलाच परिणाम व्हायची शक्यता नाही, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यातली काही छोटीशी क्षेत्रं सोडली तर इतरत्र, मत फोडण्याचीही क्षमता ह्या पक्षाकडे विदर्भात नाही. मार्क्सवादी, खोब्रागडे-कांबळे गट, नाग-विदर्भवाद्यांमधला हेबाळ गट

## प्रतिपक्ष चौभागला आहे...जनता एकसंध आहे.

आणि जनता पक्ष ह्या सर्वांमध्ये विदर्भात इतकं चांगलं सामंजस्य मला जाणवलं की, त्यामुळे ती एक भक्कम फळी उभी राहल्याचं निदान मला तरी वाटलं !

नेमकी उलटी परिस्थिती आहे 'जनता' विरोधी गटात—कांग्रेस पार ढेपाळून गेली आहे. विद्यार्थी संघटना आणि तरुणवर्ग तिरपुड्यांच्या खिशात असल्यानं, कांग्रेस अंतर्गत 'पुरोगामी' वा 'दमबाज' गट इंदिरा कांग्रेसच्या मागे आहे. तर त्याहूनही मोठा गट अजूनही कांग्रेसमध्येच आहे. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे इथेही कांग्रेसमधून लोंढेच्या लोंढे बाहेर पडले; पण विदर्भात ही मंडळी 'जनता'त घुसण्याऐवजी इंदिरा कांग्रेस किंवा शेकापकडे झुकली त्यामुळे कांग्रेसवाल्यानी 'जनता'त घुसून जनता पक्षात गोंधळ माजण्याचा पश्चिम महाराष्ट्रातला प्रकार विदर्भात घडला नाही. परिणामत लोकांपुढे विदर्भात आज चित्र आहे ते कांग्रेस मधल्या अंतर्गत रस्सीखेचीचंच ! त्यात पुन्हा इंदिराजीच्या खास दोस्तानी कम्युनिस्टांनी या वेळी इंदिरा कांग्रेसशी वा रेड्डी कांग्रेसशी घरोबा करायच सोडून स्वत ची वेगळी चूल मांडली आहे.

प. महाराष्ट्रातल्या सौदेबाजीचा, गोंधळाचा फारसा परिणाम विदर्भावर होणार नाही, असा विश्वास वरील तिन्ही प्रमुख गटांनी दाखविला. त्यांच्या मते, 'महाराष्ट्रात असूनही विदर्भाची जडणघडण तशी वेगळी आहे आणि म्हणूनच मुंबई–पुण्यातल्या उलथापालथींचा, तिथल्या चळवळीचा तसा प्रभाव विदर्भावर कधीच पडत नाही. विदर्भ बदलाला चटकन् तयार होत नाही म्हणूनच, संयुक्त महाराष्ट्राच्या लाटेत, जनतालाटेत विदर्भानं कांग्रेसलाच निवडून दिलं.'

'तसंच आजही वैदर्भीय जनता कांग्रेसच्या बाजूनंच उभी राहील !' इति नरेंद्र तिडके.

'त्यामुळेच मला खात्री आहे की, 'जनता'लाट येवो वा 'चड्डी'-वाले इंदिराविरोधी ढोल वाजवोत, विदर्भ आजही ७२–७७ प्रमाणे इंदिरा गांधीनाच समर्थन देईल...' असं नाशिकराव तिरपुडेना वाटतं. तर 'जनता'चे विदर्भातले एक प्रमुख प्रवक्ते म्हणतात. 'केंद्रातल्या 'जनता' शासनाची ओळख विदर्भाला आता पटली आहे. लोकसभेच्या वेळी विरोधी मत नोंदविण्याची चूक केल्याचंही त्यांना पटलं आहे. महाराष्ट्रातही 'जनता' अधिकारावर येणार हे त्यांना पटल आहे. ते त्यांना हव आहे. त्यामुळे प. महाराष्ट्रातल्या गोंधळानं किंवा इंदिराजीच्या 'स्टंट्स्'नी बावचळून किंवा वाहवत ते नक्कीच जाणार नाहीत. 'जनता'लाच ते भरघोस यश देतील !'

आणि विदर्भात हिंडताना हे खरोखरच जाणवलंही की, प. महाराष्ट्रातल्या गोंधळामुळे विदर्भात गोंधळ उडण्याची शक्यता तशी कुठेही नाही.

अकोला ते अमरावती हाही टप्पा मी एस्. टी. नंच गाठला. माझ्या सुदैवानं एक स्थानिक पत्रकार मला सहप्रवासी ह्या नात्यानं भेटला. गप्पांचा ओघ निवडणुकांकडे वळण अगदी ओघानंच आलं. अकोला, अमरावती, यवतमाळ वगैरे जिल्हे त्याचेही हिंडून झाले होते. पत्रकार कांग्रेसी वृत्तपत्रासाठी काम करीत असलेला होता. तरी स्वत: मात्र तसा पीएस्पीवाला होता. ह्याचा एक परिणाम असा झाला की, मला त्याच्याकडून बरचस समतोल असं चित्र मिळालं. त्याच्या मते, अकोल्यात जनता आणि इंदिरावादी ह्यांना समसमान संधी आहे; तर यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यांतून रेड्डी कांग्रेसच सरळ सरळ वरचढ आहे. खुद्द यवतमाळची जागा मात्र जांबुवंतराव घोटे ह्यांना मिळावी असा त्याचा होरा दिसला. मला स्वत:लाही एकूण बेरजा–वजाबाक्यांचा विचार करता, असंच मत बनवायचा मोह झाल्यावाचून राहिला नाही; पण नंतरच्या वेगवेगळ्या स्वरातल्या लोकांशी झालेल्या बोलण्यावरून जाणवलं ते असं की, जांबुवतरावांची 'सीट' तशी अगदी 'श्युअर' नक्कीच नाही. यवतमाळच्या इंदिराजीच्या सभेला प्रचंड गर्दी झाली होती यात वाद नाही. मूळ कांग्रेसमधला, वसंतराव नाइकांच्या खांद्याला खांदा लावून लढणारा मोठा गट इंदिरा कांग्रेसला मिळाला हेही खरं. नाग-विदर्भवाद्यांमधला जांबुवंतराव घोटयांचा गट जास्त आक्रमक आहे, त्यांच्या फॉरवर्ड ब्लॉकला यवतमाळमध्ये स्थान आहे ह्यातही शंका नाही. एवढं सगळं असलं तरी खुद्द जांबुवतरावांचीच प्रतिमा आज विदर्भात तितकीशी उजळ राहिलेली नाही जांबुवंतराव घोटयांची तुलना बाळासाहेब ठाकऱ्याशी करायचा मोह मला खूपदा आवरत नाही. तीच उद्दाम भाषा, त्याच निर्लज्ज कोलांटया उडया ! जनतेला सदा सर्वकाळ फसवीत राहाता येत नाही, हे ह्या दोन्ही नेत्यांच्या ज्या दिवशी लक्षात येईल व त्यानुसार ते आपल्या डावपेचांमध्ये फरक करतील, त्या दिवशी महाराष्ट्राला दोन चांगले नेते मिळतील असंही मला खूपदा वाटतं. असो. तर ज्या कारणांनी आज शिवसेनेला मुंबई–ठाण्याच्या तिच्या बालेकिल्ल्यांमध्ये फारसा भाव राहिलेला नाही, तशाच कारणांनी जांबुवंतराव आपली प्रतिष्ठा आज कमी करून बसलेले आहेत. मग भले यवतमाळात बोलताना देशमुख त्यांची तुलना हनुमानाशी करून रामाच्या मदतीला हनुमान तसे इंदिराजीच्या पाठीशी जांबुवतराव, असं कितीही म्हणू देत !

यवतमाळ जिल्ह्यात वसंतराव नाईकांचं वजन अजूनही कायम आहे आणि जवाहरलाल दर्डा वगैरे त्यांचे खंदे पुरस्कर्ते आज त्यांच्या विरुद्ध गेलेले असले तरी, यवतमाळ जिल्ह्यातल्या निवडणूक निकालाना वळण देण्याचं सामर्थ्य आज तरी फक्त त्यांच्याच हातात आहे. यवतमाळ जिल्ह्यातल्या आठ जागांपैकी किमान पाच जागा रेड्डी कांग्रेसला मिळाव्यात असा माझा होरा आहे. वसंतराव नाईकांचे पुतणे सुधाकर नाईक ह्याच जिल्ह्यातल्या पुसद मतदारसंघातून उभे आहेत.

अमरावती जिल्हा खरा तसा पूर्वी विरोधकांचा जिल्हा म्हणून गणला जायचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा संपूर्ण विदर्भात कुठे थोडासा प्रभाव जाणवला तो अमरावतीतच ! त्याच काळात समाजवादी कम्युनिस्ट आणि काही अंशी जनसंघीय नेतृत्व इथे फुलल; पण दुर्दैवानं, ह्या परिस्थितीचा फायदा 'जनतानं' हवा तसा उठविलेला नाही. खुद्द अमरावतीत मुनीरखान उस्मानखान ह्यांना तिकिट देऊन 'जनता'न जणू ही जागा सरळ सरळ कांग्रेस / इंदिरा कांग्रेसला आंदण देऊन टाकलेली आहे. इथे खरी लढत कांग्रेसच्या ह्या दोन पात्यांतच व्हायची शक्यता आहे. कांग्रेसचे केडिया आणि इंदिरा कांग्रेसचे छत्रपाल ह्यांच्यातली ही लढत अत्यंत चुरशीची व्हावी अशी अपेक्षा आहे. ताज्या इंदिरालाटेत अनेक जुने कांग्रेस कार्यकर्ते इंदिरा कांग्रेसकडे वळल्याने त्यांचं पारडं आज तरी जड आहे असं वाटतं.

अमरावतीजवळच्या बडनेऱ्याची जागा मात्र मार्क्सवादी कम्यु-

निस्ट उमेदवार जिंकून घेईल असं गृहीत धरायला हरकत नाही. जिल्ह्यातल्या इतर सात जागांपैकी तीन–चार जागा काँग्रेसला मिळाव्यात अशी अपेक्षा आहे

वर्धा हा महाराष्ट्रातला सर्वांत छोटा जिल्हा. फक्त दोन विधानसभा मतदारसंघ असलेला. त्यातही आर्वी मतदारसंघात अमरावती जिल्ह्याचाच काही भाग असलेला. महात्माजींचं सेवाग्राम आणि विनोबांचं पवनार ही दोन्ही आजच्या युगाची 'तीर्थक्षेत्रं'ही ह्याच जिल्ह्यातली. कमलनयन बजाज आदींमुळे पुढे आलेला. राज्यातल्या सुशिक्षितांचं प्रमाण जास्त असलेल्या जिल्ह्यांपैकी एक. सुपीक, काळ्याभोर जमिनीमुळे कापसाच्या एकरी उत्पादनात अग्रेसर ठरलेला, तर हिंगणघाट, पुलगावच्या गिरण्यांमुळे औद्योगिक दृष्ट्याही पुढारलेला. पुलगावच्या मिलिटरी कॅंपमुळे महत्त्व पावलेला असा हा छोटासा जिल्हा. पूर्वी, तसा हा जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला; पण इथेही अकोला जिल्ह्याप्रमाणे आज चित्र खूपच बदललेलं आहे. श्रीमती प्रभा राव इंदिराबाईंना मिळाल्यामुळं रेड्डी काँग्रेसची स्थिती इथं नाजूक झालेली आहे. त्यातच खुद्द वर्ध्यातून मार्क्सवादी उमेदवार घंगारे उभे आहेत. ते लोकप्रिय आहेत. 'जनता'चं समर्थन त्यांना लाभलेलं आहे. त्यामुळे या मतदारसंघातल्या चड्डी (चव्हाण-रेड्डी काँग्रेस) आणि धोती (धोटे–तिरपुडे आघाडी) ह्यांच्या लढाईत घंगारे बाजी मारून जातील अशी आशा धरायला हरकत नाही. ह्या जिल्ह्यातली दुसरी महत्त्वाची जागा आर्वीची. 'जनता'चे वाघ ही जागा हसत खेळत जिंकतील जिल्ह्यातल्या खोब्रागडे गटासाठी 'जनता'ने सोडलेल्या बाकी दोन जागांवरही काँग्रेसला आज विजयाची खात्री देता येणं कठीण आहे.

विदर्भाची राजधानी ह्या नात्यानं नागपूरकडे सर्वांचं लक्ष लागलेलं असावं ह्यात काहीच नवल नाही. त्याचप्रमाणे खुद्द नागपूर शहरातून दोन आणि जिल्ह्यातून एकूण चार मंत्री निवडणूक लढवीत आहेत, त्यामुळेही निवडणुकींना आगळं महत्त्व प्राप्त झालेलं आहे. दक्षिण नागपूरमधून मदन गोपाळ अग्रवाल हे जनता आघाडीच्या रामानंद घेपे (खोब्रागडे) ह्यांच्याशी लढत देत आहेत. ह्याखेरीज इंदिरा काँग्रेसचे वंजारीही इथेच उभे आहेत आणि एकंदरीनं पाहता ह्या तिरंगी लढतीत मदन गोपालांना कुठलाही धोका दिसत नाही.

काँग्रेसच्या दुसऱ्या मंत्री डॉ सुशीला बलराज मात्र त्यांच्या नेहमीच्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध ह्या खेपेला पराभूत होतील, असं वाटतं. जनता पक्षानं मंत्री बाईंविरुद्ध सुमतीबाई सुकळीकरांना उभं केलेलं आहे. ह्या दोघींमधली ही चौथी लढत. गेल्या तिन्ही खेपांना सुशीलाबाई चार–सहा हजार मतांनी निवडून आलेल्या आहेत. ह्या वेळी परिस्थितीत महत्त्वाचा फरक आहे. सुमतीबाई ह्या वेळी जनसंघाच्या नव्हे, 'जनता'च्या उमेदवार आहेत. रिपब्लिकन, नाग-विदर्भवाद्यांचा हेडाऊ गट, मार्क्सवादी ह्यांच समर्थन त्यांना आहे; तर शासकीय कर्मचाऱ्यांचा सुमारे अठरा हजार मतदारांचा गट त्यांच्याबाजूनं एकसंध उभा आहे. मतदारसंघाचं स्वरूपही बरंचसं पांढरपेशं आहे आणि तिथे 'जनता'चा दबदबा आहे. नेमकी ह्याउलट परिस्थिती काँग्रेसची आहे. इंदिरा काँग्रेसचे श्री. मुलक हे माजी महापौर आणि तशी बलाढ्य असामी. काँग्रेसला पडलेलं ते भलं मोठं भगदाड आहे; परंतु जिंकून येऊ शकेल एवढं सामर्थ्यही तिथे नाही. त्यामुळे पूर्वापार चालत आलेल्या ह्या लढाईत सुमतीबाई ह्या वेळी मागच्या पराभवाचं उट्टं काढतील असा होरा आहे. ह्याच मतदारसंघात हिंदूमहासभेनं विक्रम सावरकरांना उभं केलं आहे; पण त्यांचं नाव कुणीही विचारात घेताना दिसल नाही.

नागपूर मध्यची जागा नाग-विदर्भचे राम हेडाऊ 'जनता'च्या पाठिंब्यावर सहज जिंकून घेतील, ह्याबद्दल नागपुरात तरी दुमत नाही. काँग्रेसनं ह्या ठिकाणी मुस्लिम लीगला पाठिंबा दिला आहे आणि त्यांचे सादिक अली शमीम मतदारसंघातही खूपशा लोकांना अपरिचित आहेत इंदिरा काँग्रेसचे ह्या मतदारसंघातले उमेदवार आहेत श्री. सुर्वे. त्यांच्या उमेदवारीबद्दल इंदिरा काँग्रेसमध्येच नाराजी आहे.

नागपूर उत्तरची जागा खोब्रागडे गटाला जावी तर नागपूर पूर्व काँग्रेसच्या नाइकांकडे जावा अशी अपेक्षा आहे. जिल्ह्यातनं शेषराव वानखेडे आणि शंकरराव गेडाम हे आणखी दोन मंत्री उभे आहेत. शिवाय सावनेर ह्या नरेंद्र तिडक्यांच्या मतदारसंघातनं श्री. केदार उभे आहेत. हे तिघही उमेदवार निवडून येतील असा अंदाज आहे.

चंद्रपूर...आकारानं सर्वांत मोठा जिल्हा. जंगलमय प्रदेश. आदिवासी बहुसंख्य. इथलं राजकारण, आधी म्हटल्याप्रमाणे राजे विश्वेश्वर रावांभोवती फिरतं. लोकसभा निवडणुकीत तेच 'जनता'च्या पाठिंब्यानं निवडून आले होते आणि आज जिल्ह्यातल्या विधानसभेच्या जागांचं जे वाटप झालेलं आहे ते पाहता हा जिल्हा 'जनता'नं जवळ जवळ पूर्णपणे विश्वेश्वर रावांना देऊन टाकलेला आहे. 'जनता' स्वत. नऊपैकी फक्त दोन जागा लढवीत आहे. पैकी चिमूरची जागा ते जिंकतील अशी शक्यता आहे. जिल्ह्यातल्या उरलेल्या सात जागा विश्वेश्वर राव आणि खोब्रागडे गट ह्यांच्यासाठी सोडलेल्या आहेत. जिल्हा काँग्रेसमध्ये अभूतपूर्व भांडण आहेत आणि त्यामुळे दाट शक्यता अशी आहे की, ह्या तीन गटाकडे जिल्ह्यातल्या नऊ पैकी आठ जागा जातील.

विदर्भातल्या बाकीच्या जिल्ह्यातलं चित्र साधारणत: नागपूर–अकोल्यासारखच आहे. काँग्रेसच्या चड्डी–धोतीतली भांडणं आणि त्यात 'जनता'चा फायदा! किंबहुना विदर्भातल्या 'जनता'च्या विजयाच्या शक्यतेच एकूण गणितच ह्या काँग्रेसला ग्रासीत असलेल्या दुहीच्या शापावर आधारित आहे आणि त्यात काहीही चूक आहे असं वाटत नाही.

विदर्भात एकूण ६६ जागा आहेत. सर्व शक्याशक्यता विचारात घेता, इंदिरा काँग्रेसची जी धडक विदर्भाला बसलेली आहे, तिच्या परिणामांवरच अंतिम निकाल अवलंबून राहील. धडकीचा परिणाम जेवढा जास्त राहील तेवढ्या जास्त जागा 'जनता'ला मिळतील. परिणाम जिथे कमीत कमी राहील तिथे रेड्डी काँग्रेसची शक्यता जास्त राहील. मी नागपूरहून मुंबईकडे निघताना तरी इंदिराबाईंच्या नाग–विदर्भ दौऱ्याचा चागलाच परिणाम लोकांवर जाणवत होता. काँग्रेसकडून इंदिरा काँग्रेसकडे झुकणाऱ्या नेत्यांची, कार्यकर्त्यांची आकडेवारी रोजचे रोज वाढताना दिसत होती; पण आज हे वार्तापत्र प्रत्यक्ष लिहिताना, गंगा उलटी वाहू लागल्याच्या बातम्या वाचायला मिळत आहेत. एकूण सारासार विचार करून आज जी शक्यता मला दिसते ती अशी –

जनता व मित्रपक्ष ३० ते ३५ जागा, रेड्डी काँग्रेस गट २० ते २५ जागा, इंदिरा काँग्रेस गट १० च्या आसपास, शेकाप एक किंवा दोन.

□

# जिल्हा अहमदनगर : पृष्ठ ७ वरून

कोल्हे यांची तयारी आहे. तालुक्यासाठी २० जीप्स् २००–२५० मोटारसायकली, ५० ट्रक्स, शेकडो सायकली आणि सदैव प्रज्वलित ठेवले गेलेले अन्नसत्र. ही तयारी कमी म्हणून की, काय कारखान्याचा पैसा आपलाच समजून सज्ज ठेवला गेला आहे. खरं तर येथे पक्षाचा फारसा विधिनिषेध बाळगावयाचा नाहीच. मी कसा निवडून येईन व त्यासाठी काय करावे लागेल याची तयारी केली म्हणजे बस्स! परंतु कोल्हे पाडावयाचेच,असा विडा जनता पक्षाने बांधला व मोहनराव गाढे (श्रीगोंदा उमेदवार) यांना बाजूला करून तेथे पंडितराव जाधवांना उभे केले आहे. आधीच जाधव म्हणजे कोल्ह्याची यंत्रणा चालविणारे कसलेले कार्यकर्ते होते. तेही कारखान्याचे संचालक आहेत. त्याचे स्वत.चे कार्यकर्ते होते; जोडीला कोपरगाव साखर कामगार सभांचे कार्यकर्ते व नेते श्री. किशोर पवार आणि शेतकरीवर्ग व भूतपूर्व समाजवादी व जनसंघाची पथके.गावन्गाव आणि गल्लीन् गल्ली जनता पक्षीयानी पिंजून काढली आहेत. जाधवाच्या लोकप्रियतेचे उदाहरणच देतो. उमेदवारी अर्ज भरावयास जाधव निघाले तर बरोबर दहा हजार जनता. मिळेल त्या वाहनानी लोक आले. बरोबर ताशे, रणशिंग, ढोल–लेझिमीची पथके आणि तुताऱ्या घेऊन. जणू काही पादाक्रात करावयाचे आहे हा आवेश! अर्थात कोल्ह्याची सत्ता हुसकावून लावावयाची आहेच. त्यासाठी येवढी तयारी असावीच आणि ती आता हुसकली जाणार आहे, हे नक्की!

बाराचे ऐवजी तेरावा आदा मतदारसंघ झाला तो शिर्डी. तीन तालुक्यातली गावे घेतली गेली व हा मतदारसंघ बनविला गेला. येथे साखरसम्राट चंद्रभान घोगरे (कांग्रेस) विरुद्ध मसकांचे अण्णासाहेब म्हस्के हाच सामना आहे. घोगरे हे सहकार चळवळीतले दुसऱ्या रांगेचे प्रतिनिधी; परंतु आपल्या हुशारीने कारखान्याचे अध्यक्ष झाले. शिर्डीत इंदिरा कांग्रेसचा उमेदवार बसावा म्हणून खूप प्रयत्न झाले; परंतु यश न आल्याने घोगरे पेचात अडकले. कारण मसकांचे महाराष्ट्राचे अध्यक्ष खासदार बाळासाहेब विखे यांचा हा खास भाग. श्री. म्हस्के त्यांचे भाचेच. विखे याचेबरोबर शेकड्यांनी कांग्रेसत्याग करून मसकांत येणारी कार्यकर्ती मंडळी या विभागतच जास्त. विखे स्वतःच साखरसम्राट आहेत. ते कांग्रेसचे वारू जखडबंद करण्यासाठी जातीनिशी प्रयत्नशील आहेत. अण्णासाहेब म्हस्के जिल्हा परिषदेत चेअरमन आहेत. त्याचा फायदा मित्रपक्षाचे सहकार्य म्हणून येथे मसकांचा विजय होणार आहे.

शेवटचा तालुका म्हणजे राहुरी. येथे परत साखरसम्राटातच लढत आहे. श्री. का. ल. पवार (कांग्रेस), अण्णा पा. कदम (जनता) व विद्यमान आमदार बी. पी. कडू (कम्युनिस्ट) अशी लढत आहे. १९७२ सालात श्रीरामपूरकडची जी गावे या तालुक्यात घातली होती ती कडूंची खास होती! आता ती तुटल्याने कडूंची बाजू लंगडी झाली आहे. तशात ज्यांचे सहकार्याने कांग्रेसचा पराभव केला ते खा.विखे चक्क विरोधात उभे. श्री. कडू स्वतः अतिशय भला कार्यकर्ता म्हणूनच जिल्हाभर ओळखले जातात. खर तर कम्युनिस्ट वाटतच नाहीत इतके प्रसन्न व्यक्तिमत्त्व कडूकडे आहे; परंतु– हा 'परंतू'च कडूना या रिंगणातून बाहेर टाकणार आहे. कारण तो परंतु कम्युनिस्ट म्हणून पसत नाही, हे सांगतो.

श्री. का. ल. पवार राहुरी सहकारी कारखान्याचे उपाध्यक्ष आहेत. त्यांचे आणि अध्यक्ष बाबुराव तनपुरे यांचे बिनसल्याने दोघानी एकमेकाविरुद्ध सदस्यांना उठवून राजीनामे मागितले आहेत. तशात तालुका कांग्रेस सघटित दोन गट आहेत. एक गट उघड उघड पवारांना विरोध करीत आहे. त्यामुळे राहुरीची जागा पवार कसे जिंकणार? कारण जनताचे नेते अण्णा पाटील कदम यांचेशी धक्का देणे सोपे काम नाही! अण्णा पाटील पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे महाराष्ट्र शाखेचे उपाध्यक्ष, या कारखान्याचे माजी अध्यक्ष, उत्कृष्ट शेतकरी कार्यकर्ते असल्याने सातत्याने कार्यकर्त्यांचे मोहोळ त्यांचेपाशी होते व आहेही आणीबाणीचे काळात ते केवळ ना. शरद पवारांचे मेहुणे म्हणून बाहेर होते, त्यांनी काळचा टोपीला रजा दिली व पांढरी धारण केली, असा अपप्रचार त्यांचे विरोधकांकडून केला जातो; परंतु लोक त्याला कसे भुलणार? कारण त्यांना एकच माहीत होते की, आणीबाणाचे काळातही अण्णा पाटलांनी शेतकरी संघटनेचे काम सोडले नव्हते व जनसंघही सोडला नव्हता. आता तर काय उत्कृष्ट कार्यकर्त्यांचा संच असलेले पूर्वीचे समाजवादी नेते व कार्यकर्ते एका दिलाने कामं करीत आहेत. त्यामुळे अण्णा पाटील कदम येणारच. त्याला आपण काय करणार? फक्त झिंदाबाद म्हणावयाचे!

तर असा हा जिल्हा! जनता पक्षाच्या विजयात मोठा हातभार लावणारा! सबंध तेरा जागांपैकी फार तर तीन जागा कांग्रेसला मिळतील; परंतु त्याही मिळू नयेत म्हणून शर्थ केली जात आहे. जनता व मसकांना निदान दहा जागा मिळाव्यात. प्रचारात जाहीरनाम्याबरोबरच तालुक्याचेही प्रश्न मांडले जात आहेत. कांग्रेसचा सारा भर 'साहेबाचा दौरा केव्हा? नामदार वसतराव नाईक केव्हा देवा' यावर! कारण वक्त्यांची अडचण ही मोठी उणीव आहे बरं सांगून सांगून सांगणार काय? कारण इंदिराजी व संजय गांधीच्या जयजयकारात आकठ बुडालेली कांग्रेसची मंडळी जनतेला काय सांगणार? अगदी अण्णासाहेब शिंदे, यशवंतरावांनी सांगितले की, इंदिराजी–संजय बदमाष होते तरी मतदार ऐकतील काय?' ते तर बदमाष तर तुम्ही हो?' हा सवाल आहेच!

जनता पक्ष मात्र स्वत.चे हिंमतीवर स्वत.चे बळावर प्रचार करीत आहे. वक्त्यांची वाण नाही. (गेली तीस वर्षे अव्याहतपणे तेच केले आहे) अनेक तरुण कार्यकर्ते फड मारीत आहेत. अनेकांनी आणीबाणी अनुभवली आहे. शिवाय चारित्र्याला किंमत आहेच ना! तेच निर्व्याज चारित्र्य जनताला यश मिळवून देणार आहे! □

# बारामती महाराष्ट्राची अमेथी होणार का? : पृष्ठ ४ वरून

सुमारे दोनशे लोकांचा– विशेषत: तरुणांचा–एक गट उठून गडबड-गोंधळ करीत सावकाशीनंच बाहेर पडतो; पण लोकांना एसेमचं भाषण ऐकायचच असतं, त्यामुळे सभेत फारसा व्यत्यय येत नाही. सभेत दोन-तीनदा चिठ्ठ्या पाठवून लोक एसेम्ना प्रश्न विचारतात– मोरारजीभाईंच्या काही विधानांचा खुलासा, सरकारी नोकर संपाबद्दलचं 'जनता 'चं धोरण. तेही, घरच्या आजोबानं पोरा-सोरांना समजावून सांगावं तशा शैलीनं म्हटल तर घरगुती गप्पा, म्हटलं तर आवेशपूर्ण घोषणा, अशा स्वरूपात एसेम् त्यांना उत्तर देतात.

एसेम्ची ही सभा चांगलीच गाजते. कारण बारामतीसारख्या तालुक्याच्या ठिकाणी आठ-दहा हजारांची गर्दी आणि तीही निवडणुकीच्या पंधरा दिवस आधी म्हणजे भरपूरच. शिवाय काँग्रेसेतर पक्षाच्या निवडणूक–सभांना एवढा प्रतिसाद विधानसभा निवडणुकीत प्रथमच मिळतोय असं म्हणायला हरकत नाही. याच सभेच्या दोनच दिवस आधी ना. मोहन धारियांची जाहीर सभा त्याच ठिकाणी झाली होती. तिला तर पधरा-सोळा हजार उपस्थिती होती, असं जनता पक्ष कार्यकर्त्यांनीच नव्हे तर आम लोकांनीसुद्धा छातीठोकपणं सांगितलं. इथपासूनच तुलनेला सुरुवात झाली. कारण काँग्रेसची अशा तोडीची एकही जाहीर सभा अद्याप बारामतीत झालेली नाही. ना. शरद पवार यांनी स्वत: एक सभा घेतली; पण शरद पवार यांची प्रसिद्धी प्रभावी वक्ते म्हणून कधीच नव्हती–नाही. त्यामुळे त्या सभेला असा प्रतिसाद मिळाला नाही. एरवीही कुणीच महत्त्वाचा काँग्रेस नेता इकडे फिरकलेला नाही. खा. यशवंतराव चव्हाण येतील अशी खात्री आहे, तथापि मी या मतदारसंघात फिरलो तेव्हा तर खुद्द शरद पवारसुद्धा चार दिवसांची सुट्टी काढून इतरत्र प्रचाराला गेलेले होते.

विषय निघालाच आहे, तर या बारामती मतदारसंघाचीही थोडी माहिती द्यायला हवी. हा मतदारसंघ हाताळायला तसा फार अवघड नाही. कारण बारामती शहराखेरीज ज्या ६३ गावांचा समावेश बारामती तालुक्यात होतो, त्यातली सुमारे पस्तीसच गावं बारामती मतदारसंघात राहिली आहेत आणि जी गावं-खेडी बाहेर गेली आहेत, त्यातच कोरडा दुष्काळी भाग जास्त प्रमाणात आहे. कोरड्या भागाचे गुंतागुंतीचे प्रश्न हाताळायला जास्त कठीण असतात आणि गरिबीमुळे हा भाग प्रलोभनाना बळी पडण्याची शक्यता बरीच असते, हे लक्षात घेतलं तर बारामती विधानसभा मतदारसंघाची ही पुनर्रचना ना. शरद पवाराच्या पथ्यावर पडणारी नाही हे उघडच दिसत. बारामती मतदारसंघाची एकूण मतदारसंख्या एक लाख पाच हजार. यातली तब्बल तेवीस हजार मतं खुद्द बारामती शहरात आहेत. बारामतीच्या अगदी नजीकच असणाऱ्या माळेगाव आणि पणदरे या दोन गावांत अनुक्रमे आठ आणि सहा हजार मतदार आहेत. म्हणजे एकतृतीयांशापेक्षा अधिक मतं या तीन केंद्रातच एकत्र आली आहेत. साहजिक या तीन गावांत मिळून–आणि विशेषत: बारामती शहरात–जो उमेदवार दुसऱ्यावर पाचएक हजारांचं मताधिक्य मिळवू शकेल, तो निश्चितपणे विजयी होईल असा सर्वांचाच होरा दिसतो. प्रश्न आहे तो कुणाला एवढ लीड मिळेल का आणि कस मिळेल याचा. कारण गतवर्षीच्या लोकसभा निवडणुकीत बारामती विधानसभा मतदारसंघात बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांना खा. सभाजीराव काकडे यांच्यावर फक्त साडेचारशे मतांचा पुढावा दिला होता. यावरून मुंज किती चुरशीची झाली आणि होईल याची कल्पना यावी. अर्थात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतले प्रश्न वेगवेगळे असतात हे तर खरंच; पण एकट्या बारामती शहरातून विजयाला पुरेल इतकं निर्णायक मताधिक्य मिळविण्यासाठी बराच आटापिटा कुणालाही करावा लागणार, हे उघड दिसतं. शहरी मतदारात शिक्षणाच प्रमाणही चांगलं आहे, हा आणखी एक महत्त्वाचा घटक. निदान जनता पक्षाच्या दृष्टीने महत्त्वाचा.

सामाजिक दृष्ट्या हा मतदारसंघ खूपच सरमिसळ स्वरूपाचा आहे. कोणताही एखादा समाज किंवा जमात यांचं वर्चस्व नाही, त्यामुळे प्रचाराला/निवडणुकीला जातीय रंग येण्याची शक्यता बरीच कमी वाटते. धनगर आणि मराठा हे दोन समाज मतदारसंख्येच्या दृष्टीनं तुल्यबळ–प्रत्येकी सुमारे ३३ % आहे; अर्थात याचाच अर्थ अन्य समाजांची मतदारसंख्याही उपेक्षणीय नाही. या कारणामुळे आणि मतदारसंघातील एकंदर तप्त राजकीय वातावरण व प्रचाराचे स्वरूप लक्षात घेता या वेळचे मतदान कटाक्षाने राजकीय पातळीवरच होईल. जातीय झगड्याचे स्वरूप त्याला येणार नाही, असा विश्वास मला वाटतो आणि ही समाधानाची बाब आहे असं वाटतं.

'मतदारसंघात अडीच साखर कारखाने आहेत,' असं श्री. लक्ष्मणराव करंदीकरांनी सांगितलं, तेव्हा मी जरासा बुचकळ्यातच पडलो होतो. श्री. करंदीकर हे जुने स्वातंत्र्यसैनिक आणि अजूनही क्रियाशील असलेले जनता पक्षाचे कार्यकर्ते. पाठीशी चार निवडणुकांत अटीतटीनं काम केल्याचा अनुभव. अडीच कारखाने कसे याचा हिशेबही त्यांनी लगोलग दिला. सोमेश्वर आणि माळेगावचे दोन कारखाने पूर्णत: या मतदारसंघाच्या हद्दीतच येतात आणि तिसरा सणसर कारखाना इंदापूर मतदारसंघाच्या हद्दीत असला तरी त्याला जिथनं उसाचा पुरवठा होतो ते सगळ आजूबाजूच क्षेत्र बारामती मतदारसंघाच्या कक्षेत. त्यामुळे करंदीकर तो कारखाना अर्धा म्हणून मोजतात. यापैकी माळेगावचा कारखाना सध्या शरद पवार गटाच्या पॅनेलच्या ताब्यात आहे, तर सोमेश्वर कारखाना बाबालाल काकडे यांच्या व सणसरचा कारखाना श्री. मारुतराव चोपडे यांच्या अमलाखाली आहे. काकडे–चोपडे हे दोघेही 'चेअरमन ' जनता पक्षाच्या उमेदवाराच्या मागे सक्रियतेने आहेत. साहजिकच या लढतीला साखरेचा रंगवासचव आल्याशिवाय राहणार नाही हे कुणालाही पटाव. सहकारी साखर कारखाने ही केवढी मोठी आणि महत्त्वाची शक्तिकेंद्रं–हाउसेस–बनताहेत हे सांगायला काही बारामतीचच उदाहरण पाहिजे, अस नाही.

तर असा हा मतदारसंघ आजपर्यंत काँग्रेसचाच नव्हे, तर ना. शरद पवाराचाही बालेकिल्ला समजला गेला आहे. १९६७ व १९७२ या दोन्ही विधानसभा निवडणुकांत श्री. पवार इथूनच

चांगल्या मताधिक्यानं विजयी झाले होते. १९७२ च्या लढतीमधले त्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी अॅड. विजय मोरे या वेळी जनता पक्षाच्या वतीनं त्याच्याविरुद्ध दंड थोपटून पुन्हा उभे आहेत आणि हा पवार-मोरे सामना तसा दुरंगीच होणार असला तरी आणखीही तीन उमेदवार नावापुरतेच, पण आखाड्यात उतरले आहेत :– इंदिरावादी कांग्रेसचे श्री. ताकवणे, रिपब्लिकन खोब्रागडे गटाचे अॅड. अरविंद गायकवाड, आणि रिपब्लिकन ऐक्य समितीचे श्री. चव्हाण. या तिघा उमेदवाराचा किस्साही मोठा रंगतदार आहे. रिपब्लिकन खोब्रागडे गट हा वस्तुतः जनता पक्षाचा मित्रपक्ष. तथापी राज्यपातळीवरच्या या समझोत्याला न जुमानता स्थानिक पातळीवरील काही गुतागुतीच्या राजकारणातून त्याचे उमेदवार श्री. गायकवाड यानी जनता पक्षाच्या उमेदवारांविरुद्ध अर्ज भरला. साहजिकच जनता पक्षाची मते खाण्यासाठीच, कांग्रेसनेच (काही आर्थिक साहाय्य वगैरे करून !) गायकवाड यांना उभे केले अशी कुजबूज गावोगावी ऐकायला मिळते. त्याबरोबरच श्री. ताकवणे हे मूळ कांग्रेस कार्यकर्ते असल्याने त्यांचे काम ज्या भागात आहे तियली श्री. पवारांची मते ते खाणार आणि म्हणून श्री. गायकवाडांच्या उमेदवारीमुळे जनता पक्ष धोक्यात येणार नाही. असाही हिशेब माडला जातो. पाचवे उमेदवार श्री. चव्हाण आता मतपत्रिकेवर व कागदोपत्री कायम राहणार असले तरी प्रत्यक्षात त्यांनी माघार घेऊन जनता पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा दिलेला आहे ज्या सभेमध्ये माघारीचा हा निर्णय त्यांनी जाहीर केला त्या सभेला हजर राहण्याची संधी मला मिळाली. त्यांच्या पाठिंब्यामुळे रिपब्लिकन मतदारांचा बुद्धिभेद थाबेल आणि त्यांची मते आपल्याकडे येतील अशी खात्री जनता पक्ष कार्यकर्त्यांना वाटते. सध्या तरी श्री. गायकवाड व श्री. ताकवणे मिळून सात-आठ हजारापेक्षा जास्त मत खातीलस वाटत नाही आणि म्हणून मुख्य सामन्याच्या दुरंगी स्वरूपावर त्यांचा फारसा परिणाम होणार नाही.

एसेमच्या सभेनंतर श्री. विजयराव मोरे यांची गाठ पडली. चाळिशीचा वाटणारा तरुण आणि उमदा माणूस, ही माझी पहिली प्रतिक्रिया झाली आणि नंतर अधिक माहिती मिळाली बारामतीतल्या अगदी आघाडीवरच्या वकिलांपैकी असलेले श्री. मोरे बी. एस्सी. एल्. एल्. बी. आहेत आणि त्यांचं बरंचसं महाविद्यालयीन शिक्षण पुण्यातच झालेलं आहे साध्या मध्यमवर्गीय ग्रामीण शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आणि परिश्रमानं शिक्षण घेतलेल्या या तरुणानं कायद्याचा अभ्यास करतानाच राजकारणाचे धडे गिरवायलाही सुरुवात केली. १९६७ च्या निवडणुकीत पूर्वीच्या समाजवादी पक्षाच काम केल. वकिलीचा व्यवसाय व समाजकार्य चालू असतानाच १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत पूर्वीच्या समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून श्री. शरद पवारांविरुद्ध लढा दिला. पैसा, कार्यकर्ते, अनुभव, साधनसामग्री या सर्वांचाच तुटवडा असताना आणि इंदिरा लाटेमुळे परिस्थिती प्रतिकूल असतानाही २३,००० मतं मिळवली. भूमिमुक्ती आदोलन, दुष्काळ विमोचन समिती यामध्ये उत्साहानं कार्य केलं. आणीबाणीच्या काळातलं श्री. मोरे यांच काम लक्षणीय आहे. तुरुंगवासीयाच्या कुटुंबियांना सक्रिय साहाय्य करण्याबरोबरच मिसा व भारत संरक्षण कायद्याखाली स्थानबद्ध झालेल्या काही जणाच्या वतीनं त्यानी न्यायालयात दावे दाखल केले व परिणामाची पर्वा न करता लढविले. आपल्या व्यवसायाचा फायदा घेऊन अशा कठीण परिस्थितीतही काम करता येऊ शकतं, हे 'आम्ही काय करू शकणार ?' असा पवित्रा घेणाऱ्या अन्य व्यावसायिकांनी लक्षात घेण्यासारखं आहे, असं मला वाटतं. १९७७ च्या निवडणुकीत एक प्रमुख प्रचारक या नात्यानं श्री. मोरे यांनी जनता पक्षाचं काम केलं. पक्षस्थापनेपासूनच ते बारामती तालुका जनता पक्षाचे अध्यक्ष आणि पुणे जिल्हा जनता पक्षाचे उपाध्यक्ष राहिले आहेत. श्री मोरे यांचा सविस्तर परिचय द्यायचं कारण हेच की, त्यांच्या मतदारसंघातल्या जनतेला त्यांची अगदी जवळून व जिव्हाळ्याची ओळख असली तरी जिल्ह्याबाहेर मात्र त्यांचं नाव फार प्रमाणात गेलेलं नाही. त्यामानानं आपल्या पदाच्या जोरावर श्री. शरद पवारांची प्रसिद्धी बरीच झालेली आहे. अर्थात कोणत्याच पदाची वगैरे वाट पाहत न बसता कर्तृत्वाच्या जोरावर राज्यव्यापी प्रतिमा निर्माण करण्याचं काम श्री. मोरे यांना यापुढे करायचंय.

श्री. मोरे याच्याशी बोलताना त्यांची जी वैशिष्टयं मला जवळून जाणवली, ती त्याचा प्रामाणिकपणा, सच्चेपणा आणि निर्व्याज सरळपणा पक्षीय राजकारणात हा गृहस्थ कसा टिकणार याची चिंता वाटावी इतकी तत्त्वनिष्ठा आणि पापभीरुता त्याच्याकडे आहे. 'तीस वर्षांत काहीही न करता पुन्हा पुन्हा मतं मागायला यायला माणसाला लाज कशी वाटत नाही हो ? मी निवडून आलो आणि पाच वर्षांत जर मला काही भरीव करता आल नाही तर आपण काही पुढच्या निवडणुकीत मतं मागायला तोंड नाही बुवा दाखवणार !' असं ते मला म्हणाले आणि हे ते मनापासून म्हणंत असल्याचं जाणवलं. त्यात दिखाऊपणा नव्हता. हाच निश्चय त्यांनी काटयाच्या वाडीला झालेल्या सभेतही जाहीरपणे बोलून दाखविला. आपण ही निवडणूक नेमकी कशासाठी लढवतोय, याची काही निश्चित खूणगाठ त्याच्यापाशी आहे आणि म्हणूनच त्या प्रश्नाला त्यांच्यापाशी समाधानकारक उत्तरही आहे. जनता पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्याला, त्यात दिलेल्या आश्वासनांना आणि संपूर्ण क्रांती व अत्योदयाच्या ध्येयवादाला ते बांधील आहेत आणि कोणतीही किंमत देऊन त्यासाठी झगडत राहण्याचा त्यांचा निर्धार आहे. आपल्या प्रचारसभांतली त्यांची भाषणं संपूर्णतः राजकीय व सामाजिक स्वरूपाची असतात. स्थानिक पातळीवरच्या राजकारणाशी ते स्वतःला बाधून घेत नाहीत. प्रत्येक मतदाराला आणि गावाला त्यांचे सर्व प्रश्न सोडविण्याची भरमसाट आश्वासनंही देत नाहीत. शरद पवार आणि विजय मोरे याची ही खाजगी मारामारी नव्हे, तर दोन तत्त्वप्रणाली आणि कार्यपद्धतीमधला, दोन परस्परविरुद्ध दिशांनी जाणाऱ्या राजकीय शक्तींमधला हा संघर्ष आहे, हे मतदारांना जाणवून देण्याची दक्षता ते आवर्जून घेतात. शेतकीच्या विकासावर त्यांचा भर आहे आणि युवकशक्तीवरही विश्वास असल्यानं राजकीयसामाजिक परिवर्तनाची धुरा खांद्यावर घेण्याचं आवाहन प्रचारसभांमधून ते युवकांना वारंवार करतात. त्यांची स्वतःची काम करण्याची-धावपळीची तडफही त्याच्या तरुण वयाला साजेल अशीच आहे. हा माणूस भ्रष्ट/उन्मत्त होणार नाही, विकला जाणार नाही आणि मोडेल पण वाकणार नाही, असं वाटावं असा एक नेक उमदेपणा त्याच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाला जोड म्हणून लाभला आहे.

श्री. मोरे यांची मुलाखत संपायला रात्र झाली. त्याच वेळी त्यांच्या कार्यकर्त्यांचीही ओळख झाली. श्री. वा. एस्. कानिटकर (चिटणीस, जनता पक्ष, बारामती), श्री. पराडकर, श्री. ढाकाळकर, श्री निबंधे,

श्री. रामभाऊ जगताप अशी अनेक मंडळी दिवसरात्र राबताहेत. सर्वश्री अर्जुनराव सस्ते, गंगाधरदादा तावरे, नानजी तावरे, विश्वनाथबुवा गावडे, भगवाननाना काकडे, बाबालाल काकडे, मारुतराव चोपडे आणि खासदार संभाजीराव काकडे अशा मान्यवर पुढाऱ्यांचं मार्गदर्शन लाभत आहे. या सगळ्या मंडळींनी केवळ दहाएक दिवसांच्या मुदतीत अख्खा तालुका ढवळून काढला आहे. जवळजवळ दोन दिवसांत मिळून बारामती शहराशिवाय दोन डझन मोठ्या खेड्यांत आणि अनेक लहानसहान वाड्या-वस्त्यांत मी हिंडलो आणि प्रचारी वातावरणाचा व जनमनाचाही कानोसा घेण्याचा प्रयत्न केला. तालुक्याचं राजकीय हवामान चांगलंच गरम झालेलं आहे. सर्व गाव-खेड्या-वस्तीतल्या जवळजवळ प्रत्येक घरात जनता पक्षाचा एखादा तरी कार्यकर्ता पोचलेला दिसतो. इतक्या थोड्या अवधीत प्रचारयंत्रणा संघटित करून इतका व्यापक जनसंपर्क कसा साधता आला, अशी शंका मी प्रदर्शित केली आणि त्याचं समाधानकारक उत्तरही मिळालं. जनसंपर्काचं हे काम जनता पक्ष कार्यकर्त्यांनी निवडणूका जाहीर झाल्यानंतर नव्हे तर ७७ च्या लोकसभा निवडणुका संपल्यापासूनच अव्याहत चालू ठेवलेलं आहे. गेल्या दहा महिन्यांत गावपातळीवर पक्षाची चाळीस युनिटस् कार्यरत करण्यात आलेली आहेत. पाच हजार पक्षसभासद नोंदवून घेण्यात आलेले आहेत आणि हे सभासद व अन्य जन सतत संपर्कात रहावेत यासाठी फिरत्या कार्यकर्त्यांचे प्रयत्न चालू राहिलेले आहेत. जनतेच्या तक्रारी-अडचणी समजावून घेऊन दूर करण्यासाठी यंत्रणा उभारण्याचे प्रयत्न अपुऱ्या प्रमाणात का होईनात पण चालू आहेत. या साऱ्याचे दृश्यफळ म्हणूनच आज निवडणुकीला दोन आठवडे बाकी असतानाही जनता पक्षाचा दबदबा तालुक्याच्या कानाकोपऱ्यात आहे. एकाच वेळी वेगवेगळी युनिटस् (त्यात एक महिलापथकही आहे.) मतदारसंघाच्या वेगवेगळ्या भागात फिरताहेत आणि घरोघर जाऊन मतदारांना भेटताहेत. एकीकडे श्री. करंदीकर यांनी निमंत्रित केलेल्या कलापथकाचा दौरा जोरात चालू आहे. गाणी-पोवाड्यांद्वारा लोकरंजनाबरोबरच पक्षप्रचार करण्याची ही योजना ग्रामीण भागात यशस्वीरीत्या फलद्रूप होताना दिसते. स्वत: श्री. मोरे सकाळी आठ ते रात्री एकपर्यंत मतदारसंघात हिंडतात आणि घरोघर जाण्याबरोबरच पदयात्रा व छोट्या सभाद्वारे जनसंपर्क साधतात. शंभरापासून हजार-दीडहजारपर्यंत उपस्थितीत होणाऱ्या या छोट्या सभा मोठ्या श्रवणीय वाटतात. 'काँग्रेसविरोधी मतदानाचा एनिमा देऊन काँग्रेसची साचलेली घाण धुऊन काढण्या'च्या भाषेपासून ऐतिहासिक थाटातल्या प्रच्छन्न शिव्यागाळीपर्यंत काहीही बोलणारे खास 'ग्रामीन' शैलीचे वक्तेही ऐकायला मिळाले. कोऱ्हाळे बुद्रुक गावी दलितवस्तीत झालेल्या अशा एका सभेत रिपब्लिकन ऐक्य समितीचे उमेदवार श्री. चव्हाण (खूण-घोडा) यांनी श्री. मोरे यांच्यासाठी आपली उमेदवारी मागे घेत असल्याची घोषणा केली. तीही 'मोरे निवडून आले नाहीत तर आपली जीभ कापून देण्याच्या' जहाल प्रतिज्ञेसकट्च ! 'लोकसभा निवडणुकीच्या वेळीही संभाजीरावासाठी मी अशीच प्रतिज्ञा केली होती; पण परमेश्वर मला घाबरला की काय कोण जाणे, त्यानं माझी जीभ वाचवली. आत्ता मला खून मिळाली घोडा, पन काँग्रसला घोडा दावन्यासाठी मी माझ्या घोड्यावर नागरघाऱ्याला बसू द्यायला तयार आहे,' ही श्री. चव्हाणांची हशा-टाळ्यांच्या गजरातली घोषणा ऐकल्यानंतर परमेश्वर त्यांच्या जिभेलाच घाबरला असेल अशी शंका मनाला चाटून गेल्यावाचून राहिली नाही. अशा छोट्या बैठकांबरोबरच मोठ्या सभाही चालू आहेतच. माळेगाव व पणदरे इथं श्रीमती सुशीलाताई आठवले यांच्या सभा झाल्या. बारामतीला बिहारचे अर्थमंत्री श्री. कैलास मिश्र येऊन घालते होते. दि. १७ फेब्रुवारीपासून खा. संभाजीराव काकडे चार दिवसांच्या प्रदीर्घ दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्याबरोबर आणखी एखाद्या केंद्रीय मंत्र्याला किंवा नेत्याला आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. एवढी राजकीय खळबळ आणि एवढ्या जोरदार सभा बारामतीत यापूर्वी फक्त मार्च '७७ च्या निवडणुकीतच झाल्या होत्या, असं मला सांगण्यात आलं. कोऱ्हाळे बुद्रुक व खुर्द, लाटे, शिरष्णे, वाकी, चोपडज, वडगाव, सांगवी, मेडद, काटेवाडी, पिंपळी, गुनवडी, निंबोडी, पारवडी, शिर्सुफळ, कटफळ, माळेगाव, पणदरे, कुरणेवाडी आणि कन्हेरी वगैरे गावांत हिंडून वातावरण अजमावण्याची संधी मला मिळाली आणि माझं असं ठाम मत झालं की, सर्वत्र जनतालाट ओसरलो की नाही, याची चर्चा सुरू असली तरी बारामती मतदारसंघात मात्र ती नक्कीच हटलेली नाही. श्री. विजय मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्नपूर्वक ती थोपवून धरलेली आहे. काँग्रेस-जनताची ही झुंज भली निकराची होणार आहे आणि जनता पक्षाच्या जिद्दीच्या कार्यकर्त्यांनी तापवलेलं वातावरण पाहता काँग्रेसच्या फळीनं यापुढं दुप्पट जोर केला नाही तर श्री. शरद पवार यांना ही चुरशीची लढत चांगलीच जड जाणार आहे यात मला शंका वाटत नाही.

बारामतीत असतानाच कन्हेरी-काट्याची वाडी गावात झालेल्या एका महत्त्वाच्या सभेला मला हजर राहायला मिळाल. काटेवाडी हे श्री. शरद पवारांचं मूळ गाव. तिथंच शनिवार दि. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी झालेल्या या वैशिष्ट्यपूर्ण सभेत श्री. पवार यांना पराभूत करण्यासाठी एकजुटीनं प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला गेला. या सभेचं आणि एकजुटीच्या निश्चयाचं महत्त्व जोखण्यासाठी जरा मागे जायला हवं. बारामती मतदारसंघातून जनता पक्षाचं तिकीट मिळावं यासाठी प्रयत्न करणारे श्री. विजय मोरे यांच्याशिवाय श्री. मारुतराव चोपडे (चेअरमन, सणसर सहकारी साखर कारखाना), श्री. अर्जुनराव सस्ते, श्री. गंगाधरदादा तावरे, श्री. नानजी तावरे आणि श्री विश्वनाथबुवा गावडे असे आणखी पाच इच्छुक होते. त्यापैकी श्री. मारुतराव चोपड्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय प्रातिकने जवळजवळ निश्चित केलेला होता, हे उघडं गुपित आहे. तथापि या भागातल्या कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या आग्रही प्रयत्नांमुळे दिल्लीत हा निर्णय फिरविण्यात आला. 'यामुळे श्री. चोपडे व इतर इच्छुक नाराज असून ते श्री. मोरे यांच्यासाठी काम करीत नाहीत,' अशा स्वरूपाच्या अफवा काँग्रेसी प्रचारकांनी पिकवल्या होत्या. काटेवाडीतल्या त्या सभेत हे सर्व इच्छुक श्री. मोरे यांच्यासह एका व्यासपीठावर आले आणि वरील अफवांचा इन्कार करून त्यांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला एकमुखी व सक्रीय पाठिंबा जाहीर केला. श्री. बाबालाल काकडे (चेअरमन, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना) यांनी तर 'हरामखोर', 'माकड', 'पीडा' अशा प्रेमळ व सुरस शब्दांत श्री. शरद पवारांचा उल्लेख करून त्यांना 'बारामती बंद करा' असा सल्लाही जमलेल्या हजार-

भर जनतेला देऊन टाकला. अर्थात गृहमंत्र्यांच्या स्वत.च्या गावात आणि मतदारसंघात त्यांचा असा उद्धार झालेला लोकांना खपतो, एवढेच नव्हे तर मनापासून आवडतो ही बाब मात्र मला नवलाची तशीच विचारार्हही वाटली. नामदारांनी गेली अकरा वर्षं या मतदारसघाचं प्रतिनिधित्व करून काय काय कमावलं आणि गमावलं याचा जमाखर्च (त्यानी आणि आम्हीही) मांडायची वेळ आली आहे, असं जरूर वाटलं.

कॉंग्रेसच्या प्रचारगोटाचा कानोसा घ्यायचाही प्रयत्न केला; पण स्वत: श्री. शरद पवार बारामतीत किंवा जवळपासही नव्हते आणि (त्यामुळेच की काय) पण कॉंग्रेसचे ताबूत थडे झालेले दिसले. काही निवडक गावात (उदा. पणदरे–माळेगाव–शिर्सुफळ) कॉंग्रेसचे झेंडे, पोस्टर्स, बॅनर्स, प्रचारक, सायकलफेरीवाले वगैरे दिसतात. तथापि अद्याप जनता पक्षाइतका सभाचा वा व्यक्तिगत जनसंपर्काचा धूमधडाका त्याना सुरू करता आलेला नाही. खुद्द बारामती शहरात थोडाफार वातावरणनिर्मितीचा प्रयत्न झालेला दिसतो, काही गाड्याही फिरताना दिसतात; पण अजून एकच जाहीर सभा स्वत: श्री. पवारांनी घेतलेली आहे. यशवतरावाचा दौरा अपेक्षित असला तरी अजूनही कॉंग्रेसचा कुणीच महत्त्वाचा मत्री–नेता–वक्ता मतदारसघात येऊन गेलेला नाही, याचाही परिणाम दिसतोच. प्रा. रामकृष्ण मोरे व श्री. सुरेश सोनवणे हे दोघे पुण्याचे कार्यकर्ते तडफेने प्रचारसभा घेत तालुक्यात हिंडताहेत आणि त्यांचं वक्तृत्वही उत्तम आहे. तथापि ते दोघे वगळता कॉंग्रेसकडे प्रभावी वक्त्यांची चणचण फार भासते. स्वत: श्री. पवार यांच्या वक्तृत्वाला बऱ्याच मर्यादा पडतात. हे सर्वच जाणतात. महत्त्वाचा दोष म्हणजे जी गावे प्रथमपासूनच कॉंग्रेसचे बालेकिल्ले म्हणून ओळखली जातात ती वगळता तालुक्याच्या अन्य ग्रामीण भागात कॉंग्रेस-प्रचार वा जनसंपर्क चालू नाही, असे आश्चर्यकारक दृश्य दिसते. याबद्दल विचारणा केली असता, 'नामदाराचा मुक्काम हलला की प्रचारमोहिमेच हे असच वागं होतं, ते असतात तेव्हाच हिरीरीनं काम चालतं', असं उत्तर एका निष्ठावत युवक कॉंग्रेस कार्यकर्त्यानं दिलं. ही प्रवृत्ती निश्चितच धोकादायक आहे. कारण श्री. शरद पवार यांच्यावर आपल्या मतदारसघाच्या बाहेरच्या कॉंग्रेस-प्रचाराची थोडी-फार तरी जबाबदारी असेल; तशी गुंतवणूक त्यांचे प्रतिस्पर्धी श्री. विजय मोरे यांची नाही. ते आपल्या मतदारसघावरच एकाग्रतेनं काम करू शकतात, शिवाय त्यांना बाहेरून कुमकच मिळण्याची शक्यता आहे. काहीही असो, साधनसामग्रीचा तुटवडा नसूनही कॉंग्रेसची प्रचारमोहीम मरगळलेली दिसते खरी. कॉंग्रेसचा जो प्रचार चालू आहे, त्यात बराचसा भर विविध खाजगी व सार्वजनिक आश्वासन लोकाना देण्यावर आहे, असं मला दिसून आलं. गावाला चावडी बाधून देऊ, विहीर काढून देऊ, तरुणाना नोकऱ्या लावून देवू अशी आश्वासनं नामदारांच्या तर्फे त्यांचे प्रचाभरमसाट प्रमाणावर जनतेला देत आहेत. माळेगाव साखर कारखान्यात वीसएक जागाच भरायच्या असतानाही 'तिथे नोकरी देवू' अशी आश्वासन मिळालेल्यांची संख्या हजाराच्या घरात तरी आहे. स्वत. श्री. शरद पवार प्रचार करतात तेव्हा मात्र ते स्वत: घरोघर फिरून मतदाराना भेटतात व लाकाना याच भलतंच अप्रूप वाटत असल्यान परिणाम बरा साधला जातो. अर्थात तरीही आम जनतेच्या मनातला कॉंग्रेसबद्दलचा प्रखर राग व श्री. शरद पवारांच्या अकरा वर्षातल्या कामाबद्दलची तीव्र नापसती जागोजाग दिसून येते, ती दुर्लक्षिण्याजोगी नाही. कॉंग्रेसच्या राष्ट्रीय पातळीवरच्या अपयशाचा राग मतदारांना आहेच; पण आपले प्रतिनिधी म्हणून श्री. पवार आपल्याला न्याय मिळवून देऊ शकलेले नाहीत, ही चीडही फार मोठ्या प्रमाणावर आहे आणि अगदी तळातला, ग्रामीण, अशिक्षित मतदारसुद्धा राजकीयदृष्ट्या जागृत झाल्याचं लक्षात घेता नामदारांना ही ढिलाई बरीच महागात पडू शकेल !

कॉंग्रेसी प्रचारयत्रणेच्या संदर्भात एक अगदी एकमुखी तक्रार मला गावोगाव ऐकायला मिळाली. ना. पवाराच्या पदाचा व सत्तेचा गैरफायदा घेऊन तालुक्यात दहशतीचं वातावरण निर्माण करायचा डाव कॉंग्रेस प्रचारकांनी टाकला असल्याची ही तक्रार जनता पक्षाच्या प्रचारप्रमुखापासून अगदी सामान्य शेतमजूर स्त्रीपर्यंत अनेकांनी केली. पणदरे, माळेगाव कॉलनी, वाणेवाडी, होळ, खोमणवस्ती अशा काही भागात, जिथे कॉंग्रेसचा जोर जास्त आहे, ही दहशत फार मोठ्या प्रमाणावर निर्माण केली जाते आहे. जनता प्रचारकांना हात-पाय मोडण्याच्या धमक्या देणं, जनता पक्षाची पोस्टर्स, झेंडे इ. घरावर लावायला गावकऱ्यांना प्रतिबंध करणं, जनता पक्षाच्या प्रचारी गाड्यावर दगड मारणं, दुकानदारांना–डॉक्टर्स–प्राथमिक शिक्षकाना एकत्र बोलावून कॉंग्रेसचाच प्रचार करण्याचा धाक घालणं, असे अनेक प्रकार मतदार संघात नावा-गावाच्या पुराव्यासह ऐकायला मिळतात. पोलिसखातं याबाबत निष्क्रीय राहतं. होळ गावच्या गिते जमीनदारांनी तर मध्ययुगीन सरंजामशाहीच जोपसली आहे, असं ऐकायला मिळालं. गिते हे ना. पवाराचे घनिष्ठ मित्र असही ऐकलं. पणदरे गावात ना. धारियांच्या सभेच्या दिवशी हरताळ पाळण्याची सक्ती करण्यात आली तर खुद्द बारामती गावात व्यापारी–शिक्षकवर्गाला जनता पक्षाकडे न जाण्याचा 'आदेश' देण्यात आला आणि एसेम् जोशींच्या सभेच्या आदल्या दिवशी सभेकडे जाणाऱ्या रस्त्यावरच्या ट्यूब्ज् फोडल्या गेल्या, अशा तक्रारी आहेत. शेवटच्या प्रकाराबद्दल रीतसर तक्रार नोंदण्यात आली आहे. हे प्रकार थाबले नाहीत, वाढत गेले तर मतदान निर्भय मोकळ्या वातावरणात होणं कठीण आहे, अशी बाजू जनता पक्ष कार्यकर्ते मांडतात व ती न्याय्य वाटते.

बारामती मतदार सघातलं एकूण चित्र हे असं आहे. लढत अटीतटीची आहे. जागा कॉंग्रेसच्या दृष्टीन चांगलीच प्रतिष्ठेची आहे; तर जनता पक्षाचे प्रयत्न जास्त निष्ठावंत व जिद्दीचे आहेत. दोन्ही उमेदवार सध्या तरी तुल्यबळ दिसतात. शेवटच्या आठ दिवसात कोण काय डावपेच लढवील यावर निर्णय ठरणार आहे. तापलेलं वातावरण किंवा भरपूर दृश्य प्रचार म्हणजे हमखास विजयाची हमी नव्हे, याची जाणीव मला निश्चित आहे. पण या दौऱ्यात तळातल्या, सर्वसामान्य प्रातिनिधिक मतदारांना स्वतत्रपणे भेटायची जी संधी मला मोठ्या प्रमाणावर मिळाली त्यावरून मी एवढे नक्की म्हणू शकतो की श्री. मोरे यांची स्वत ची स्वच्छ प्रतिमा व मतदाराशी व्यक्तिगत संबंध, उत्तम कार्यकर्त्यांच केडर, काकडे–चोपडे–गावडे–तावरे इ. वजनदार असामींचं पाठबळ आणि जनतेच्या मनातली कॉंग्रेसबद्दलची चीड याचा हिशब करता अॅड् विजय मोरे याचं पारडं चागलच जड आहे ! □

पुण्याचा मतदार सर्व पदयात्रा कौतुकाने पाहतो.
सर्व सभांना उत्साहाने गर्दी करतो.
सर्व घोषणाफलक सायकल थांबवून आवर्जून वाचतो.
पण मतदान करताना मात्र यापासून अलिप्त असतो.
कोणत्याही लाटेचा त्याच्यावर फारसा प्रभाव पडत नाही.

गेल्या लोकसभा निवडणुकीत खा. मोहन धारिया आणि श्री. वसंत थोरात यांच्यातली आकडेवारी हेच सांगते–

आणि म्हणून पुण्याच्या जागांचे गणित बांधणे कठीण होऊन जाते.

या वेळी तर काँग्रेसची ही अखेरची खेळी असल्याने
आणि जनतेला यश दृष्टिपथात दिसत असल्याने
दोन्ही बाजूंनी सर्वच जागा अटीतटीने झुंजविल्या जात आहेत.

श्री. किल्लेदारांनी उमेदवारी मागे घेतल्याने बहुतेक सर्व ठिकाणी
सामने दुरंगी–म्हणूनच अत्यंत चुरशीचे होणार आहेत.
सर्व पक्षांचे मातब्बर नेते आवर्जून पुण्याला येत आहेत–आणले जात आहेत.

सर्व ठिकाणी प्रचाराचा गदारोळ उडाला आहे.

या गदारोळातून तयार होणारे पुण्याचे निवडणूकचित्र कसे असेल ?

# 'माणूस'चा यापुढील अंक, सचित्र
# पुणे निवडणूक विशेषांक

किंमत सव्वा रुपया